CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

**आजचा सामना**

चेन्नई सुपरकिंग्ज वि. पंजाब किंग्ज
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : चिदंबरम् स्टेडियम, चेन्नई

सोलापूर | बुधवार, ३० एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १७२| पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



एक जीवन, एक ध्येय हाच आपला आदर्श असला पाहिजे. आयुष्यात अनेक प्रकारच्या आकर्षक गोष्टी असतात, परंतु त्या आपल्या लक्ष्यप्राप्तीस अनुकूल नसतील तर, त्या कितीही चांगल्या असल्या तरी त्याचा आपण त्याग केला पाहिजे.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह व संस्थापक विवेकानंद शिला स्मारक

## विनम्र अभिवादन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची आज जयंती

# लष्कराला कारवाईची पूर्ण मुभा

## स्थळ, वेळ आणि पद्धत सेनादलांनी ठरवावी : पंतप्रधान

**पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी रणनीती तयार**

**भारत करणार दहशतवादाचा खात्मा**

**राजधानीत उच्चस्तरीय बैठकांचे सत्र**

**आजही दिवसभरात होणार अनेक बैठका**



पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात करावयाच्या कारवाईसाठी मंगळवार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीला सीडीएस, तिन्ही सेनादलाचे प्रमुख, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उपस्थित होते.

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

**पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला कधीही न विसरता येणारा धडा शिकवण्यात यावा, असा दबाब देशभरातून सरकारवर वाढत असताना पाकिस्तानविरोधात कठोर कारवाई करण्याच्या निर्णयाप्रत भारत आला आहे. पाकिस्तानविरोधात कारवाई करण्यासाठी लष्कराला पूर्णपणे मुभा दिली आहे. आमचा तिन्ही सेनादलांवर पूर्ण विश्वास आहे. पाकिस्तानविरोधात कारवाईची पद्धत, वेळ, ठिकाण आणि लक्ष्य सेनादलांनी ठरवावे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे येत्या काही दिवसात सरकार पाकिस्तानविरुध्द कठोर लष्करी कारवाई करणार असे संकेत मिळू लागले आहे.**



मंगळवारी सायंकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७ लोककल्याण मार्ग या अधिकृत शासकीय निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथसिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, वायदलप्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीतसिंग तसेच नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी उपस्थित होते. पाकिस्तानविरुध्द कोणती कारवाई करावी, यावर या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते.

उद्या बुधवारीही दिवसभर विविध बेठकांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता कंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक होणार आहे. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक घडामोडीविषयक तसेच राजकीय व्यवहार विषयक समित्यांच्याही बैठकी होणार आहेत. त्यानंतर सायंकाळी केंद्रीय मंत्रिमंडळाचीही बैठक बोलावण्यात आली आहे. सोमवारीही संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी पंतप्रधान मोदी यांची भेट घे त्यांनी लष्कराच्या सज्जतेची माहिती दिली होती. त्याआधी लष्करपप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी राजनाथसिंह यांना लष्कराच्या तयारीची माहिती दिली होती.

(तभा वृत्तसेवा)

### सरसंघचालकांनी घेतली पंतप्रधानांची भेट

दरम्यान सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी मंगळवारी रात्री पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दिवसभर चाललेल्या उच्चस्तरीय बैठकांनंतर सरसंघचालकांनी घेतलेली भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे.



## काश्मिरातील ४८ पर्यटनस्थळे बंद

◆ **श्रीनगर, २९ एप्रिल**

सुरक्षेचे उपाय म्हणून जम्मू-काश्मिरातील ८७ पैकी ४८ पर्यटनस्थळे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पर्यटकांवर आणखी हल्ले होण्याचे संकेत प्राप्त झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील विविध पर्यटनस्थळांवरील सुरक्षेचा आढावा घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आणखी काही ठिकाणांचा समावेश होऊ शकतो, असे सुरक्षा अधिकाऱ्यांनी सांगितले. बंद केलेल्या स्थळांमध्ये मुख्य शहरांपासून दूर आणि गेल्या दहा वर्षांत सुरू झालेल्या नव्या ठिकाणांचा समावेश आहे. यासंदर्भात अधिकृत आदेश देण्यात आले नसले तरी ४८ ठिकाणी पर्यटकांचे प्रवेश बंद करण्यात आले आहेत. तसेच दूशपथरी, कोकेरनाग, दुश्कुम, सिंथन टॉप, अच्चबाल, बांनगुस खोरे, मार्गन टॉप आणि तोसमैदान या पर्यटनस्थळांवरील पर्यटकांची संख्या मर्यादित करण्यात आली आहे.

(वृत्तसंस्था)

## गुप्त ॲपद्वारे दहशतवाद्यांना स्थानिकांची मदत

**अनंतनाग** : जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यात चार हल्लेखोरांना १० स्थानिक संशयितांनी मदत केल्याचे तपासातून पुढे आले आहे. एन्क्रिप्टेड मेसेजिंग ॲप्सचा वापर करून स्थानिक दहशतवाद्यांनी हल्लेखोरांसोबत समन्वय ठेवल्याचे राष्ट्रीय तपास यंत्रणाच्या (एनआयए) चौकशीतून पुढे आले आहे.

२३ एप्रिलपासून एनआएच्या पथकांनी घटनास्थळी तपास सुरू केला आहे. फॉरेन्सिक व अन्य तज्ज्ञ संपूर्ण परिसरात पुराव्यांचा शोध घेत आहेत. हल्ल्यानंतर दहशतवादी बैसरनहून आरू-नगबलच्या घनदाट जंगलांमध्ये गेले. तिथून नगबल नाला मार्गे पश्चिमेकडे खिरम आणि श्रीशैलम भागात पोहोचण्याचे मार्ग आहेत. तपासात अनेक महत्त्वाचे खुलासे झाले आहेत.

# न्यायमूर्ती बी.आर. गवई देशाचे ५२ वे सरन्यायाधीश

**नवी दिल्ली, २९ एप्रिल**

भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती बी.आर. गवई यांच्या नियुक्तीसंदर्भात कायदा मंत्रालयाने मंगळवारी अधिसूचना जारी केली. सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ जून रोजी निवृत्त होत आहेत.

न्यायमूर्ती गवई त्यांची जागा घेतील. १६ एप्रिल रोजी सरन्यायाधीश खन्ना यांनी सरन्यायाधीशपदासाठी केंद्र सरकारकडे बी.आर. गवई यांच्या नावाची शिफारस पाठविली होती. त्यानंतर भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्या. गवई यांच्या नियुक्तीसंदर्भात कायदा मंत्रालयाने अधिसूचना जारी केली. न्या. गवई यांचा कार्यकाळ सहा महिन्यांचा असेल आणि ते २३ डिसेंबर रोजी वयाची ६५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पदावरून निवृत्त होतील. भुषण रामकृष्ण गवई यांचा २४ नोव्हेंबर १९६० ला महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात जन्म झाला. त्यांनी १६ मर्च १९८५ ला त्यांनी वकिलीच्या क्षेत्रात पदार्पण केले. उच्च न्यायालयात कायमस्वरुपी न्यायाधीश पदावर विराजमान झाले. तेव्हापासून ते सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक घटनापीठांचे सदस्य राहिले आहेत, त्यांनी आतापर्यंत अनेक ऐतिहासिक निकाल दिले आहेत. जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या मोठ्या निर्णयाला मान्यता देणाऱ्या पाच सदस्यीय खंडपीठाचे ते सदस्य होते. ज्यामुळे ३७० कलम रद्द करण्याचा ऐतिहासिक त्यांच्या उपस्थितीत झाला.



# पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांना ५० लाखांचे अर्थसहाय्य

**● कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी ● मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा**

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबातील वारसांना ५० लाख रुपयांचे अर्थसहाय्य, तर पीडित कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत केली. तत्पूर्वी मंत्रिमंडळ बैठकीत मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यासंबंधीची माहिती मंत्रिमंडळ बठकीनंतर स्वतः मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना दिली. दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणाकडे, रोजगाराकडे राज्य सरकार लक्ष देणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले तसेच मृतांपैकी ज्यांच्या कुटुंबात रोजगाराचा प्रश्न आहे, त्यांच्या थेट वारसांना शासकीय नोकरी देण्याचा निर्णय फडणवीस यांनी आपल्या विशेषाधिकारात जाहीर केला. हल्ल्यातील मृतांपैकी जगदाळे यांच्या कुटुंबातील मुलीला नोकरी देण्याचा निर्णय कालच मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केला होता.

काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचा समावेश होता. डोंबिवलीतील अतुल मोने, संजय लेले आणि हेमंत जोशी, नवी मुंबईतील दिलीप देसले तर पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे या ६ जणांचा दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. राज्य शासनाने केलेल्या या घोषणेनंतर पीडित कुटुंबीयांनी खरंच आम्हाला मदतीची गरज होती, असे म्हणत शासनाचे आभार मानले.

(तभा वृत्तसेवा)



**मंत्रिमंडळ निर्णय**

# महाराष्ट्र ई-वाहन धोरण जाहीर

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरणाला मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. हे धोरण २०३० पर्यंत लागू राहील. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी येत्या पाच वर्षांसाठी १,९९३ कोटी रुपयांच्या निधीच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. या धोरणामुळे इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन व वापरास मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे.

चार्जिंग विषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करून आणि पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ व ऊर्जा सुरक्षिततेत योगदान देणाऱ्या शाश्वत आणि नाविन्यपूर्ण परिवहन उपाययोजनांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर व विक्रीत मोठी वाढ अपेक्षित आहे.

या धोरणांतर्गत स्वच्छ गतिशिलता संक्रमण मॉडेल राबवले जाणार आहे. २०३० पर्यंत राज्यातील वाहतूक क्षेत्रातून होणारे कार्बन तसेच प्रदूषणकारी वायू तसेज हरित गृह वायू उत्सर्जने रोखण्याचे उद्दिष्ट आहे. या धोरणांतर्गत राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या सर्व इलेक्ट्रिक वाहनांना



मोटार वाहन करातून तसेच नोंदणी प्रमाणपत्राच्या किंवा नूतनीकरण शुल्कातून माफी देण्यात आली आहे. राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार होण्यासाठी चार्जिंग विषयक पायाभूत सुविधांचा भक्कम विकास करण्यात येणार आहे. राज्य व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक २५ किमी अंतरावर चार्जिंग सुविधांची उभारली जाणार आहे.

(तभा वृत्तसेवा)

### पथकरात सूट

या धोरणांतर्गत मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू, समृद्धी महामार्ग यावर प्रवास करणाऱ्या सर्व चारचाकी प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना व बसेसना पथकर पूर्ण माफ तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील अन्य राज्य व राष्ट्रीय महामार्गावर चारचाकी इलेक्ट्रिक वाहनांना पथकरात ५० टक्के सवलत देण्यात येईल.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# उजनी धरणातील पाणी पातळी मायनसमध्ये

### महापालिका प्रशासनाकडून दुबार पंपींग यंत्रणेसाठी तयारी सुरु

### उजनी धरणातील पाणी पंपहाऊसच्या चॅनलमध्ये आणण्याचे करणार नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

उजनी धरणाची पाणी पातळी कमी होऊन वजा ३५ टक्के झाल्यास उजनी पंप हाऊसकडे नैसर्गिकरित्या गुरुत्वाकर्षणाने

येणारे पाणी बंद पडते. सद्यस्थितीत धरणाची पाणी पातळी उणे ११ टक्के आहे. त्यामुळे उजनी येथील पंप हाऊस करिता पाणी कमी पडू नये या करीता दुबार पंपींग यंत्रणा बसविण्यासाठी आत्तापासूनच महापालिका प्रशासनाकडून दक्षता म्हणून तयारी करण्यात येत आहे.

उजनी धरण भरलेले असते तेव्हा थेट येथील पंपगृहातून पाणी उपसा केला जातो.



धरण उणे ३५ टक्के खाली गेल्यानंतर शंभर मीटर आत जाऊन पाणी उपसा करून पंपगृहाच्या जॅकवेल जवळ पाणी सोडण्यात येते. त्यामुळे दुबार उपसा करावा लागतो. दुबार पंपिंगची यंत्रणा बसविण्यासाठी आत्तापासूनच महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडून तयारी सुरू केली आहे.

उजनी धरणाची पाणी पातळी कमी होऊन वजा ३५ टक्के झाल्यास उजनी पंप हाऊसकडे नैसर्गिकरित्या गुरुत्वाने येणारे पाणी बंद पडते. त्यामुळे जॅकवेल मधील इलेक्ट्रिक पंपसेटला पाणी कमी पडून पंपसेट बंद पडतात.पंप बंद पडू नयेत म्हणुन धरणामधील नदीपात्रात १० एच.पी चे ३० नग, ३० एच.पी चे २ नग व १० एच.पी चे सबमर्शिबल फ्लोटींग १० नग पंपसेटव्दारे धरणातील पाणी पंपहाऊसच्या चॅनलमध्ये आणण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. दरम्यान, सध्या उजनी धरणात उणे ११ टक्के टक्के पाणी पातळी आहे. त्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाकडून आतापासूनच तयारी करण्यात येत आहे. पाणी पातळीची टक्केवारी वजा २८ टक्के असताना दुबार पंपींगचे काम चालु करावे लागते. त्यानुसार ही तयारी करण्यात येत आहे. त्यासाठी टेंडर काढून कोटेशन मागविण्यात येत आहे. महापालिकेचा सेटअप तयार आहे. सुमारे ६० लाख रुपयाचा खर्च प्रस्तावित आहे. उजनी हेड वर्क्स येथून सोलापूर शहरास ६८३ एच.पी पंपसेटचा वापर करून दररोज ८० ते ८५ एमएलडी इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. धरणातील पाणी वजा ५२ टक्के वर पोहोचल्यामुळे मागील वर्षी इतिहासात प्रथमच तिबार पंपिंग करण्यात आले होते.

### दक्षता म्हणून दुबार पाणी उपसाची तयारी : व्यंकटेश चौबे

उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्णत्वाकडे आहे. या महिनाभरात काम पूर्ण होऊन चाचणी करण्यात येणार आहे. नव्या जॅकवेलमुळे उजनी धरणात वजा ८० टक्के पातळी पर्यंत पाणी उपसा करू शकतो. यामुळे ही चाचणी झाली तर दुबार पंपिंगची गरज नाही. नवी जलवाहिनी सुरू झाली तर नदीला पाणी सोडावे लागणार नाही. जर नदीला पाणी सोडले तर पाणी पातळी घटणार आहे. त्यामुळे दुबार पंपिंगची आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी दक्षता म्हणून महापालिका प्रशासनाकडून दुबार पंपिंगची तयारी करण्यात येत आहे. यासाठी सुमारे ६० लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे, अशी माहिती महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

## महत्त्वाचे...

### जबरी चोरी, घरफोडीतील आरोपी बजरंग चव्हाण स्थानबद्ध; पोलिस आयुक्तांची कारवाई

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**



शहर पोलिस हद्दीत घरफोडी, मोटारसायकल चोरी, दगडफेक करणे, घातक शस्त्राने धमकावणे असे गंभीर गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार बजरंग नागनाथ चव्हाण (वय २९, रा. सातारा रोड, जत, सांगली) याला स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याची रवानगी पुणे येथील येरवाडा कारागृह येथे करण्यात आली आहे. बजरंग चव्हाण याच्यावर मागील काही वर्षापासून शहरात जीवघेण्या घातक शस्त्राने ईच्छापुर्वक दुखापत करणे, जबरी चोरी, घरफोडी, मोटारसायकल चोरी, दगडफेक करणे, घातक शस्त्राने धमकावणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. ते गुन्हे तो साथीदारांच्या मदतीने करत होता. त्याच्या विरूध्द सात गुन्हे शहरात दाखल झाले होते. यामुळे त्याच्यावर २०२२ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाईही करण्यात आली होती. पण त्याच्या वर्तनात कोणताही बदल झाला नाही. त्यानंतर ही त्याने सार्वजनिक सुव्यावस्थेस बाधा होईल असे कृत्य सुरूच ठेवले. शिवाय सामान्य नागरिक हे त्याच्या विरूध्द उघडपणे माहिती देत नव्हते. यामुळे त्याच्यावर स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, विजय कबाडे, सहय्यक पोलिस आयुक्त राजन माने, प्रताप पोमण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील दोरगे, एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे, पोलिस निरीक्षक विजय खोमणे, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

### कौटुंबिक कलहातून पत्नीचा पतीवर सत्तूरने हल्ला

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**




कौटुंबिक कलहातून पती-पत्नीत वाद झाला या वादा नंतर संतापलेल्या पत्नीने पतीवर सत्तूरने हल्ला केला. हा प्रकार जुळे सोलापूर येथल कल्पना नगरात सोमवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडला. शिवानंद अण्णाराव चिताळे (वय ४०) असे हल्ला झालेल्या पतीचे नाव आहे. सध्या चिताळे पती-पत्नी शेगाव परिसरात राहण्यास आहेत. सोमवारी दुपारी त्यांच्यात कौटुंबिक कारणातून कलह झाला. यामध्ये चिडलेल्या शिवानंद यांच्या पत्नीने सत्तूरने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात उजव्या हातात जखम झाल्याने शिवानंद स्वतः दुपारी तीन वाजता शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### तरूणास मारहाण करून कमरेचे हाड मोडले

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**



तरूणास मारहाण करून कमरेचे हाड फ्रॅक्चर करणाऱ्यांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अमर काशिनाथ बिज्जरगी (वय २५, रा. गुरुवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन किरण भुतनाळे (रा. शाहीर वस्ती, सोलापूर) व इतर अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ एप्रिल रोजी रात्री साडेआकराच्या सुमारास कुंभार वेस येथे आर के हॉटेलसमोर अमर बिज्जरगी याचा चुलत भाऊ व मावस भाऊ असे बोलत थांबले होते. त्यावेळी किरण भुतनाळे व त्याचे साथीदार हे मोटारसायकलवरून तिथे आले. त्यांनी थांबून तुम्हांला काय मदत पाहिजे का असे विचारून वाद घालून इतर अनोळखी व्यक्तींना बोलावून घेऊन शिवीगाळ करून अमर बिज्जरगी, भाऊ मल्लिकार्जुन यांना हाताने व लाथाबुक्क्याने जबर मारहाण केली. यामध्ये मल्लिकार्जुन यांचे कमरेचे हाड मोडून फ्रॅक्चर झाले आहे. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### शहरी आरोग्य प्रशिक्षण केंद्रातून २० हजारांचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

शहरातील गुरुनानक चौकातील शहरी आरोग्य प्रशिक्षण केंद्रातून चोरट्याने १९ हजार १०० रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. याबाबत डॉ. अश्विनी चंद्रकांत जिडगे (रा. नाथप्राईड अपार्टमेंट, सिव्हील हॉस्पीटलजवळ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ एप्रिल ते २१ एप्रिल या कालावधीत शहरी आरोग्य प्रशिक्षण केंद्रात चोरट्याने स्टोअर रूमच्या मागील बाजूच्या दरवाजाचे वर असलेल्या खिडकीतून हात घालून दरवाजाच्या वरील बाजूस असलेले हुक काढून आतमध्ये प्रवेश केला आणि लोखंडी पलंग, स्टीलचे पाळणे, लोखंडी स्टॅन्ड, लोखंडी कपाट, गुडघा तपासणी यंत्र, बीपी हॅन्डल, स्टीलची पाण्याची टाकी, लाकडी स्टुल, लोखंडी रॅक असे साहित्य चोरून नेले. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

### कुमठे येथे ८७ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

कुमठे (ता. उत्तर सोलापूर) येथे चोरट्याने उघड्या घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील ८७ हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबत दिलीप बाबूराव भोपळे (वय ५५, रा. कुमठे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ एप्रिल रोजी पहाटे दोन ते पाच या कालावधीत चोरट्याने दिलीप भोपळे यांच्या घरात उघड्या दरवाजातून प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटातील लॉकरमधील सोन्याचे १० ग्रॅमचे गंठण, ५० ग्रॅमचे चांदीचे पैंजण, अडीच ग्रॅमचे सोन्याचे रिंगा, अडीच ग्रॅमचे सोन्याचे झुबे व रोख रक्कम असा ८७ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिर्के पुढील तपास करीत आहेत.

# पत्नीवर चाकूने वार करून खुनाचा प्रयत्न

### पतीविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

शहरातील एमआयडीसी रोडवरील अनंतारा लॉन शेजारील चौकात पत्नीवर चाकूने वार करून तिच्या खुनाचा प्रयत्न करणाऱ्या पतीविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मंगळवारी पहाटे अडीचच्या सुमारास घडली.

लक्ष्मी विनोद सरवदे (वय २५, रा. तेलघाणा सोसायटी, मोकळे मैदान, मर्दा मंगल कार्यालयाच्या बाजूला, लक्ष्मी मंदीर समोर, अक्कलकोट रोड, सोलापूर, कायम रा. घर नं. १०८, जोशी गल्ली, रविवार पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन विनोद नामदेव सरवदे (रा. जोशी गल्ली, रविवार पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगळवारी पहाटे अडीचच्या सुमारास लक्ष्मी सरवदे व त्यांचा प्रियकर मनोज चौगुले असे दोघे अनंतारा लॉन शेजारील चौकात रिक्षाची वाट पहात थांबले होते. त्यावेळी लक्ष्मी यांचा पती विनोद सरवदे हा त्याच्या बुलेट मोटारसायकलवरून त्याठिकाणी आला. विनोद याने लक्ष्मीजवळ येऊन तुझ्याशी दोन गोष्टी बोलायचे आहेत असे म्हणून लक्ष्मीला बाजूला घेऊन गेला. तिथे तु माझ्यासोबत राहणार नसशील तर मी तुला कोणासोबतच राहू



देणार नाही, आता मी तुला संपवतो असे म्हणून त्याच्याजवळील चाकू काढून लक्ष्मी हिच्या छातीत दोन वेळा खुपसला. तसेच लक्ष्मीच्या डाव्या हातावर वार करून तिच्या खुनाचा प्रयत्न केला. यावेळी लक्ष्मीचा प्रियकर मनोज यास विनोद याने हातातील चाकू दाखवून तु जर आमच्या मध्ये आलास तर तुलापण संपवतो अशी धमकी देऊन निघून गेला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक राधिका केंद्रे पुढील तपास करीत आहेत.

### बनावट चावीने कपाटाचे लॉक तोडून ९ लाखांची रक्कम लंपास

**सोलापूर** - बनावट चावीने कपाटाचे लॉक तोडून ९ लाखांची रक्कम लंपास करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रमीज सलीम साबुनगर (वय ३८, रा. सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ एप्रिल रोजी दुपारी रमीज साबुनगर राहत असलेल्या घराच्या मुख्य दरवजास कुलूप लावून ते बाहेर गेले होते. सायंकाळी ते परत घरी आले. या दरम्याने अज्ञात चोरट्याने बनावट चावीच्या आधारे किंवा रमीज यांच्या वडीलांकडून हरवलेल्या चावीच्या आधारे लावलेले कुलूप तोडून कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेले ९ लाख रुपये पिशवीसह चोरून नेले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक धायगुडे पुढील तपास करीत आहेत.

### पाच लाखांची खंडणीची मागणी करणाऱ्या पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

पतीसोबतचे भांडण मिटवून घे नाही तर तुझी चॅनेलला बातमी लावून बदनामी करतो असे म्हणून महिलेकडे पाच लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनिसा जहुर बोरामणीकर (वय ४५, रा. सिध्देश्वर नगर भाग ४, मजरेवाडी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन मुनीर शेख (रा. नविन विडी घरकुल, सोलापूर), यास्मीन मुजाहिद शेख आणि जहुर अब्दुलगनी बोरामणीकर (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिसा आणि त्यांचे पती जहुर बोरामणीकर यांच्यात वाद आहे. मुनीर शेख याने अनिसा हिस ५ एप्रिल ते १० एप्रिल या कालावधीत वारंवार फोन करून तुझी दैनिकांमध्ये बातमी देऊन बदनामी करेन, त्याबदल्यात तु मला पाच लाख रुपये दे अशी मागणी करून मानसिक त्रास दिला. तसेच यास्मीन शेख हिनेदेखील मोबाईलवरून तुझे पतीसोबतचे भांडण मिटवून घे, नाही तर मी तुझी चॅनेलला बातमी लावून बदनामी करते असे म्हणून तसेच अनिसा यांचा पती जहुर याने शेख यांनी सांगितल्याप्रमाणे आम्हांला ५ लाख रुपये दे नाही तर बातमी द्यायला सांगून बदनामी करून तुझी नोकरी घालवतो अशी धमकी दिली व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

### विजयवैभवलक्ष्मी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आज विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

विजयवैभवलक्ष्मी माता मंदिराच्या वर्धापन दिन अक्षय्य तृतीय दि.३० एप्रिल रोजी संपन्न होणार असून वर्धापन दिनानिमित्त मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम ठेवण्यात आले. बुधवार, दि. ३० एप्रिल रोजी पहाटे ५ ते सकाळी ८.३० वाजेपर्यंत मातेच्या मूर्तीला रुद्र पठणाने पंचामृताभिषेक, क्षिराभिषेक, पंचगव्याभिषेग, राजोप्चार महापूजा त्यानंतर विशेष अलंकार महापूजा सकाळी ९ वाजता देवीची महाआरती सकाळी ९.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्रीसुक्तहवन दुपारी ४.३० ते सध्या ६ वाजेपर्यंत भजनाचा कार्यक्रम व सायंकाळी ६.३० वाजता दिपोत्सव कार्यक्रम व त्यानंतर ६.३० वाजता दिपोत्सव कार्यक्रम झाल्यावर महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

# बोरामणी येथे महापालिकेची सिटी बस जळून खाक!

### सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

### आगीचा अंदाज घेऊन प्रवासी उतरले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर : सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाची एक सिटी बस मंगळवारी बोरामणी रस्त्यावर जळून खाक झाली. प्रसंगावधान राखून बस चालकाने बस लगेचच थांबविली आणि बसमधील सर्व प्रवाशांना खाली उतरविले. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. महापालिका अग्निशामक दलाने ही आग विझवली.

हैदराबाद रोडवरील बोरामणी येथील कीर्ती गोल्ड ऑइल मिल समोर मंगळवारी दुपारी ही दुर्घटना घडली. महापालिका परिवहन उपक्रमाची ही बस




सोलापूरवरून बोरामणी मार्गे मुस्तीकडे चालली होती.

बोरामणी येथील कीर्ती गोल्ड ऑइल मिलसमोर ही बस येताच अचानक बसला आग लागली. यामुळे एकच धांदल उडाली. चालक, वाहक व प्रवासी अचानक घडलेल्या या घटनेने गांगरून गेले. प्रसंगावधान राखून बस चालकाने बस लगेचच थांबविली आणि बसमधील सर्व प्रवाशांना खाली उतरविले. यानंतर आग वाढतच जाऊन संपूर्ण बसने पेट घेतला. यामध्ये संपूर्ण बस जळून खाक झाली.

शहरातील वाढत्या तापमानामुळे बसने पेट घेतल्याचा अंदाज आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी अशी शक्यता वर्तवली जात आहे.

आगीची माहिती मिळताच महापालिकेचे अग्निशामक दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी सहाय्यक अधीक्षक अच्युत दुधाळ यांच्यासह पथकाने युद्ध पातळीवर आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. अग्निशामक दलाच्या एका गाडीने पाणी मारून ही आग आटोक्यात आणली. या आगीत बसचे आर्थिक नुकसान झाले.

दरम्यान, हैदराबाद महामार्गावर ही बस पेट घेतल्याने आगीचे धूर मोठ्या प्रमाणात उठले होते. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही वेळेसाठी विस्कळीत झाली. या आगीत बस जळून खाक झाली असली तरी सुदैवाने सर्व प्रवासी सुखरूप राहिले. दरम्यान, महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली.

### बँजो वाजवण्याच्या कारणावरून चौघांना मारहाण

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

येथील शांती चौक परिसरातील क्षीरसागर शोरूमच्या पाठीमागे बँजो वाजवण्याच्या कारणावरून चौघांना मारहाण करण्यात आली. ही हाणामारी सोमवारी सायंकाळच्या सुमारास झाली. नागेश दीपक बनसोडे (वय ३०), करण दीपक बनसोडे वय (२५), सागर हरी पोळ वय (२५ )व किरण पेढे ( २५, सर्व रा. रविवार पेठ सोलापूर अशी मारहाण झालेल्या चौघांची नावे आहेत. क्षीरसागर शोरूम च्या पाठीमागील वस्तीमध्ये आकाश मोहिते व किरण मोहिते यांच्यासोबत बँजो वाजवण्याच्या कारणावरून वरील चौघांची तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर आकाश व किरण मोहिते यांनी त्यांच्या दहा साथीदारासह नागेश,करण, सागर व किरण फेढे यांना लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत चौघेही जखमी झाली. सर्वांना मुकामार लागल्याने नातेवाईक जालिंदर यांनी रात्री ९:४५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# क्रांतिकारी तत्ववेत्ता : महात्मा बसवेश्वर

भारत ही संतांची, समाज सुधारकांची, क्रांतिकारकांची भूमी आहे. समाजातील विषमता, अमानवता, स्त्री-पुरुष व उच्चनीच अशा भेदभाव रूपी सामाजिक समस्या दूर करून सामाजिक समरसता निर्माण करणाऱ्या महात्मा बसवेश्वराने वयाच्या आठव्या वर्षापासून समाज परिवर्तन व प्रबोधनाचा वसा घेतला. आजच्या आधुनिक युगामध्ये पोटच्या लेकीवर, बहिणीवर अन्याय होत असल्याच्या बातम्या वाचताना आपल्या बहिणीच्या अस्मितेचा, स्त्री पुरुष समानता रूपी विचार रुजविण्यासाठी घराबाहेर पडून कुडल संगम येथे आध्यात्मिक शिक्षण घेणाऱ्या महात्मा बसवेश्वराने आपल्या सामाजिक सांस्कृतिक पीठ असलेल्या अनुभव मंडपामध्ये ''माझ्या भक्तीची शक्ती तू, माझ्या युक्तीची शक्ती तू, आणि माझ्या मुक्तीची शक्ती तू'' म्हणत स्त्रीच्या हाती लेखणी दिली. त्यांनी अक्कमहादेवी, रेम्मव्वा, सूळीय संकव्वा, बोम्मादेवी, मुक्ताई अक्का, नीलांबिका, गंगांबिका, लिंगम्मा सारख्या अनेक शरणींना आत्म्याची ओळख करून दिली. एवढेच नाही तर त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या बालविवाह सारख्या अनिष्ट प्रथांचा विरोध केला.



विधवा विवाह , आंतरजातीय विवाह यासारख्या पुरोगामी विचारांचा निर्भयपणे पुरस्कार केला.

महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील अंधविश्वास दूर करत असताना केवळ दगडाची पूजा न करता जिवंत सापांची पूजा केली तर पर्यावरणाचे संवर्धन होईल हा विचार सांगत असताना त्यांनी दुसरीकडे कायकवे कैलास म्हणत कर्मयोगाचा संदेश दिला. कुठल्याही देशाचा विकास तेथील कर्मठ तरुणांच्या बळावर होत असतो. हाती मोबाईल फोन घेऊन बसलो तर विकास होत नाही तर त्यासाठी सतत परिश्रम, चिकाटी यांची गरज असते. आज उन्नत भारताचा विचार करत असताना महात्मा बसवेश्वराने दिलेल्या कायकाचा संदेश आपल्याला खूप काही सांगून जातो. आज भारत विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असताना कर्मयोगाचे महत्त्व असल्याचे दिसून येते.

बिज्जल राजाच्या दरबारी अर्थमंत्री व प्रधानमंत्रीच्या रूपात काम करीत असताना सुद्धा महात्मा बसवेश्वरांनी आपल्या हृदयामध्ये दयाभाव ठेवत मानव धर्माला महत्त्व दिले .'' **इवनारव इवनारव इवनारवनेंदेनिसदिरय्य इव नम्मव इव नम्मव इव नम्मवनेंदे निसय्य कूडलसंगम देव निम्म मनेय मगनेनिसय्य**'' असे म्हणत एकेंद्रीय पासून पंचेंद्रियापर्यंत सर्व जीवांना आपलेसे मानले. त्यांना जातीव्यवस्था मान्य नव्हती म्हणून त्यांनी '' **अप्पा नू नम्म मादार चन्नय्या, बोप्पनू नम्म डोहर कक्कय्या..** '' असे स्पष्टपणे सांगितले. बसवेश्वरांनी आपल्या आयुष्यात सत्याची आराधना केली. त्यांच्या दृष्टीने सत्य, सदाचार हेच महत्त्वाचे आहे. सत्य बोलणे म्हणजे स्वर्ग आहे, असत्य म्हणजे नर्क आहे. आचार हेच स्वर्ग आहे, अनाचार हेच नर्क आहे. हीच अंतरंग आणि बहिरंग शुद्धी आहे. त्यांनी दया हेच धर्म आहे असे ठणकावून सांगितले. वर्तमान युद्धजन्य परिस्थितीत बसवेश्वरांची दया, प्रेम, अहिंसेची शिकवण म्हणजेच जगात शांतता प्रस्थापित होणे आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

**- प्रा. धन्यकुमार बिराजदार, सोलापूर**
मो. ९४२३३३०७३७

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून चटके दिले दोघांविरुध्द पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

शहरातील जुना विडी घरकुल परिसरातील अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिला उदबत्तीने चटके देणाऱ्या दोघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीतेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन अब्दुल गफार इक्बाल काझी (रा. सोलापूर) आणि इक्बाल उस्मान शेख (रा. पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ मार्च व १९ मार्च या दिवशी रात्रीच्यावेळी पिडीता ही तिच्या घरी झोपल्यानंतर अब्दुल काझी व इक्बाल शेख याने पिडीतेच्या घरात घुसून तिचा विनयभंग करून तिच्या मनगटास उदबत्तीचे चटके दिले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात पोक्सोंतर्गत तसेच विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गणेश इंगळे पुढील तपास करीत आहेत.

### पहलगाम घटनेचा व्हिडीओ दाखविल्याने तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

पहलगाम घटनेचा व्हिडीओ दाखविल्याने तरूणास मारहाण करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वरूण व्यंकटेश वंगारी (रा. कोंची कोरवी गल्ली, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन शब्बीर पठाण (रा. कोंची कोरवी गल्ली, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ एप्रिल रोजी रात्री वरूण वंगारी, त्याचा मित्र ओमकार याच्या मोबाईलवर पहलगाम येथील घटनेविषयी व्हिडीओ तयार केला होता. तो व्हीडीओ ओळखीच्या शब्बीर पठाण यास दाखविला असता त्याने शिवीगाळ करून वंगारी यास लाथाबुक्क्याने व हाताने मारहाण केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




**नृत्योत्सव २०२५ :** सोलापूर - हुतात्मा स्मृती मंदिरमध्ये मंगळवारी सायंकाळी जागतिक नृत्य दिन साजरा करण्यात आला. शास्त्रीय नृत्य कथक व भरतनाट्यम यांच्या संयुक्त विद्यमाने विविध शाळांतील तीनशे विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.



**अक्षय तृतीया आंबा खरेदी :** सोलापूर - अंब्याचे दर तेजीत असतानाही अक्षय तृतीयेनिमित्त मंगळवारी सायंकाळी आंब्याची खरेदी करताना ग्राहक. (छायाचित्रे : केवल तिवारी)

# राज्य वक्फ मंडळाच्या समस्या सोडवण्यासाठी सर्वतोपरी मदत करणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २९ एप्रिल :**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राज्यात विविध इमारतींची कामे सुरु असून ही कामे पुढील पन्नास वर्षांचा विचार करुन दर्जे दार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आज दिल्या. तसेच वक्फ मंडळासमोरील समस्या सोडवण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही दिले.

राज्य वक्फ मंडळाशी संबंधित विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद तसेच विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, राज्यातील मुस्लिम बांधवांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य सेवा व इतर आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी सरकार कटिबद्ध आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाच्या गरजा लक्षात घेऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

समाजातील युवकांना रोजगाराभिमुख शिक्षण व प्रशिक्षण मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. बैठकीत वक्फ मंडळाच्या संपत्ती व्यवस्थापन, निधी वितरण, शिक्षण व इमारत प्रकल्पांशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. .




# भोसले घराण्याची तलवार राज्य सरकारने खरेदी केली

## लवकरच महाराष्ट्रात दाखल होणार

## देवेंद्र फडणवीस यांची माहिती




◆ **मुंबई, २९ एप्रिल**

नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची लंडनमध्ये लिलावात निघालेली ऐतिहासिक तलवार राज्य सरकारने खरेदी केली आहे, हे सांगताना मला आनंद होतो. त्यामुळे आपल्या मराठा साम्राज्यातील एक मौलिक आणि ऐतिहासिक ठेव आता महाराष्ट्रात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स या अधिकृत सोशल मिडियावर दिली.

रघुजी भोसले हे छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार होते. त्यांची युद्धनीती आणि शौर्य यावर प्रसन्न होत छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'सेनासाहिबसुभा' ही उपाधी दिली होती. रघुजी भोसले यांनी १७४५ च्या दशकात बंगालच्या नवाबांविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्व करीत मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला होता. दक्षिण भारतात सुद्धा त्यांनी आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला होता.

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव आणि माझ्याच कार्यालयात कार्यरत विकास खारगे यांनी वेगाने सूत्रे हलवून ही कामगिरी पूर्ण केली. काही तांत्रिक अडचणी होत्या, त्यामुळे एका मध्यस्थामार्फत ती खरेदी करण्यात आली. यासाठी ४७.१५ लाख रुपये राज्य सरकार देणार आहे.

ही तलवार मराठा शैलीच्या फिरंग पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. एकधारी पाते, सोन्याचे नक्षीकाम हे या तलवारीचे वैशिष्ट्य आहे. युरोपीय बनावटीचे पाते हे त्या काळात प्रसिद्ध होते. या पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा' असे सोन्याच्या पाण्याने लिहिले आहे. १८१७ मध्ये नागपुरात ईस्ट इंडिया कंपनीने भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली होती. त्यात ही तलवार नेली असावी, असा जाणकरांचा अंदाज आहे. (तभा वृत्तसेवा)

### राजे मुधोजी भोसले यांनी व्यक्त केला आनंद

महाराष्ट्र शासनाने ही तलवार पुन्हा महाराष्ट्रात परत आणून महाराष्ट्र आणि नागपूरकर भोसले राजघराण्याचे अस्मितेचे रक्षण केले आहे. शिवाय आमच्या काही स्नेही मंडळींनी लिलावात सहभाग घेत, ३५ लाखांपर्यंतची बोली लावली होती. अगदी १२ तासाच्या आत नागपूरकर भोसल्यांचं शौर्य महाराष्टात वापस येणार, ही आनंदाची बातमी दिली.

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी स्कॅन करा



# पंतप्रधान यंग अचिव्हर्स स्कॉलरशिप ॲवार्ड स्किम सुरू

**मुंबई, दि. २९ एप्रिल**

पंतप्रधान यंग अचिव्हर्स स्कॉलरशिप ॲवार्ड स्किम फॉर व्हायब्रंट इंडिया या एकत्रिकृत शिष्यवृत्ती योजनेच्या केंद्राच्या मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यास मंजुरी देण्यात आली.

या योजनेअंतर्गत ओबीसी आणि डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिक पूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत केंद्र सरकारने २०२१-२२ ते २०२५-२६ वर्षांकरिता जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत. यानुसार इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना द्यायच्या शिष्यवृत्तीचे प्रमाण केंद्र हिस्सा साठ टक्के आणि राज्य हिस्सा चाळीस टक्के, असे असणार आहे. याबाबतचा शासन निर्णय २३ जून २०२३ रोजी जारी झाला आहे. त्यास आज कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.

# सुरक्षारक्षक मंडळाच्या नोंदणीकृत कर्मचाऱ्यांचा खाकी गणवेश; १ मेपासून अंमलबजावणी

## कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि. २९ एप्रिल :**

राज्यातील नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी खाकी रंगाच्या गणवेशास शासनाने मान्यता दिली. यामध्ये टोपी निळ्या रंगाची असून, त्यावर सुरक्षारक्षक मंडळाचा लोगो व नाव असणार आहे. त्याचबरोबर कामगार दिनाचे औचित्य साधून हा खाकी गणवेश दिनांक १ मे पासून राज्यभरात अंमलात येणार असल्याची घोषणा कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केली.

राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी नव्याने निश्चित करण्यात आलेल्या खाकी रंगाच्या गणवेशाचे अनावरण आज फुंडकर यांच्या हस्ते आज नरिमन भवन येथे करण्यात आले. सुरक्षा रक्षकांच्या गणेशाच्या रंग खाकी असावा, अशी मागणी विविध संघटना व सुरक्षारक्षकांनी शासनाकडे केली होती.त्यानुसार राज्यभरात जिल्हानिहाय १६ सुरक्षारक्षक मंडळे कार्यरत असून आता १ मे पासून राज्यातील सर्व सुरक्षा रक्षकांच्या गणवेशात एकसमानता असणार आहे.



या उपक्रमामुळे सुरक्षा रक्षकांची ओळख एकसंध राहील व त्यांच्या शिस्तबद्धतेत भर पडेल. तसेच या नव्या गणवेशामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक सुसंगत व व्यावसायिक स्वरूप प्राप्त होणार असल्याचेही कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले.



## अग्रलेख...

# लष्कराचे लाड अंगलट!

'असंगाशी संग, प्राणाशी गाठ' अशी एक मराठी म्हण आहे. नको त्या व्यक्तीशी, प्रवृत्तीशी जवळीक साधल्याने प्राणावर बेतू शकते, असा तिचा अर्थ. याच म्हणीच्या आधारे असे म्हणता येते की, पाकिस्तानच्या निर्मितीपासून आतापर्यंतच्या सर्व शासकांना तिथल्या लष्कराशी रोमांस करीत राहण्याचा जो नाद जडला होता, तो अखेर त्याच देशाच्या अंगलट आला आहे. पाकिस्तानी नागरिकांची घाबरगुंडी उडाली आहे हे तर सोडाच; आता पहलगाम हल्ल्याचा सूड भारत घेईलच, या भीतीने तिथल्या लष्करात एकीकडे बंड माजले आहे आणि दुसरीकडे लष्करी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या राजीनाम्याचे सत्रही सुरू झाले आहे. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांचा राजीनामा मागणारे हॅश टॅग्ज समाज माध्यमांवर ट्रेंड होत आहेत आणि पाकिस्तानची मान लाजेने खाली जातेय. भारतासोबत स्वतंत्र झालेले, किंबहुना फाळणीच्या जखमेतून जन्माला आलेले पाकिस्तान नावाचे कथित इस्लामी गणराज्य कधीही शांततेत जगले नाही. एक तर ते भारताशी भांडत राहिले किंवा एकाच धर्माचे लोक असूनही आपसातील उपपंथीय क्लेशात तंडत राहिले. दुसरे म्हणजे सतत लष्करशहांची ढवळाढवळ हे पाकिस्तानचे व्यवच्छेदक लक्षण. जेवढी ऊर्जा पाकिस्तानचे सरकार, तेथील लष्कर आणि जनता यांनी भारतद्वेषात आजवर वाया घालविली, तिचा वापर सकारात्मक पद्धतीने केला असता तर आज गरिबी, उपासमार, रोगराई आणि अशा संकटांचे सावट त्या देशावर राहिले नसते. पण, जन्मापासून पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना लष्करशाहीचा मोह आहे आणि लष्करशहांनादेखील सरकार व लोकव्यवहारात हस्तक्षेप करणे आवडते. लष्करशहांना गोंजारणे तिथल्या सर्व राज्यकर्त्यांना आवडत असते आणि वेळ आल्यावर लष्करशहाच तिथल्या राज्यकर्त्यांना शह देतात, असा इतिहास आहे. जनरल असीम मुनीर हा पाकिस्तानचा असाच नवा लष्करशहा आहे. पहलगामच्या हत्याकांडाचा आदेश मुनीरने दिला होता, असे आता जग म्हणू लागले आहे. पाकिस्तानातही लोकांना व लष्करी कर्मचाऱ्यांना ते पटू लागलेले दिसते. त्याचाच परिणाम म्हणून मुनीरच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्याची परिणती मुनीरच्या राजीनाम्यात होते की पुन्हा एकदा लोकनियुक्त सरकारच धोक्यात येते, हे आता पाहायचे.

पाकिस्तानातील लोकशाही हा फारच मोठा विनोद आहे. तिथे लष्कर म्हणजे समांतर सरकार असते. बहुतेकदा ते कायद्याच्या वर असल्यासारखे वागत असते. भारत किंवा अमेरिकेसारख्या लोकतांत्रिक देशातील सरकार आणि लष्कर यांचे संबंध वेगळ्या पातळीवरचे असतात. लष्कर हे नागरी नेतृत्वाच्या म्हणजे लोकतांत्रिक प्रक्रियेतून नेतेपदी निवडून आलेल्या पंतप्रधान किंवा राष्ट्रपतीच्या अधीन असते. पाकिस्तानात सत्ताधीश कोणत्याही पद्धतीने सत्तेत आलेला असो, वरचष्मा लष्कराचा असतो. पाकिस्तानच्या लष्कराला जाणकार मंडळी 'स्टेट विदिन अ स्टेट' अर्थात पाकिस्तानातील निर्वाचित सरकारच्या बरोबरीने अस्तित्वात असलेले वेगळे सरकार, असे नाव देतात. लष्कराने निर्वाचित सरकार पाडले, निवडणुकांमध्ये फांदेबाजी केली; एवढेच नव्हे तर न्यायपालिकेत ढवळाढवळ केली, हा पाकिस्तानचा इतिहास आहे. स्वातंत्र्याच्या अवघ्या दशकानंतर १९५८ मध्ये, म्हणजे ज्या काळात भारतात लोकशाही बहरायला आणि विकासाची प्रक्रिया गतिमान होण्यास सुरुवात झाली होती, त्या काळात जनरल अय्यूब खान यांनी पाकिस्तानचे कमकुवत सरकार पाडले आणि लष्करशाही प्रस्थापित केली. १९७७ मध्ये जनरल झिया उल-हक यांनी पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांना षड्यंत्र रचून सत्तेबाहेर केले आणि १९८८ पर्यंत सत्ता उपभोगली. १९९९ मध्ये जनरल परवेज मुशर्रफ यांनी नवाज शरीफ यांचे सरकार उलथविले आणि जवळजवळ दशकभर पाकिस्तानवर राज्य केले. दरम्यानच्या काळात थोडा-थोडा काळ कथित लोकतांत्रिक सत्ताधीशांना मिळाला. परंतु, त्यापैकी बहुतेकांचे स्वरूप हे कुठल्या तरी अदृश्य शक्तींच्या हाती नाचणाऱ्या बाहुल्यांचेच होते. पाकिस्तानमध्ये राजकारणात लष्कराचा हस्तक्षेप आहेच. शिवाय, तो अर्थकारणात आणि माध्यमांमध्येही आहे. भुत्तो असो, नवाज शरीफ असो किंवा इम्रान खान असो, कोणत्याही नेत्याने जरासे स्वतंत्र आणि लोकतांत्रिक व्हायचे ठरविले की, पाकिस्तानी लष्कर काही तरी चाल खेळून त्या नेत्याचा पाडाव करीत असते. तसेच यावेळी घडले काय, हे अद्याप स्पष्ट व्हायचे आहे. कारण शाहबाज शरीफ हे स्वतंत्र प्रज्ञेचे वगैरे नाहीत. मात्र, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यामागे जनरल असीम मुनीर यांचा हात असल्याची चर्चा होऊ लागल्याबरोबर प्रथमच त्यांच्या विरोधात असा जाहीर रोष व्यक्त केला जाऊ लागला आहे आणि त्याची दखल सरकारला घ्यावी लागणार आहे. 'फेल्ड स्टेट' अर्थात अपयशी ठरलेले राष्ट्र हा ठपका पाकिस्तानवर आधीचाच. जगात काय चालले आहे, याकडे लक्ष न देता नुसते धर्माच्या किंवा धर्मांध भूमिकेच्या आधारे उभे केलेले एकही राष्ट्र जगात यशस्वी झालेले नाही. पाकिस्तान या नियमाला अपवाद ठरू शकत नाही. प्रचंड बेकारी, जागतिक नाणेनिधीच्या दबक्यात सुरू असलेली अर्थकारणाची वाटचाल हे सगळे पाहून लष्करशहांना चिंता वाटणे स्वाभाविकच. आपली छानछोकी बंद होते की काय, असे त्यांना वाटत असावे. लष्करावर पाकिस्तान अफाट खर्च करतो. तिथल्या लष्करशहांचे केवळ पाकिस्तानात नव्हे तर जगात ठिकठिकाणी प्रासाद आहेत, संपत्ती आहे. पाकिस्तानच्या अर्थकारणाची पडझड जनतेच्या असंतोषाला जन्म देतेय, असे लक्षात आल्याबरोबर पहलगाम हल्ला झाला. त्यामागे जनरल मुनीर यांचे डोके होते, असा जाहीर आरोप झाला आहे.

या घटनाक्रमाच्या अनुषंगाने भारत आणि पाकिस्तान यांच्यातला आणखी एक फार मोठा फरक लक्षात आणून दिला पाहिजे. तो असा की, आरंभापासून भारतातील नेत्यांनी राज्यघटनेतील तत्त्वांना महत्त्व दिले आणि त्यायोगे नागरिकांचे हक्क कायम राखले. लोकशाहीवरील मतदारांचे सार्वभौमत्व मान्य करणे हे पर्यायाने लोकशाहीचे खरे रक्षणकर्ते मतदार आहेत, हेच मान्य करणे होय. भारताने ते आजतागायत निगुतीने पाळले. पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी वारंवार लष्कराशी साटेलोटे केले, शरणागती पत्करली किंवा लष्कराने लोकनियुक्त नेत्याला फटके दिले. असे भारतात एकदाही घडले नाही. भारतातील कोणताही पदासीन लष्करी अधिकारी राजकारणावर जाहीर भाष्य करताना दिसत नाही. लष्कराच्या तिन्ही दलांचे प्रमुख हे संरक्षण मंत्र्यांच्या अधीन असतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संरक्षणाच्या धोरणावर संसदेचा अंकुश असतो. अमेरिकेतही मुलखी (सिव्हिल) व्यवहाराच्या संदर्भातील लष्कराच्या हस्तक्षेपावर मर्यादा टाकणाऱ्या कायदेशीर तरतुदी आहेत. पाकिस्तानात अशातले काहीही नाही. पाकिस्तानातील सध्याचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे सरकार 'शरीफ' तर नाहीच; शिवाय ते सशक्तही नाही. जनरल असीम मुनीर यांच्या इशाऱ्यावर चालणारे सरकार ही या सरकारची आंतरराष्ट्रीय ओळख. ते जनतेला नाराज करू शकते, पण लष्कराची मर्जी कशीही करून सांभाळली जाते. जनरल मुनीर यांची हिंमत वाढली ती त्यामुळेच. त्यांचे हे वर्तन पाकिस्तानच्या समस्या तर वाढवत आहेच. शिवाय, ते एकूण दक्षिण आशियाच्या समस्याही वाढविणारे आहे. आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी दहशतवादी हल्ले घडवल्यामुळे भारत प्रत्युत्तर देऊ शकतो, याचा अंदाज न येण्याइतपत भोळे मुनीर महाशय निश्चितच नाहीत. तरीही त्यांनी ते केले, असा त्यांच्यावर आरोप आहे. यातून पाकिस्तानची जी काही अडचण झाली आहे, ती आहेच तसेच दहशतवादाला खतपाणी घालत असल्याचा दोषही पुन्हा एकदा पाकिस्तानच्या माथ्यावर आला आहे. भारताकडून व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी नेटवर्कवर हल्ला केला जाईल, असे संकेत मिळत आहेत. तसे झाले तर त्याची जबाबदारी जनरल मुनीर यांच्यावर असेल. तशीच ती पाकिस्तानच्या सरकारवरही असेल. यापुढच्या काळात पाकिस्तानचे सरकार, जनता आणि लष्करातील सुजाण लोकांनी जनरल मुनीर यांच्यासारख्या लोकांना थारा मिळणार नाही, यासाठी आग्रह धरला तरच काही चांगले निघण्याची शक्यता आहे. फक्त भारताच्या द्वेषापोटी लष्कराशी सुरू असलेला रोमांस तिथल्या सरकारने, जनतेने सुरूच ठेवला तर हे 'फेल्ड स्टेट' एक दिवस अशा स्थितिप्रत येईल की तिथून ते पुन्हा सावरू शकणार नाही.

## विशेष

# देशाला उत्पादक हब बनवण्यास कंपन्या तयार

प्रा. सुखदेव बखळे

जगातील अनेक देशांनी चीनमध्ये गुंतवणूक केली होती. या कंपन्या चीनमधून उत्पादन करून जगभर निर्यात करत होत्या; परंतु कोरोनाकाळात चीनवर निर्बंध आले. पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्यामुळे उत्पादनासाठी या कंपन्यांनी व्हिएतनामसह अन्य देशांची निवड केली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ घोषणेनंतर कंपन्या आता तो देश सोडण्याचा विचार करत आहेत. आणखी कंपन्या भारतात उत्पादन सुरू करण्याचा विचार करत आहेत किंवा त्यांचे उत्पादन वाढवण्याचा विचार करत आहेत. अलिकडेच बातमी आली आहे की 'ॲपल' आता भारतात आयफोननिर्मितीचा विस्तार करण्याच्या विचारात आहे. त्यामागे एक कारण आहे. चीन आणि व्हिएतनामच्या तुलनेत भारतात ट्रम्प शुल्क खूपच कमी आहे. अशा परिस्थितीमध्ये भारत अमेरिकेची मागणी पूर्ण करू शकेल, असे 'ॲपल'ला वाटते. त्याचबरोबर इतर देशांना पुरवठ्यासाठी चीनचा वापर केला जाऊ शकतो. दुसरीकडे, 'गूगल'ची मूळ कंपनी 'अल्फाबेट इंक'देखील याच धोरणावर काम करण्याचा विचार करत आहे. 'गूगल पिक्सेल'ने स्मार्टफोन्सच्या जागतिक उत्पादनाचा काही भाग व्हिएतनाममधून भारतात हस्तांतरित करण्यासाठी तिच्या भारतीय करार निर्मात्या 'डिक्सन टेक्नॉलॉजिज' आणि 'फॉक्सकॉन' यांच्याशी चर्चा केली आहे. हा भाग अमेरिकेची मागणी पूर्ण करेल. सुमारे पंधरवड्यापूर्वी याबाबत चर्चेची पहिली फेरी झाली. हा बदल अल्फाबेटच्या सोर्सिंगला असलेला धोका कमी करण्याच्या धोरणाचा एक भाग आहे कारण अमेरिकेने 'पिक्सेल'चा प्राथमिक उत्पादन आधार असलेल्या व्हिएतनामवर उच्च शुल्क आकारण्याची धमकी दिली आहे.

आता कंपनीने भारतामध्ये एनक्लोजर, चार्जर, फिंगरप्रिंट सेन्सर आणि बॅटरी यासारखे काही घटक स्थानिक पातळीवर तयार करण्यासाठी निर्मात्यांसोबत योजना तयार केल्या आहेत. सध्या भारतात उत्पादित पिक्सेल फोनचे बहुतांश घटक आयात केले जातात. कोविडमुळे चिनी पुरवठा साखळीत आलेल्या व्यत्ययांमुळे व्हिएतनामला 'चायना प्लस वन' धोरणाचा अधिक फायदा झाला आहे, कारण व्हिएतनाममधून भारतात उत्पादनाचे हस्तांतरण हा एक नवीन ट्रेंड असेल. 'चायना प्लस वन' धोरणाचा सर्वांत मोठा फायदा व्हिएतनामला मिळाला. 'चायना प्लस वन' धोरणांतर्गत चीनबाहेर उत्पादन सुरू करत असलेल्या कंपन्यांमुळे व्हिएतनाम आणि भारताला विशेष फायदा झाला आहे. दोन्ही ठिकाणी कमी कामगार खर्च आणि अनुकूल व्यवसाय वातावरण यासारखे फायदे होतात. व्हिएतनाम गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता आणण्यात भारतापेक्षा अधिक यशस्वी ठरला आहे. नीती आयोगाने काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार 'चायना प्लस वन' धोरण स्वीकारण्यात भारताला आतापर्यंत मर्यादित यश मिळाले आहे तर व्हिएतनाम, थायलंड, कंबोडिया आणि मलेशिया हे मोठे लाभार्थी बनले आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सांगितले होते की, व्हिएतनामला चीनशी सीमा सामायिक करण्यासारखे काही फायदे मिळाले आहेत.

व्हिएतनाम काही काळापासून चीनचा शेजारी देश असल्याचा लाभ घेत आहे. २० टक्के कॉर्पोरेट कर दर आणि निर्यात-केंद्रित आर्थिक विकास मॉडेलमुळे व्हिएतनाम 'चायना प्लस वन' धोरणाचा एक प्रमुख लाभार्थी म्हणून उदयास आला आहे. दुसरीकडे, केंद्रीय अर्थसंकल्पात अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याच्या प्रयत्नात भारताने विदेशी कंपन्यांसाठी कॉर्पोरेट कर दर ४० टक्क्यांवरून ३५ टक्क्यांवर आणला. त्यातच ट्रम्प यांनी व्हिएतनामवर जादा शुल्क लादल्याने संतुलन भारताच्या बाजूने झुकू शकते. अमेरिकेने व्हिएतनामवर ४६ टक्के तर भारतावर २६ टक्के शुल्क लादले आहे. दर ९० दिवसांसाठी रद्द करण्यात आले आहेत; परंतु व्हिएतनाम आणि अमेरिकेने व्यापार करारासाठी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. अर्थात भारतापेक्षा व्हिएतनामला ट्रम्पकडून चांगला करार मिळण्याची शक्यता नाही. कारण चीनमधील निर्यात व्हिएतनाममार्गे सुकर केली जात असल्याचा अमेरिकेला संशय आहे. चीन अनेक वस्तू व्हिएतनाममध्ये डम्प करते आणि तिथून अमेरिकेला पाठवल्या जातात. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात व्हिएतनामला चीनवरील शुल्काचा फायदा झाला. तथापि, व्हिएतनामशी अमेरिकेची व्यापार तूट २०१८ च्या पातळीपेक्षा तिप्पट आहे. अमेरिकेचा कर टाळण्यासाठी चीनने व्हिएतनामचा वापर सुरू केल्याचे मानले जाते. व्हिएतनाम हा अमेरिकेला अप्रत्यक्ष साखर निर्यातीचा प्रमुख स्रोतदेखील मानला जातो. 'लोवी इन्स्टिट्यूट' या स्वतंत्र थिंक टँकच्या अलिकडील अहवालात त्याचा उल्लेख आहे. यामध्ये व्हिएतनामी बंदरांमधून चिनी उत्पादनांचा मार्ग बदलून निव्वळ दर चुकवणे समाविष्ट आहे.

अलिकडच्या वर्षांमध्ये अमेरिकेला वाढणारी व्हिएतनामची निर्यात आणि चीनकडून होणारी वाढती आयात यांच्यामधील परस्परसंबंध स्पष्टपणे दिसून येतो. अमेरिकेचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी 'मेड इन व्हिएतनाम' लेबलसह चिनी वस्तू अमेरिकेत पाठवल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. अल्फाबेट ही कदाचित एकमेव कंपनी नाही, जी अर्धवट उत्पादन भारतात हलवत आहे. कोरियन इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक सॅमसंगचा व्हिएतनाममध्ये मोठा आधार आहे. इलेक्ट्रॉनिक्सव्यतिरिक्त व्हिएतनाम हा अमेरिकेला पोशाख आणि फुटवेअरचा प्रमुख निर्यातदार आहे. त्यामुळे या प्रदेशांमध्येही भारत उत्पादन बदलांची अपेक्षा करू शकतो. २०२३ मध्ये एकूण पादत्राणे आयातीपैकी अमेरिकेला सुमारे एक तृतीयांश आयात व्हिएतनाममधून आली, असे 'फुटवेअर डिस्ट्रिब्युटर्स अँड रिटेलर्स ऑफ अमेरिका' या उद्योग व्यापार गटाच्या माहितीत म्हटले आहे. 'सीएनबीसी'च्या अहवालानुसार, नायके चीन आणि व्हिएतनाममध्ये सुमारे २५ टक्के फुटवेअर बनवते. फर्निचर उद्योगानेही व्हिएतनामवरील अवलंबित्व वाढवले आहे. २०२३ मध्ये अमेरिकेची फर्निचरची २६.५ टक्के आयात या देशातून आली. सध्या भारतात उत्पादित केल्या जात असलेल्या 'पिक्सेल' फोनचे बहुतांश घटक आयात केले जातात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हिएतनामवर ४६ टक्के तर भारतावर २६ टक्के शुल्क लागू करण्याची घोषणा केली होती. ट्रम्प यांनी ९० दिवसांसाठी नवे शुल्क स्थगित केले, तरी दहा टक्के बेसलाईन टॅरिफ कायम आहे. चीनला या ९० दिवसांच्या सवलतीतून वगळण्यात आले असून सर्वाधिक टॅरिफ दराचा सामना करावा लागतो.

सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत कराराचा पहिला भाग पूर्ण करण्यासाठी भारताने अमेरिकेसोबत वाटाघाटी वाढवल्या आहेत. त्यांना २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार १९० अब्ज डॉलर्सवरून ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवायचा आहे. व्यापार करारामुळे 'अल्फाबेट' आणि 'ॲपल'सारख्या कंपन्यांना अमेरिकेत निर्यात करण्यासाठी भारतात उत्पादन करणे अधिक आकर्षक होईल. 'डिक्सॉन' आणि 'फॉक्सकॉन' फक्त स्थानिक बाजारपेठेसाठी दरमहा ४३ हजार ते ४५ हजार पिक्सेल स्मार्टफोन भारतात बनवत आहेत. 'अल्फाबेट'ला ड्युटी इफेक्ट कमी करायचा होता आणि त्याचे स्मार्टफोन 'ॲपल'च्या 'आयफोन्स' आणि 'सॅमसंग'च्या प्रीमियम गॅलक्सी मॉडेल्सशी स्पर्धा करू शकण्याजोगे बनवायचे होते. भारत स्मार्टफोन्सवर एकूण १६.५ टक्के आयात शुल्क आकारतो. स्वदेशी 'डिक्सन' नवीनतम मॉडेल्ससह भारतात उत्पादित पिक्सेल फोनपैकी सुमारे ६५-७० टक्के उत्पादन करते, तर 'फॉक्सकॉन' जुन्या मॉडेल्सवर अधिक लक्ष केंद्रित करते. 'फॉक्सकॉन'ने गेल्या ऑगस्टमध्ये आपल्या तामिळनाडू युनिटमध्ये 'पिक्सेल'चे उत्पादन सुरू केले. 'डिक्सन'ने डिसेंबरमध्ये नोएडा प्लांटमध्ये तैवानच्या कॉम्पल इलेक्ट्रॉनिक्सच्या सहकार्याने 'पिक्सेल' उत्पादन सुरू केले.

भारताशिवाय व्हिएतनाम आणि चीनमध्येही 'पिक्सेल' स्मार्टफोन तयार केले जातात. मात्र मीडिया रिपोर्टसनुसार 'गूगल'ने चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी 'फॉक्सकॉन' आणि 'कॉम्पल'च्या माध्यमातून व्हिएतनाममध्ये 'पिक्सेल'चे उत्पादन सुरू केले आहे. 'अल्फाबेट' भारतातून अमेरिकेत होणारी निर्यात हळूहळू वाढवेल आणि इतर देशांना पुरवल्या जाणाऱ्या पुरवठ्याचेही मूल्यांकन करेल. भारतीय स्मार्टफोन मार्केटमध्ये 'पिक्सेल'चा वाटा सुपर प्रीमियम किमतीमुळे कमी आहे. गेल्या वर्षी डिव्हाईस ऑफलाईन विकण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यात सुधारणा झाली आहे. एकंदरीत, अनेक कंपन्या आता कर वाचवून निर्यात वाढवण्यासाठी भारताचा विचार करू शकतात.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# भारतीय क्रिकेटचे भविष्यातील 'वैभव'

आमच्याकडे प्रतिभावानांची वानवा नाही. क्षेत्र कुठलेही असो, कुठे ना कुठे या प्रतिभेची चुणूक जाणवते आणि भारताच्या प्रत्येक क्षेत्रात भविष्य हे उज्ज्वलच आहे, याची खात्री देऊन जाते. आमचे क्रीडा क्षेत्र समृद्ध आहे. ते अधिक समृद्ध व्हावे म्हणून होणारे प्रयत्न सर्वश्रुत आहेत. अशावेळी एखादा 'सूर्यवंशी' पुढे येत मी भारतीय खेळाचे भविष्य म्हणून 'छातीठोक'पणे सांगून सर्वांना भुरळ घालून जात असेल तर हे भारतीय क्रिकेटचे 'वैभव'च म्हणावे लागेल.

आज क्रिकेटचे वेड शब्दात वर्णन करण्यापलीकडे आहे. म्हणून तर क्रिकेटवेडी तरुणाई आपल्या क्रिकेटच्या नायकाची एक झलक पाहण्यासाठी जीवाचे रान करते. भारतीय खेळ अनेक आहेत. परंतु त्या क्रिकेटची नशा भल्याभल्यांना वेड लावून जाणारी आहे. भारतीय क्रिकेटचा इतिहास फार जुना आहे. १९२८ मध्ये बीसीसीआयची स्थापना झाली. भारताने पहिला कसोटी सामना २५ जून १९३२ साली खेळला. तेव्हापासून भारतीय क्रिकेटचा आलेख ऊर्ध्व असाच आहे. आज या शृंखलेत अनेक नावाजलेले मोती जोडले जात आहेत. रणजितसिंह भिवाजी जडेजा यांना भारतीय क्रिकेटचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यानंतर आज अनेक दिग्गज भारतीय क्रिकेटला समृद्ध आणि संपन्न करण्यासाठी झटले. लढा अमरसिंग, लाला अमरनाथपासून सुनील गावस्कर, रवी शास्त्री, कपिल देव, चेतन शर्मा, अनिल कुंबळे असो की जवागल श्रीनाथ! अगदी अलिकडच्या काळात क्रिकेटचा देव म्हणून सचिन तेंडुलकरने आपली ओळख निर्माण केली आणि अजूनही या समृद्ध परंपरेचा भाग होण्यासाठी अनेक खेळाडू रांगेत आहेत.



खेळासाठी पोषक आणि सकारात्मक असलेल्या भूमीत आज प्रतिभेची कमी नाही. केवळ अशांना योग्य व्यासपीठ आणि दिशा मिळण्याची गरज आहे. असाच एक प्रतिभावंत सध्या सर्वांच्या मनात घर करून बसला आहे आणि तो म्हणजे वैभव सूर्यवंशी! बिहार राज्यातील ताजपूर येथे २४ मार्च २०११ रोजी जन्मलेला वैभव अवघ्या १४ वर्षे आणि ३२ दिवसांच्या वयातच असंख्य भारतीयांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. सुरू असलेल्या आयपीएलच्या निमित्ताने त्याने स्वतःला सिद्ध केले आणि जागतिक स्तरावरील विक्रमही स्थापन केले. आयपीएलचा अवघा तिसरा सामना खेळताना गुजरात विरुद्ध ३५ चेंडूत १०१ धावांची ऐतिहासिक खेळी करणाऱ्या वैभवने अनेक दिग्गजांना उभे होऊन अभिनंदन करण्यास भाग पाडले. त्याच्या विस्फोटक शैलीने जागतिक स्तरावरही अनेक इतिहास रचले. आयपीएलमध्ये कमी चेंडूत शतक ठोकणारा दुसरा तर एका सामन्यात ११ षटकार मारणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला!

आज आयपीएलच्या निमित्ताने वेगवेगळ्या राज्याचे प्रतिनिधित्व करीत असले, तरीही प्रतिभा भारतीय क्रिकेट संघाचे भविष्य आहे, हे नक्की! ज्या वयात तरुणाई मोबाईल आणि रीलसच्या दुनियेत स्वतःचे समाधान शोधत असते, त्यावेळी वैभव जागतिक दर्जाचे विक्रम स्थापित करीत असेल तर हा त्याचा आत्मविश्वास म्हणजे जागतिक दर्जाचाच म्हणावा लागेल. पदार्पणातच पहिल्या चेंडूवर षटकार मारून त्याने स्वतःचे ध्येय स्पष्ट केले होते. अगदी जे गोलंदाज अन्य संघातील फलंदाजांची दाणादाण उडवून आपले वर्चस्व सिद्ध करतात, अशा गोलंदाजांना लीलया षटकार मारून वैभवने आत्मविश्वास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर अशक्य काहीच नाही, हे सांगण्याचाच प्रयत्न केला आहे.

भारतीय क्रिकेटची गौरवशाली परंपरा आहे. या परंपरेत सचिनपासून सूर्यकुमारपर्यंत अनेक प्रतिभावंतांचा उल्लेख केला जाईल; त्यावेळी वैभव सूर्यवंशी हे नाव घेतल्या वाचून राहणार नाही, हे नक्की! अवघ्या आठव्या वर्गात शिकणाऱ्या वैभवची ही कामगिरी आजच्या फेसबुक, युट्यूब आणि अन्य गोष्टींमध्ये समाधान शोधणाऱ्यांसाठी मोठी शिकवण आहे. जिद्दीच्या जोरावर अशक्य ते शक्य करून दाखविले जाऊ शकते, हेच यातून स्पष्ट होते. अपेक्षा एवढीच असेल भारतीय क्रिकेटचे हे 'वैभव' आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सामन्यांमध्ये आपली सूर्यवंशी खेळी दाखविण्यासाठी सज्ज होईल, तेव्हा त्याला राजकारण किंवा अन्य अडथळ्यांचा गंध लागू नये. भारतीय क्रिकेटचे हे 'वैभव' असेच प्रामाणिकपणे जपले गेले तर हा भारतीय क्रिकेटचा ठेवा वृद्धिंगतच होत राहील.

९७६३७१३४१७


## धर्म-संस्कृती

# मारुतीरायाचे तोंड दक्षिण दिशेलाच का?

प्रा. दिलीप जोशी

भगवान हनुमान भारतातील एकमेव दैवत आहे की, जे आसेतुहिमाचल पुजिले जाते. भारतात असे एकही गाव नसेल जिथे हनुमंताचे मंदिर नाही. मारुतीचा पार म्हणजे गावाचे संचालन केंद्र. कीर्तन असो की सप्ताह, ग्रामसभा असो पारंपरिक उत्सव मारुतीचा पार हे कार्यक्रम स्थळ निश्चित असते. इतकेच काय, सायंकाळी ज्येष्ठ नागरिकांचा गप्पांचा फडही पारावरच आणि कुटाळ कुचराचे दाणेसुद्धा इथेच ठाण मांडून असतात. पारावरच्या गप्पा तर माहिती केंद्र म्हणून काम करतात. गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या सर्व बातम्या बऱ्याचदा वाढवून चढवून प्रसारित होतात त्या पारावरच. असो. थोडक्यात इतर कोणत्या देवाचे असो वा नसो, पण मारुतीचे मंदिर गावात असतेच. प्रत्येक गावातील हनुमान मंदिर श्रद्धेचे केंद्र आहे. दररोज दिवाबत्ती, शनिवारी शेंदूर, नारळ, गूळ-फुटाणे भाविक वाटतात. एकत्रित मेळा सोबतच बैलपोळा, दसरा, होळी इत्यादी सण-उत्सव साजरे होण्याचे एकमेव स्थान म्हणजे मारुतीचा पार. प्रत्येक हनुमान मंदिराचे एक वैशिष्ट्य सर्वत्र पाहावयास मिळते; ते म्हणजे प्रत्येक हनुमंताचे मुख म्हणजे हनुमान मंदिर दक्षिणाभिमुख असते. मारुतीरायाचे तोंड नेहमी दक्षिण दिशेलाच का असते? हा अनेकांना पडणारा प्रश्न. आज त्यावर चर्चा करू.

आपल्या शास्त्रात दक्षिण दिशा ही यमाची दिशा मानली जाते. यम ही मृत्यूची कारक देवता आहे. यमाचा आदेश अंतिम आदेश असतो. 'मरणं प्रकृतीः' हे आपले सूत्र आहे. जन्माला येणारा केव्हातरी मरणारच. त्याची निश्चित वेळ आली की, तो यमाच्या आदेशाने इहलोकीची यात्रा संपवतो. हे काम यमदेव चोख बजावतात. पण अनेकदा अनेकांवर अपमृत्यू ओढवतो. 'अकाल मृत्यू' हा न्यायोचित नसेल तर न्याय कोणाकडे तरी मागितला जातो. हनुमानजी हे शिवाचे अवतार म्हणजे महारुद्र. यमावर सत्ता महाकाळ रुद्राची. हनुमान तर महारुद्र. म्हणून यमाला न्यायोचित वागण्यासाठी नियंत्रक म्हणून



मारुतीराय यमाच्या दिशेला म्हणजे यमाकडे भक्त-कल्याणासाठी लक्ष ठेवून असतात. 'माझे लक्ष आहे!' याची यमधर्माला सतत जाणीव हनुमंत करून देत असतात. आपल्या भक्तांना ते अरिष्टापासून मुक्त करतात. म्हणून तर ते संकटमोचक आहेत. समर्थ रामदासांनी म्हटलेच आहे-

**''काळाग्नी काळरुद्राग्नी, देखतां कांपती भयें''**

महामृत्युंजयी हनुमंताचे तोंड दक्षिण दिशेलाच का? याचे हे उत्तर. हा एक भाग झाला. मारुतीरायाचे तोंड सदासर्वत्र दक्षिणेकडे का? याची अजून एक पटणारी कथा आहे. वाल्मीकि रामायणात प्रामुख्याने तीन चिरंजीवांचा संबंध येतो. भगवान परशुराम, भगवान हनुमान आणि महात्मा बिभीषण. हनुमानजी आणि बिभीषणजी दोघेही रामभक्तच. दोघांनीही राम-रावण युद्धात भगवान रामाच्या बाजूने राहून सत्याची साथ दिली, यात शंकाच नाही. पण, कितीही झालं तरी बिभीषण हा रावणाचा भाऊ म्हणजे राक्षस वंशी. रावण वधानंतर श्रीलंकेचे साम्राज्य भगवंताने बिभीषणाला दिले. लंकापती बिभीषण चिरंजीव असल्याने तो श्रीलंकेत चिरकाल कायम निवासी. तो रामभक्त असल्याने भगवान राम असेपर्यंत चिंता नव्हतीच; पण बिभीषण राक्षस कुळातील असल्याने रामावतारानंतर भविष्यात त्याची राक्षसी वृत्ती जागी झाली आणि त्याची वृत्ती फिरली तर तो भविष्यात भारतावर केव्हाही चालून येऊ शकतो. भविष्यातील हा धोका ओळखून त्याला तोडीस तोड देता यावी आणि भारतवर्ष सुखी, शांती आणि भयमुक्त असावे यासाठी चिरंजीव असलेल्या हनुमंताला मुद्दाम चिरंजीव असलेल्या राक्षसवंशी बिभीषणावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी तत्कालीन राज्यधुरिणांनी राज्यशास्त्रीय नियमांना अनुसरून दिली आहे. राजकारणात भल्याभल्यांची नियत फिरू शकते. काहीच स्थिर नसते. आजचा मित्र उद्याचा शत्रू बनू शकतो. म्हणून मित्रराष्ट्र असावेतच; पण त्यांच्यावर अंधविश्वास न ठेवता कूटनीती वापरणे हा खरा राजधर्म होय. हनुमंताचे दक्षिणेकडे तोंड हा राष्ट्रीय सतर्कता आणि सुरक्षेचा भाग होय.

मारुतीरायांचे तोंड दक्षिण दिशेला असण्याचे अजून एक कारण म्हणजे दिशाशास्त्र होय. सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो, हे दिशा ओळखण्याचे मुख्य प्रमाण असले, तरी काही वेळा सूर्याची स्थिती माध्यान्ह समयी अथवा वातावरणातील बदलामुळे लक्षात येणे कठीण. अशावेळी दिशादर्शक म्हणून मारुतीरायाकडे पाहून ही दक्षिण दिशा निश्चित सांगता येते. दिशा भरकटलेल्या अनेकांना त्या काळात हनुमान मंदिर पाहून मार्गस्थ होता येत असे. मारुतीराय तसेही जीवनात मार्गदर्शक आहेत.

थोडक्यात मारुतीरायांचे तोंड सर्व ठिकाणी दक्षिणेकडेच का असते? तर, यमाने न्यायोचित वागावे, राक्षसवंशी चिरंजीव बिभीषणाने दगाफटका करू नये, याचे पूर्वनियोजन हा कूटनीतीचा भाग आणि दिशाशास्त्राची निश्चिती हे या प्रश्नाचे उत्तर आहे. म्हणून मारुतीरायांची मंदिरे दक्षिणाभिमुख असतात.

**''असंख्यात नामे जया देत लोक ।**
**परी नित्य तो सच्चिदानंद एक ॥**
**जयाच्या बळे चालतो हा पसारा ।**
**नमस्कार त्या ब्रह्मतत्त्वा अपारा ॥''**

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### पाणी अडवा पाणी वाचवा

पाणी हा आपल्या जीवनाचा अत्यंत मौल्यवान स्रोत आहे. प्रत्येक माणसाला स्वस्थ आणि सुरक्षित जीवन जगता यावे. पाणी हे जीवनाचा स्रोत आणि मूलभूत गरज आहे. आपल्या शरीरातील दोन तृतीयांश भाग पाण्याचा बनलेला आहे आणि आम्ही दैनंदिन जीवनामध्ये पाण्याचा उपयोग करतो. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि बदलत्या हवामानामुळे पाण्याची टंचाई दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे ''पाणी अडवा, पाणी वाचवा'' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. घराच्या छतावरून पाणी संकलन करून भूजल पातळी वाढवता येते. नदी, तलाव आणि विहिरींचे संवर्धन करा, नैसर्गिक जलस्रोत स्वच्छ व संरक्षित ठेवा. बांध, नाले आणि जलसंधारण प्रकल्प उभारणे शेतकऱ्यांनी शेततळी, बंधारे आणि जलसंधारणाच्या पद्धती वापरल्या पाहिजेत. घरगुती पाण्याचा वापर कमी करा, नळ चालू ठेवून पाणी वाया घालवू नका, वापरलेले पाणी गार्डनिंग बागेत किंवा टॉयलेट फ्लशसाठी वापरा, ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करा, अतिरिक्त पाणी वाचवण्यासाठी आणि उपयोग करण्यासाठी आपण निरनिराळ्या पद्धती आणि प्रक्रिया वापरल्या पाहिजेत. भविष्यातील पाणी वाचवण्यासाठी आणि पूरक करण्यासाठी आपण निरनिराळ्या पद्धती आणि प्रक्रिया शोधल्या किंवा विकसित केल्या पाहिजेत. पाणी हा जीवनाचा आधार आहे. ते आपल्या जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. पाण्याचे योग्य वापर आणि संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. पाण्याचा वापर योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. पाण्याची किंमत त्याच्या उपलब्धतेपेक्षा जास्त आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखून त्याचा वापर योग्य पद्धतीने करावा.

पाणी वाचविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाणी हा आपला सामूहिक भाग आहे आणि त्याचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखून, त्याचा वापर योग्य पद्धतीने करून, पाण्याचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करूया. आपल्या पृथ्वीवरील जीवनासाठी पाणी हा महत्त्वाचा घटक आहे आणि ते वाचवणे ही आपली सर्वांत मोठी जबाबदारी आहे. औद्योगिक क्षेत्रात कारखान्यांनी पाणी प्रक्रिया करून पुन्हा वापरावे. जर आपण पाणी आडवले आणि वाचवले, तर भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचा मुबलक साठा उपलब्ध राहील. चला, पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखूया आणि जबाबदारीने वागूया.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### वडेट्टीवारांचा हास्यास्पद प्रश्न

पहलगाम दहशतवादी हल्ला धर्म विचारून करण्यात आला नाही, असे बेताल वक्तव्य काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वडेट्टीवार यांनी केले. जेव्हा की ज्याच्या पती, मुलगा, वडील यांना त्याच्या समोर दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या ते प्रत्यक्षदर्शी तेथे होते. त्यांचे व्हिडीओ पूर्ण जगाने पाहिले तरी वडेट्टीवार म्हणतात की असे कधी होते का? दहशतवाद्यांना एवढा वेळतरी असतो का? त्यांना पटापट गोळीबार करून निघून जायचे असते हे वडेट्टीवार ठामपणे सांगतात. जसे काही त्यांच्यासमोरच दहशतवादी त्यांना सांगून प्लॅन करतात. काहीतरी बोलायचे आणि स्वतःला देशभक्त पुढारी म्हणायचं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे वडेट्टीवारांनी दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबीयांच्या जखमेवर मीठच चोळले आहे. आणि म्हणायचं आमच्या संवेदना त्यांच्या पाठीशी आहे. मी तर एकच म्हणेल वडेट्टीवारजी, आपल्याला मराठी किंवा आपण काय बोलतो हे समजत नसेल तर उगाच टीव्ही किंवा पत्रकारांसमोर मुलाखत देऊ नका आणि आपल्या ज्येष्ठ नेत्यासारखे बूड आणि शेंडा नसल्यासारखे वक्तव्य करू नका. रुचेल ते बोलावे आणि पचेल तेच खावे अशी मराठीत म्हण आहे.

**शिरीष पटवर्धन**/९४२२११००१५

### भारताने ठाम भूमिका घ्यावी

२००९ आणि २०१६ मधील काश्मीर आठवला की अंगावर शहारा येतो. त्याच काश्मीरमध्ये आता वातावरण पूर्णतः बदलले आहे. ना दगडफेक, ना भारतविरोधी घोषणा. नागरिक आता सैन्याला आदराने पाहतात आणि सर्वसामान्य काश्मिरी माणूसही दहशतवादाला थारा देत नाही. पहलगाम हल्ला याच बदलाच्या विरोधात केला गेला असे लक्षात येते. पर्यटकांवर हल्ला करून पुन्हा भीतीचं वातावरण निर्माण करणं, रोजगार संपवणं आणि बेरोजगार तरुणांना दहशतवादाच्या मार्गावर ढकलणं हा यामागचा हेतू आहे. विशेष बाब म्हणजे, या वर्षी काश्मीरमध्ये तब्बल तीन कोटी पर्यटक येण्याची नोंद झाली आहे. पर्यटन हे आता काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनत आहे. आणि हीच बाब दहशतवाद्यांना अस्वस्थ करत आहे.

या हल्ल्यात ज्यांनी प्राण गमावले, त्यांना श्रद्धांजली शब्दांत नव्हे, तर कृतीतून व्यक्त व्हावी, अशी आता गरज आहे. इस्रायलने हमासच्या हल्ल्यानंतर जसा निर्णायक कारवाईचा मार्ग घेतला, तशीच ठाम भूमिका भारतानेही घ्यावी, हीच देशवासीयांची भावना आहे.

**अपर्णा जगताप**/८८८८५१०९१

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# घरकुल योजना आराखडा, दुहेरी जलवाहिनीचे काम युद्धपातळीवर करण्याची सूचना

## शहर विकासाबाबत आ. कोठे यांची पालिका आयुक्तांसोबत चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

सोलापूर : सोलापूर शहर परिसरातील प्रलंबित विकास कामे आणि नागरी सुविधांबाबत मंगळवारी आमदार देवेंद्र कोठे यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या समवेत महापालिकेत विविध विषयांवर प्रदीर्घ चर्चा केली.

यावेळी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त रवी पवार, आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, उपअभियंता नीलकंठ मठपती, गोकुळ चितारे व शर्मिष्ठा सल्ला तसेच माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, मंडल अध्यक्ष अक्षय अंजिखाने, नागेश सरगम, नागेश खरात, अक्षय वाकसे, संजीव कांबळे, अंबादास सकिनाल, पवन खांडेकर, दिनेश जाधव, अमर शिंदे आदी उपस्थित होते. याप्रसंगी शासकीय जमिनीवरील झोपडपट्ट्यांमध्ये घरकुल योजना राबवण्यासाठीचा आराखडा बनविणे, दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण करून चाचणी घेणे, धर्मवीर संभाजी तलाव सुशोभीकरण तसेच प्राणी संग्रहालय पुनर्निर्मितीची आमदार देवेंद्र कोठे यांनी केली. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरासमोरील शौचालय पाडून परिसर विकास करावा अशी आग्रही भूमिका आ. देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी घेतली.

धर्मवीर संभाजी तलाव पर्यटन विकासाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी आराखडा करण्यात यावा, महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाची पुनर्निर्मिती करण्याकरीता सोलापूर महानगरपालिका स्तरावरून प्रयत्न व्हावेत. याकरिता राज्य आणि केंद्र शासनाकडून आवश्यक सर्व प्रकारची मदत मिळवून देण्याची ग्वाही आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली.

शहर मध्य मतदारसंघात शासकीय जमिनीवरील झोपडपट्ट्यांच्या जागेवर घरकुल योजना राबवण्यासाठी आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता सर्वेक्षण करून आराखडा बनविण्याबाबत याप्रसंगी चर्चा करण्यात आली. याशिवाय स्मार्ट सिटीमधील डव्हेंचर पार्कसह इतर विविध कामांची देखभाल दुरुस्ती व्हावी आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी सांगितले. शहरातील स्वच्छतेची योग्य निगा राखण्यासाठी रात्री रस्ते आणि शहर परिसर स्वच्छ करण्याची यंत्रणा पुन्हा सुरू करावी, असेही आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

सोलापूर शहरातील बहुचर्चित मार्कंडेय जलतरण तलावातील समस्यांबाबतही आमदार देवेंद्र कोठे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना सूचना केल्या. मार्कंडेय जलतरण तलाव विद्यार्थ्यांसाठी लवकरात लवकर खुला व्हावा, जलतरणपटूंना स्पर्धांची तयारी करण्यासाठी आवश्यक सुविधा येथे उपलब्ध करून द्याव्यात तसेच जलतरण तलावाचा मक्ता दिलेल्या मक्तेदाराला संपूर्ण वर्षभर तलाव सुरू ठेवण्याच्या सक्त सूचना द्याव्यात असेही आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी सांगितले.




### मंदिराशेजारील शौचालय पाडण्याबाबत आग्रही भूमिका

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरासमोर असलेले शौचालय पाडून त्या परिसराचा विकास करावा, अशी आग्रही भूमिका आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याशी चर्चा करताना घेतली. त्यामुळे अनेक वर्षांपासून श्री सिद्धरामेश्वर भक्तांची मागणी लवकरच पूर्णत्वास जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### आठवड्यातच दुहेरी जलवाहिनीची चाचणी घेण्याची सूचना

सोलापूर ते उजनी दरम्यान सुरू असलेल्या दुहेरी जलवाहिनीचे काम केवळ ४०० मीटर अपूर्ण राहिले आहे. हे काम पूर्ण करून येत्या आठवड्यातच या जलवाहिनीची चाचणी घेण्याबाबतच्या सूचना आमदार देवेंद्र कोठे यांनी दिल्या.

## महत्वाचे...

# 'पोटखराब' जमिनीचीही आता लागवडीयोग्य नोंद

### जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नोंदी लावून घ्याव्यात

### जिल्हाधिकारी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

'पोटखराब' म्हणजे अशी जमीन की जी शेतीसाठी योग्य नाही, जसे की रस्ता, नाला, तलाव, खडक किंवा इतर नैसर्गिक अडथळे. ७/१२ उताऱ्यात या नोंदीमध्ये 'पोटखराब' क्षेत्र किती आहे, तसेच ते कोणत्या प्रकारात मोडते, हे नमूद केलेले असते. मात्र या क्षेत्रावर काही पीक येत नव्हते यामुळे बँकाही कर्ज देताना त्या जमिनी सातबाऱ्यावर असतानाही ग्राह्य धरत नव्हत्या. यामुळे आता जिल्हा प्रशासनाकडून या पोटखराब जमिनीचीही आता लागवडीयोग्य नोंदी लावून देण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना या पोटखराब क्षेत्रावरही आता कर्ज मिळण्याची वाट मोकळी झाली आहे.

शेतातील खडक, नाले, खंदक, खाणी यांसारख्या ठिकाणी असलेले क्षेत्र हे पोटखराब धरले जात असते. सार्वजनिक जमीन, रस्ता, तलाव, ओढा, स्मशानभूमी, दफनभूमी, कुंभारकामाची जमीन यांसारखी जमीन, जिथे कर लागत नाही. ७/१२ मध्ये जमिनीचे क्षेत्र आणि 'पोटखराब' क्षेत्र नमूद केलेले असते. 'पोटखराब' क्षेत्र लागवडीसाठी योग्य नाही, पण ते ७/१२ मध्ये नोंदवलेले असते. यामुळे शेतकऱ्यांना बँका या क्षेत्रावर कर्ज देत नव्हत्या. या विविध क्षेत्राचा उल्लेख पोटखराब वर्गवारीत होत आहे.

समजा जर एखाद्या ७/१२ मध्ये एकूण जमीन ५ एकर असेल आणि त्यापैकी १ एकर 'पोटखराब' असेल, तर ७/१२ मध्ये एकूण ५ एकर जमीन आणि १ एकर 'पोटखराब' क्षेत्र दर्शविले जायचे. 'पोटखराब 'वर्ग अ' आणि 'वर्ग ब' याची क्षेत्र पडताळणी जिल्हा भूमापन कार्यालयातील माहितीशी तसेच उपलब्ध अभिलेखातील लागवडीयोग्य नसलेल्या (गाव नमुना एकचा गोषवारा) क्षेत्राशी व्हायची. मात्र आता जिल्हा प्रशासनाकडून या पोटखराब क्षेत्राची नोंदच लागवडयोग्य होत असल्याने शेतकरी बांधवांना बँकांचे अजून सहकार्य लाभणार आहे. जिल्ह्यातील प्रांत आणि तहसीलदारांनी या पोटखराब क्षेत्र असलेल्या ५ हजार ०८२ शेतकऱ्यांचा शोध घेवून त्यातील २८८० शेतकऱ्यांना पोटखराब क्षेत्र लागवडीयोग्य करून घेण्याच्या नोटिसा पाठविल्या आहेत. याचा फायदा शेतकऱ्यांना भविष्यात होणार आहे.



## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या मजबुतीकरणाचे काम ३१ जुलैपर्यंत

### उत्सव समिती अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २९ एप्रिल-**

येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा मजबुतीकरण आणि सुशोभिकरण कामासंबंधीची आढावा बैठक महापालिका आयुक्त व श्री छत्रपती शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ पदाधिकारी आणि प्रमुख मंडळी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे मजबुतीकरणाचे काम मे अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन सोलापूर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आले होते. परंतु सदर पुतळ्याचा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टमध्ये त्रुटी होत्या. याबाबत चर्चा करण्यासाठी ही बैठक घेण्यात आली. हे काम ३१ जुलै पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन महापालिका प्रशासनाच्यावतीने देण्यात आले आहे, अशी माहिती उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांनी दिली. यावेळी पद्माकर काळे, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, श्रीकांत डांगे, माऊली पवार, अमोल शिंदे, श्रीकांत घाडगे, अनंत जाधव, दिलीप कोल्हे, प्रताप चव्हाण, महेश धाराशिवकर योगेश पवार, दिनकर जगदाळे, रवी मोहिते उपस्थित होते.

# ३५६ पैकी २९९ हरकतींवर झाली सुनावणी

### सोलापूर शहर प्रारूप विकास आराखडा

### रेल्वे लाईन्स, उत्तर सदर बाजार, दक्षिण सदर बाजार, सिव्हिल लाईन्स, मोदी भागातील हरकती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर शहर प्रारूप विकास आराखड्यावर महापालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, सूचना, हरकतीवर चार सदस्यांच्या समितीकडून सुनावणी सुरू आहे. दरम्यान, मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी रेल्वे लाईन्स, उत्तर सदर बाजार, दक्षिण सदर बाजार, सिव्हिल लाईन्स, मोदी या भागातील३५६ पैकी २९९ हरकतीवर सुनावणी घेण्यात आली. सोलापूर शहराची प्रारूप विकास योजना मुक्त अधिनियमाचे एम आर अँड टीपी क्ट १९६६ चे कलम २६ (१) अन्वय प्रसिद्ध झाल्यानंतर विहित कालावधीत जनतेकडून प्राप्त सूचना व हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी मुक्त अधिनियमाचे कलम २८ (२) अन्वय सोलापूर महापालिकेने शासनाने नेमणूक केलेल्या सदस्यांच्या नियोजन समितीचे दि. ११ एप्रिल २०२५ पासून गठन केले आहे.

सोलापूर शहर विकास आराखड्यात शहरातील विविध भागातील ९२१ जागांवर आरक्षण टाकण्यात आले आहे. पुढील २० वर्षासाठीच्या शहर प्रारूप विकास आराखड्यावर महापालिकेकडे प्राप्त झालेल्या ३३७५ तक्रारी, सूचना, हरकती यावर चार सदस्यांच्या समितीकडून दि. १५ एप्रिल पासून ते दि. २३ मे २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम निर्णय मे अखेर होऊन जूनमध्ये शासनाच्या मंजुरीनंतर शहर विकास आराखडा जाहीर करण्यात येणार आहे. दरम्यान, मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी रेल्वे लाईन्स, उत्तर सदर बाजार, दक्षिण सदर बाजार, सिव्हिल लाईन्स, मोदी या भागातील सुनावणी पार पडली. या भागातील हरकती व सूचनांवर सुनावणी झाली. एकूण ३५६ पैकी २९९ हरकतीवर सुनावणी घेण्यात आली. या समितीमधील नगररचना विभागाचे सेवानिवृत्त उपसंचालक संजय सावजी, सेवानिवृत्त उपसंचालक दत्तात्रय पवार, सेवानिवृत्त सहाय्यक संचालक अनिलकुमार पाटील आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. श्रीकांत जहागीरदार या चार अधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली. संबंधिताचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. नगररचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेटके नियोजन करण्यात आले होते.



मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी रेल्वे लाईन्स, उत्तर सदर बाजार, दक्षिण सदर बाजार, सिव्हिल लाईन्स, मोदी या भागातील सुनावणी पार पडली. बुधवार दि. ३० एप्रिल रोजी टीपी- ४, लक्ष्मी पेठ, मुरारजी पेठ, सिद्धेश्वर पेठ, टीपी- २, दि. २० मे रोजी शनिवार पेठ, दक्षिण कसबा, बुधवार पेठ, गोल्डफिंच पेठ, गावठाण, शुक्रवार पेठ, भवानी पेठ, विजापूर रोड, दि. २१ मे रोजी मजरेवाडी, दि. २२ मे रोजी कसबे सोलापूर आणि दि. २३ मे रोजी राहिलेले इतर सर्व पेठ आणि भागांच्या सुनावण्या घेण्यात येणार आहे. या नियोजनाप्रमाणे त्या त्या विभाग आणि पेठनिहाय परिसरातील तक्रारदार हरकतदार आणि दावेदार यांना सुनावणीसाठी हजर राहण्याच्या नोटिसा देण्यात आल्या आहेतफ सुनावणी संबंधित नागरिकांनी त्यांच्या सूचना व हरकती बाबत आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हरकती आणि दाव्यांवरील सुनावणी घेऊन निर्णय देण्यासाठीच्या प्रक्रियेला तब्बल दोन

## रेल्वे मार्ग, पालखी मार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेची चौकशी करणार

### जिल्हाधिकारी आशीर्वाद यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर ते धाराशिव रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाच्या मोबदला वाटपाबाबत तक्रारी आल्या असून, याचबरोबर श्री संत ज्ञानेश्वर माऊली महाराज, संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या मावेजा वाटपाबाबतही काही तक्रारी आल्या असून, त्या अनुषंगाने संबंधित मार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी ३ उपजिल्हाधिकाऱ्यांनी समिती नेमणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर-धाराशिव रेल्वे मार्गासोबत संत ज्ञानेश्वर पालखी महामार्ग तसेच संत तुकाराम पालखी महामार्गाच्या बाधित शेतकऱ्यांच्या मोबदला वाटपातही अनेक तक्रारी आलेल्या आहेत. काही शेतकऱ्यांची पाईपलाईन न लागणे, शेतातील बांधांवरील झाडे न लागणे, सामुदायिक विहिरी यासह इतरही मावेजा वाटपातील काही तक्रारी आल्याने याची चाचपणी केली जाणार आहे. या काळात एखाद्या शेतकऱ्यांवर खरंच अन्याय झाला का? याचीही चौकशी होणार आहे. यामध्ये भूसंपादन अधिकारी, वनविभाग, आणि कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांचपैकी जे कोणी दोषी ठरतील त्यांच्यावर कारवाई अटळ आहे. चौकशी समितीला चौकशी अहवाल सादर करण्याची सूचना करणार आहे.

### २० मे पर्यंत सर्व जुने रेकॉर्ड अपडेट होईल

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसातील ७ सुत्री कार्यक्रमाची पूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी तहसील तसेच प्रांत कार्यालयातील सर्व जुने रेकॉर्ड (अभिलेखे) अपडेट करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सध्या ७० टक्के जुने रेकॉर्ड अपडेट झाले आहे. २० में पर्यंत सर्व रेकॉर्ड शंभर टक्के अपडेट करण्याचे आदेश दिले आहेत, तसेच १७ जूनपर्यंत सर्व तहसील तसेच प्रांत कार्यालय स्वच्छ करणे अपेक्षित आहे.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी**

## प्लॅस्टीक राष्ट्रध्वज निर्मिती व वापरास मनाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२९ एप्रिल-**

केंद्र शासनाच्या मृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशनुसार राष्ट्रध्वज करीता प्लॅस्टीकच्या वापरास, प्लॅस्टीकचा राष्ट्रध्वज निर्मितीस व वापरास मान्यता नाही. राष्ट्रध्वज रस्त्यावर वा अन्य ठिकाणी फेकुन देऊ नयेत. राष्ट्रध्वज खराब झाल्याचे आढळल्यास ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट करणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे ते बोधचिन्ह व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० व राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय आहे. यास्तव कोणतेही खराब ध्वज आढळुन आल्यास ते सन्मानपुर्वक गोळा करून नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६६ वा वर्धापन दिनी ध्वजसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.



# चिंचोळी एमआयडीसी येथे बेकायदेशीर मुरुम उपसा करणाऱ्यांवर कारवाई करा

### युवा सेनेची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

चिंचोली काटी येथील गायरण जमिनीतील गट क्र. १४४/१ व एम.आय.डी.सी. मधील खुल्या जागेतील लाखो ब्रास बेकायदेशीर मुरुम उपसा होत आहे. यात शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे तरी येथील मुरुम उपसा बंद करण्याची मागणी युवा सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

चिंचोली एमआयडीसी परिसरातील मुरुम माफियांनी मोहोळ तालुक्यातील काही अधिकाऱ्यांशी संगणमत करुन बेसुमार मुरुम उपसा उपसणे चालू केले आहे. या मुरुम माफियांच्या शेतजमिनींवरती बोजा चढविण्यात यावा व ज्या कंपनीमध्ये हा मुरुम वापरले जात आहे त्या कंपनींवरती कारवाई करण्यात यावी, जेणेकरुन भविष्यामध्ये अशा प्रकारचे अनधिकृत धाडस कोणी करणार नाही. दरम्यान, या प्रकरणी लवकर कारवाई न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही चौगुले यांनी दिला आहे. गेल्या आठवड्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी एकही खडा मुरूम उपसा होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे आदेश प्रशासनाला दिले होते. तरीही मोठ्या प्रमाणात मुरूम उपसा सुरू आहे त्यामुळे आता पालकमंत्री याकडे गांभीर्याने लक्ष देणार का? असा सवालही चौगुले यांनी विचारला आहे. यावेळी युवती सेना जिल्हा प्रमुख पूजा खंदारे, उपजिल्हा प्रमुख खंडू सलगरकर, उपजिल्हा प्रमुख रवी कांबळे, लहू गायकवाड, विकास डोलारे, शिवा माळी, ओंकार उदावत, राकेश माळकवटे, तुषार अवताडे, आदित्य भोगडे, महावीर गांधी, शुभम शिवशरण यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.



Classifieds

**नोकरीविषयक**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीणमध्ये**
**संपर्क : ९८५०७०२१७०**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने आणि मध्य रेल्वे, सोलापूरचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता त्यांच्या वतीने, रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T/2024/28R2 कामाचे नाव : सोलापूर विभागातील छतावरील डिझाइनच्या एलएचबी प्रकारच्या एसी कोचवर बसवलेल्या विविध मेकच्या एसी पॅकेज युनिटचा दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक देखभाल करार (पुनर्निमंत्रण) अंदाजे किंमत: रु. 2,17,65,593.59 बयाणा रक्कम: रु. 2,58,800.00 पूर्ण कालावधी: 24 महिने ऑफरची वैधता : 90 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ : 23/05/2025 दुपारी 3.00 वाजता.

एसआर. डीईई (सामान्य)
मध्य रेल्वे, सोलापूर
APEX-58

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

**सभा नोटीस**

पिरळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्या. पिरळे. ता. माळशिरस, जि. सोलापूर संचालक मंडळाची सभा बुधवार, दि. ०७/०५/२०२५ रोजी सकाळी ठीक ११ वाजता मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मर्या. अकलूज, ता. माळशिरस यांचे कार्यालयामध्ये श्री. डी.पी. राऊत लेखापरीक्षक सहकारी संस्था अकलूज यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व संचालकांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**
१) सर्वसाधारण प्रवर्ग मतदार संघातील रिक्त पदे भरणेबाबत.
२) भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग/प्रतिनिधी रिक्त पद भरणेबाबत

सही/-
सचिव
पिरळे वि.का. सेवा सह. संस्था मर्या.
पिरळे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४७/२०२३
नि.१६

**बार्शी येथील मे. सि. ज ज्युनि. डि. सो. यांचे कोर्टात**
**(मे. आर.पी. बागडे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश)**

श्रीमती प्रभावती कल्याण सुरवसे, वगैरे -३ - अर्जदार
विरुध्द
कोणी नाही - सामनेवाला

**यात अर्जदारातर्फे जाहीर प्रसिध्दकरण ड्राफ्ट**

ज्याअर्थी, यातील मयत कल्याण नरसु सुरवसे यांचे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा - गौडगांव, ता. बार्शी शाखेत सेव्हिंग खाते नंबर २०२०९००१६४५ या बँक खात्यात मयताच्या दिवशी रक्कम रुपये १६,५११.४८ पैसे (सोळा हजार पाचशे अकरा रुपये अठ्ठेचाळीस पैसे) व एस.बी. आय. तुळजापूर मंगळवार पेठ, तुळजापूर या बँक शाखेत खाते नंबर ५२१७८७५३५९१ या बँक खात्यात अखेरीस रक्कम रुपये १७,००४ रु. ६३ पैसे, (सतरा हजार चार रुपये त्रेसष्ठ पैसे) अशी रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा आहे, अशाप्रकारे मयत कल्याण नरसु सुरवसे यांची दोन्हीही खात्यात मिळून रक्कम ३३,५१६ रुपये ११ पैसे जमा आहे. त्याबद्दल वारस दाखला Succession Certificate मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज अर्जदार नं. १ ते ३ यांना मिळणेकामी सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, 'मयत' मयत कल्याण नरसु सुरवसे यांना या अर्जदारा व्यतिरिक्त अन्य कोणी वारस असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा नेमलेली ता. ०६/०५/२०२५ रोजी आपल्या हरकती लेखी कागदपत्रानिशी सादर करावेत अन्यथा कोणाची कसल्याच प्रकारची हरकत आलेली नाही असे समजून सदर अर्जाचेकामी न्यायाच्या दृष्टीने योग्य तो आदेश होईल मागावून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दकरण ता. २९/०४/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
मा. सहाय्यक अधिक्षक सो.
सि.ज.ज्युनि.डि. सो., बार्शी.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM Re-Tender 3rd Call Notice**

Digitally signed online bids are invited through Re-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000035788 RE-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 19/2024-2025**, ( Re-Tender 3rd call notice) **Particulars: -** Work of height extension of 132kV Kurkumbh-Daund & 132 kV Kurkumbh-Janai EHV lines at one location due to crossing of NH Pune Hydrabad near 220 kV Kurkumbh substation Estimated **cost:** Rs. 73,85,650/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 73,856/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 29.04.2025 to 11.05.2025 **Last Date of Submission:** 11.05.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 12.05.2025 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**PRE-BID Meeting:** 02.05.2025 @ 12:00 pm at EHV O&M Circle Solapur.

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

**NOTICE**

NJ MUTUAL FUND
BUILT ON RULES

**Unaudited Half Yearly Financial Results of the Schemes of NJ Mutual Fund ("the Fund") for the half year ended March 31, 2025**

**Investors may note that in accordance with Regulation 59 of the SEBI (Mutual Funds) Regulations, 1996, read with SEBI circulars issued in this regard from time to time, the unaudited half-yearly financial results of the schemes of NJ Mutual Fund for the half year ended March 31, 2025, has been hosted on the website of the Fund i.e www.njmutualfund.com in a user-friendly and downloadable format (spreadsheet) and on the website of Association of Mutual Funds in India ("AMFI") i.e. www.amfiindia.com.**

**For NJ Asset Management Private Limited**
Investment Manager of NJ Mutual Fund
**Sd/-**
**Vineet Nayyar**
Director & Chief Executive Officer
**(DIN: 10690316)**

**Date: April 28, 2025**
**Place: Mumbai**

**For further details, please contact:** NJ Asset Management Private Limited (CIN U67100GJ2005PTC046959) **Registered office:** Block no. 601, 3rd floor, C Tower, Udhna Udyognagar Sangh Commercial Complex, Central Road No.10, Udhna. Surat - 394210. Gujarat. Telephone Number – 0261 6715601. **Corporate office:** Unit no. 101A, 1st floor, Hallmark Business Plaza, Bandra (East). Mumbai – 400051. Telephone number: 022 68940000 /1860 500 2888 / 040-49763510. **Email id:** customercare@njmutualfund.com **Website:** www.njmutualfund.com

**MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### भारतीय संघात मनू भाकर आणि कुसळे यांचा समावेश

**नवी दिल्ली** : पॅरिस ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर आणि स्वप्निल कुसळे यांना ८ जूनपासून सुरू होणाऱ्या रायफल/पिस्तूल विश्वचषक स्पर्धेच्या म्युनिक टप्प्यासाठी २३ सदस्यीय भारतीय संघात गत आशियाई क्रीडा विजेती पलकसह स्थान देण्यात आले. नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाने संघाची घोषणा केली. त्यामध्ये मनू भाकर ही दोन वैयक्तिक स्पर्धांमध्ये (महिला १० मीटर आणि २५ मीटर पिस्तूल स्पर्धा) भाग घेणारी एकमेव सदस्य होती. पुरुषांच्या एअर रायफलमध्ये संदीप सिंगचे राष्ट्रीय संघात पुनरागमन झाले आहे. पॅरिस गेम्समध्ये सहभागी झाल्यानंतर स्वप्निल कुसळे आणि संदीप सिंग पहिल्यांदाच एकमेकांशी स्पर्धा करणार आहेत. भारतीय रायफल आणि पिस्तूल संघ अलीकडेच अर्जेंटिना आणि पेरू येथे झालेल्या दोन टप्प्यांच्या संयुक्त विश्वचषक स्पर्धेतून परतले. संघाने सहा सुवर्णपदकांसह एकूण १५ पदके जिंकली होती. महाराष्ट्रातील राष्ट्रीय विजेती अनन्या नायडूला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थानिक सर्किटमध्ये तिची उत्कृष्ट कामगिरी सुरू ठेवण्याची संधी देण्यात आली आहे. पुरुषांच्या गटात एअर पिस्तूलमध्ये दोन नवीन नेमबाजांना संधी देण्यात आली आहे.



आयपीएल स्पर्धेत एमए चिदम्बरम् स्टेडियम येथे चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात बुधवारी होणाऱ्या सामन्यापूर्वी सराव करताना पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यर आणि सहकारी प्रियांश आर्य.

### संजीव सूर्यवंशींकडून बिहार क्रिकेट, द्रविडचे आभार

**पाटणा** : आयपीएलमधील सर्वांत तरुण शतकवीर वैभव सूर्यवंशीचे वडील संजीव सूर्यवंशी यांनी त्यांच्या मुलाच्या यशाबद्दल बिहार क्रिकेट आणि राजस्थान रॉयल्सचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांचे आभार मानले आहेत. संजीव सूर्यवंशी म्हणाले की, बिहार क्रिकेट आणि द्रविडचे आभार मानण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. लखनौ सुपर जायंट्सचे मालक संजीव गोयंका यांनी समाज माध्यमावर एक फोटो शेअर केला आहे. हा फोटो २०१७ चा आहे. संजीव गोयंका यांनी लिहिले, काल रात्री मी त्याची अद्भुत खेळी पाहिली. आज सकाळी मला वैभव सूर्यवंशीचा आठ वर्षे जुना फोटो सापडला. तो तेव्हा सहा वर्षांचा होता आणि माझ्या तत्कालीन संघ रायझिंग पुणे सुपरजायंट्सला पाठिंबा देण्यासाठी आला होता. धन्यवाद वैभव.

### आयएम विजयन् यांना डेप्युटी कमांडंटपदी पदोन्नती

**तिरुअनंतपुरम** : केरळ सरकारने मंगळवारी भारतीय फुटबॉल दिग्गज आयएम विजयन् यांच्यासाठी मलबार स्पेशल पोलिस बटालियनमध्ये डेप्युटी कमांडंटचे अतिरिक्त पद निर्माण करण्याचा आदेश पारित केला. खेळातील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना या पदावर नियुक्त केले. विजयन् सध्या मलबार स्पेशल पोलिस बटालियनमध्ये असिस्टंट कमांडंट म्हणून कार्यरत आहेत. सरकारने राज्य पोलिस प्रमुखांना आदेशानुसार पुढील कार्यवाहीचा आणि अहवाल सादर करण्याचा निर्देश दिला.

# चेन्नईला 'सुपर' विजयाची आशा

## गुणतालिकेत स्थान मजबूत करणार पंजाब किंग्ज

◆ **चेन्नई, २९ एप्रिल**

यावेळचा आयपीएल हंगाम चेन्नई सुपर किंग्जसाठी चांगला ठरला नाही. स्पर्धेत चेन्नईने ९ पैकी केवळ २ सामने जिंकले असून केवळ ४ अंक आहेत. तर उद्याचा प्रतिस्पर्धी पंजाब किंग्जने ९ पैकी ५ सामने जिंकून ११ अंक कमावले आहेत. चेन्नई सुपर किंग्ज प्लेऑफच्या शर्यतीतून जवळजवळ बाहेर पडला आहे. परंतु बुधवारी इंडियन प्रीमियर लीगमध्ये पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात ते चांगल्या कामगिरीने आपले नशीब बदलण्याचा प्रयत्न करतील. दुसरीकडे पंजाब किंग्ज संघ चेन्नईविरुद्ध विजय नोंदवून गुणतालिकेत आपले स्थान मजबूत करू इच्छित आहे.





चेन्नईसाठी सर्वांत निराशाजनक गोष्ट म्हणजे सीएसकेचा बालेकिल्ला असलेल्या चेपॉक येथील घरच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यात त्यांना अपयश आले. चेन्नईचा संघ प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आपल्या धूसर आशा जिवंत ठेवण्यासाठी स्पर्धेतील तिसरा विजय मिळविण्यासाठी उत्सुक असेल. कोपराच्या दुखापतीमुळे संघाबाहेर पडलेल्या ऋतुराज गायकवाडकडून कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर महेंद्रसिंग धोनीसारखा चमत्कारिक खेळाडूही संघात उत्साह निर्माण करण्यात अपयशी ठरला आहे. चेन्नई संघाला आतापर्यंत सूर गवसला नसल्याची कबुली कर्णधार महेंद्रसिंग धोनीने दिली. तो म्हणाला, आम्हाला फलंदाजी आणि गोलंदाजीसाठी संघर्ष करावा लागत आहे. उद्याच्या स्पर्धेत काही खेळाडूंमध्ये एक मनोरंजक स्पर्धा पाहायला मिळते. पॉवरप्लेमध्ये अर्शदीप सिंगचा सामना करताना चेन्नईचा युवा खेळाडू आयुष म्हात्रे दमदार कामगिरी करण्याचा प्रयत्न करेल. मधल्या षटकांमध्ये सर्वांत मनोरंजक लढत शिवम दुबे आणि युजवेंद्र चहल यांच्यात होण्याची अपेक्षा आहे. चहल उत्तम फॉर्ममध्ये आहे आणि चेन्नईचा मधला क्रम त्याच्या आव्हानाचा कसा सामना करतो हे पाहणे मनोरंजक असेल.

प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी पंजाबला चांगली सुरुवात करून दिली आहे आणि त्यांना रोखण्याची जबाबदारी डावखुरा वेगवान गोलंदाज खलील अहमदवर असेल. कर्णधार श्रेयस अय्यरच्या रूपात पंजाबला एक चांगला समन्वयक गवसला आहे. चेन्नईचा फिरकी गोलंदाज नूर अहमदला त्यांच्याविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. धोनी ४३ वर्षांचा असूनही, सामन्याचा शेवट सकारात्मक पद्धतीने करण्यास सक्षम आहे. परंतु विजय शंकर, दीपक हुडा आणि राहुल त्रिपाठीसारख्या भारतीय फलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल. रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन आणि मथिशा पाथिराना यांच्या गोलंदाजीतील संघर्षांचाही चेन्नईला फायदा झाला नाही. पंजाबकडे मार्को जॅन्सेनच्या रूपात एक चांगला अष्टपैलू खेळाडू आहे, तर गोलंदाजीची धुरा अर्शदीप आणि चहल यांच्याकडे असेल. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध पंजाब किंग्ज**
**स्थळ** : एम. ए. चिदंबरम स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : संध्याकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# गेल्या तीन-चार महिन्यांपासूनच्या परिश्रमाचे फळ : वैभव सूर्यवंशी

◆ **जयपूर, २९ एप्रिल**

गुजरात टायटन्सविरुद्ध ३५ चेंडूत आयपीएल शतक झळकावणारा सर्वांत तरुण खेळाडू ठरलेला १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी सामन्यानंतर म्हणाला की, तो गेल्या तीन ते चार महिन्यांपासून यासाठी कठोर परिश्रम करत होता आणि त्याचे फळ त्याला मिळाले आहे.



त्याच्या शतकाच्या जोरावर, राजस्थान रॉयल्सने विजयासाठी २१० धावांचे लक्ष्य २५ चेंडू शिल्लक असताना पूर्ण केले. सूर्यवंशीने ३५ चेंडूंत ११ षटकार आणि सात चौकारांसह आपले शतक पूर्ण केले. आयपीएलच्या इतिहासातील हे दुसरे सर्वांत जलद शतक आहे. तो पुरुषांच्या टी-२० क्रिकेटमध्ये शतक करणारा सर्वांत तरुण खेळाडूही ठरला.

विजयानंतर वैभव सूर्यवंशी म्हणाला, खूप छान वाटत आहे. आयपीएलमधील तीन डावांमधील हे माझे पहिले शतक आहे. मी गेल्या तीन-चार महिन्यांपासून यासाठी कठोर परिश्रम करत आहे आणि मला त्याचे फळ मिळाले आहे. मी फक्त चेंडूवर लक्ष केंद्रित करतो.

यशस्वी जयस्वालसोबतच्या त्याच्या शतकी भागीदारीबद्दल बोलताना तो म्हणाला, त्याच्यासोबत फलंदाजी केल्याने मला आत्मविश्वास मिळतो कारण तो खूप सकारात्मक आहे आणि तो सल्ला देखील देतो. यामुळे फलंदाजी करणे सोपे होते.

यापुढे गोलंदाज आता त्याला लक्ष्य करतील अशी भीती वाटते का असे विचारले असता तो म्हणाला, नाही, कोणतीही भीती नाही. मी त्याबद्दल विचार करत नाही. मी फक्त खेळण्यावर लक्ष केंद्रित करतो. (वृत्तसंस्था)

## दिग्गजांकडून कौतुकाचा वर्षाव

राजस्थान रॉयल्सचा १४ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशीने २८ एप्रिल रोजी शतक झळकावून अनेक विक्रम रचले. गुजरात टायटन्स विरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात त्याने फक्त ३५ चेंडूत शतक झळकावले, यासह तो आयपीएलच्या इतिहासात सर्वांत जलद शतक झळकावणारा फलंदाज बनला. त्याने युसूफ पठाणचा विक्रम मोडला. २०१० मध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध युसूफने ३७ चेंडूत शतक पूर्ण केले. वैभवची तडाखेबंद खेळी पाहिल्यानंतर सचिन तेंडुलकरपासून युवराज सिंगपर्यंत सर्व क्रिकेटपटूंनी त्याचे कौतुक केले.

सचिन तेंडुलकरपासून युवराज सिंगपर्यंत सर्वांनी वैभववर कौतुकाचा वर्षाव केला. सचिन तेंडुलकरने वैभवबद्दल ट्विट केले. सचिनने त्याच्या पोस्टमध्ये लिहिले की वैभवचा धाडसी दृष्टिकोन, फलंदाजीचा वेग, लवकर लांबीचा अंदाज घेणे आणि चेंडूमागे त्याची ऊर्जा हस्तांतरित करणे ही एका शानदार खेळीची कृती होती.

माजी भारतीय क्रिकेटपटू युवराज सिंग देखील वैभवचे कौतुक करण्यापासून स्वतःला रोखू शकला नाही. त्याने लिहिले की, १४ व्या वर्षी तू काय करत होतास? हा मुलगा डोळे मिचकावत जगातील सर्वोत्तम गोलंदाजांचा सामना करत आहे! वैभव सूर्यवंशी, नाव लक्षात ठेवा! निर्भय वृत्तीने खेळत आहे! पुढच्या पिढीला चमकताना पाहून खूप अभिमान वाटतो!

# प्रतीका रावलची विक्रमी कामगिरी

## मिताली राज, एलिस पेरीसोबत बरोबरी

◆ **कोलंबो, २९ एप्रिल**

महिलांच्या तिरंगी मालिकेतील दुसरा सामना मंगळवारी कोलंबोतील आर. प्रेमदासा स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका संघांमध्ये खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने निर्धारित ५० षटकांत ६ गडी गमावून २७६ धावा केल्या.

भारतीय संघाची सलामीवीर प्रतीका रावलने ७८ धावांची शानदार खेळी करत विक्रम केला. यासह तिने माजी भारतीय कर्णधार मिताली राज आणि ऑस्ट्रेलियन अष्टपैलू एलिस पेरी यांच्या विक्रमाची बरोबरी केली.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रतीका रावलने ९१ चेंडूत सात चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ७८ धावा केल्या. दक्षिण आफ्रिका महिलांविरुद्ध शानदार खेळी करून प्रतीका रावलने अनेक विक्रम केले. प्रतीका रावल ही महिला एकदिवसीय सामन्यात सर्वांत जलद ५०० धावा करणारी फलंदाज ठरली आहे. प्रतीकाने ८ व्या डावात ५०० धावांचा टप्पा ओलांडला. पुरुष आणि महिला क्रिकेटमध्ये ५०० धावा करणारी ती दुसरी सर्वांत जलद फलंदाज आहे. सर्वांत जलद ५०० एकदिवसीय धावांचा विक्रम दक्षिण आफ्रिकेच्या जानमन मलान (७ डाव) यांच्या नावावर आहे.



**मिताली राजनंतर प्रतीका**

प्रतीका रावलने महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलग पाचवे अर्धशतक झळकावले. यासह, ती माजी कर्णधार मिताली राजनंतर महिला एकदिवसीय स्वरूपात सलग पाच अर्धशतके झळकावणारी दुसरी भारतीय महिला क्रिकेटपटू बनली. तिने ऑस्ट्रेलियाची स्टार अष्टपैलू खेळाडू एलिस पेरीची बरोबरीही केली. (वृत्तसंस्था)

### रामेश्वर मुंजालवर डोपिंगप्रकरणी पाच वर्षांची बंदी

**नवी दिल्ली** : नेव्ही स्प्रिंटर रामेश्वर मुंजालवर मंगळवारी जागतिक ॲथ्लेटिक्सच्या ॲथ्लेटिक्स इंटिग्रिटी युनिटने पाच वर्षांची बंदी घातली आहे. त्याच्यावर प्रतिबंधित पदार्थांचे सेवन केल्याचा आरोप आहे. मुंजालने गेल्या वर्षी ८ डिसेंबर रोजी मुंबईत झालेल्या नौदल अर्ध मॅराथॉनचे विजेतेपद पटकावले होते.

# प्रतीका, स्नेह राणाच्या खेळीने महिलांचा विजय

## तंजीमच्या शतकानंतरही द. आफ्रिकेचा पराभव

◆ **कोलंबो, २९ एप्रिल**

प्रतीका रावलच्या अर्धशतकाच्या आणि स्नेहा राणाच्या पाच बळींच्या जोरावर भारतीय महिला संघाने श्रीलंकेत खेळल्या जाणाऱ्या तिरंगी मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १५ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने ५० षटकांत सहा गडी गमावून २७६ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेचा संघ ४९.२ षटकांत २६१ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर सामना गमावला. ४३ धावांत ५ गडी बाद करणारी स्नेह राणा सामनावीर ठरली.

दक्षिण आफ्रिकेकडून सलामीवीर तंजीम ब्रिट्सने शानदार खेळी करत शतक झळकावले. पण तिचे शतक वाया गेले. १०७ चेंडूंमध्ये १३ चौकार आणि तीन षटकारांसह खेळलेली त्याची १०९ धावांची खेळी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही.



सामनावीर स्नेह राणा : ४३ धावांत ५ बळी

दक्षिण आफ्रिकेने चांगली सुरुवात केली. लॉरा वोल्पाड्र्सने तंजीमसोबत डावाची सुरुवात केली आणि पहिल्या गड्यासाठी १४० धावांची भागीदारी केली. लॉरा ४३ धावा करून बाद झाली. तिला दीप्ती शर्माने बाद केले. यानंतर स्नेह राणाने आपली जादू दाखवायला सुरुवात केली. तिने लारा गुडॉलला बाद केले. दरम्यान, तंजीम संघाच्या १७० धावा असताना रिटायर हर्ट झाली. ती नंतर फलंदाजीला आली पण राणाने तिला बाद केले. सुन लुसला फक्त २८ धावा करता आल्या. चोले ट्रायॉनला १८ धावा आणि ॲनेरी दुर्कनला फक्त ३० धावा करता आल्या. यानंतर, झटपट गडी बाद झाले आणि दक्षिण आफ्रिकेचा संघ चार चेंडू आधीच सर्वबाद झाला. भारताकडून स्नेह राणाने ४३ धावांत पाच गडी टिपले. अरुंधती रेड्डी, श्री चरणी आणि दीप्ती यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना चमकदार कामगिरी केली. प्रतीका रावलने पहिल्या गड्यासाठी स्मृती मंधानासोबत शानदार भागीदारी केली. दोघींनीही पहिल्या गड्यासाठी ८३ धावांची भागीदारी केली. ५४ चेंडूत ३६ धावा करून मंधाना बाद झाली. तिच्या पाठोपाठ आलेल्या हरलीन देओलने २९ धावांचे योगदान दिले. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी प्रत्येकी ४१ धावा केल्या. ऋचा घोषने अखेर १४ चेंडूत २४ धावा केल्या. यामध्ये तीन चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. (वृत्तसंस्था)

### संथगती षटकासाठी भारतीय महिलांना दंड

**दुबई** : रविवारी कोलंबो येथे झालेल्या महिला तिरंगी मालिकेतील पहिल्या सामन्यात श्रीलंकेविरुद्ध संथगतीन षटके टाकल्याबद्दल भारताला त्यांच्या सामन्याच्या मानधनाच्या पाच टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

आयसीसीच्या आंतरराष्ट्रीय सामनाधिकारी पॅनेलच्या व्हेनेसा डी सिल्वा यांनी भारतावर वेळेच्या मर्यादेत लक्ष्यापेक्षा एक षटक कमी टाकल्याचा आरोप केला. खेळाडू आणि खेळाडूंच्या सहायक कर्मचाऱ्यांसाठी आयसीसीच्या आचारसंहितेच्या कलम २.२२ नुसार, जे किमान ओव्हर-रेट गुन्ह्यांशी संबंधित आहे, खेळाडूंना त्यांच्या संघाने दिलेल्या वेळेत टाकलेल्या प्रत्येक षटकासाठी त्यांच्या सामना शुल्काच्या पाच टक्के दंड आकारला जातो, असे आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे. भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरने गुन्हा कबूल केला आणि प्रस्तावित शिक्षा स्वीकारली. त्यामुळे औपचारिक सुनावणीची आवश्यकता नव्हती.


# चिदम्बरम् संयुक्तपणे रॅपिड श्रेणीत अव्वल स्थानी

◆ **वॉर्सा (पोलंड), २९ एप्रिल**

भारतीय ग्रॅण्डमास्टर अरविंद चिदम्बरम्ने दबावाखाली चांगली कामगिरी केली आणि ग्रॅण्ड चेस टूर अंतर्गत आयोजित सुपरबेट रॅपिड ॲण्ड ब्लिट्झ स्पर्धेच्या रॅपिड राऊंडच्या शेवटच्या गेममध्ये फ्रान्सच्या अलिरेझा फिरोजाला पराभूत करून ११ गुणांसह संयुक्तपणे पहिले स्थान पटकावले.

स्पर्धेत वाईल्ड कार्ड मिळविलेल्या चिदम्बरम्ला फिरोजा आणि स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेव्ह यांच्याशी बरोबरी करण्यासाठी विजय आवश्यक होता. फ्रेंच खेळाडूने थोडी लवकर हार मानल्याने त्याला नशीबाची साथ मिळाली. फिरोजाला सामना बरोबरीत संपवण्याची संधी होती.

आर. प्रज्ञानंदाने शेवटच्या दोन फेऱ्यांमध्ये रोमानियाच्या डेव्हिड गॅव्हिलेस्कू आणि डुडा यांच्यावर विजय मिळवत शानदार पुनरागमन केले आणि १० गुणांसह संयुक्त चौथ्या स्थानावर पोहोचला. फ्रान्सचा मॅक्सिम वाचियर-लाग्राव्ह नऊ गुणांसह त्याच्यापेक्षा फार मागे नाही, तो रोमानियाचा डीक बोगदान डॅनियल आणि डुडा यांच्यापेक्षा एक गुणाने पुढे आहे.



दहा खेळाडूंच्या स्पर्धेत गॅव्हिलेस्कू सात गुणांसह नवव्या स्थानावर आहे, जे माजी विश्वविजेत्या वेसेलिन टोपालोव्हपेक्षा दोन गुणांनी जास्त आहे. या दौऱ्याच्या पहिल्या स्पर्धेत ब्लिट्झ श्रेणीत अजूनही १८ सामने शिल्लक आहेत.

अरविंदने दिवसाची सुरुवात दुडावर विजय मिळवून केली. त्यानंतर आठव्या फेरीत तो वाचियर-लाग्रावेकडून पराभूत झाला. तथापि, पराभवाने त्याचे मनोबल कमी झाले नाही आणि त्याने फिरोजावर विजय मिळवून अव्वल स्थान मिळवले. या दौऱ्यात, खेळाडूंना विजयासाठी दोन गुण आणि बरोबरीसाठी एक गुण मिळतो. सुरुवातीच्या सहा सामन्यांनंतर प्रज्ञानंद पाच गुणांनी पिछाडीवर होता पण वाचियर-लाग्रेव्हला बरोबरीत रोखल्यानंतर त्याने शेवटचे दोन सामने जिंकून जोरदार पुनरागमन केले. (वृत्तसंस्था)

# श्रेयस, सूर्यकुमारसह अनेक खेळाडूंना आयकॉनचा दर्जा

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

मुंबई क्रिकेट असोसिएशनने २६ मे पासून सुरू होणाऱ्या टी-२० मुंबई लीग २०२५ हंगामासाठी आयकॉन खेळाडूंची यादी जाहीर केली. त्यामध्ये भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणेसह ८ खेळाडूंचा समावेश होता. टी-२० मुंबई लीग ६ वर्षांनी परतत आहे आणि आयपीएल २०२५ नंतर लगेचच खेळवली जाईल. ही लीग ८ मे रोजी संपेल.

या लीगच्या आयकॉन खेळाडूंच्या यादीत मुंबई क्रिकेट असोसिएशनने सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, अजिंक्य रहाणे, सरफराज खान, शार्दुल ठाकूर, पृथ्वी शॉ, शिवम दुबे आणि तुषार देशपांडे यांचा समावेश केला आहे. एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कामगिरीने मुंबईला अभिमान वाटणाऱ्या ८ आयकॉन खेळाडूंची नावे जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. ते मुंबई क्रिकेटच्या वारशाचे प्रतिनिधित्व करतात.

लीगमध्ये त्याचे सामील होणे केवळ उदयोन्मुख प्रतिभेला प्रेरणा देणार नाही तर त्याच्यासाठी शिकण्याची संधी देखील असेल. या खेळाडूंच्या लीगमधील उपस्थितीमुळे त्याचे स्थान वाढेल आणि चाहत्यांना एक रोमांचक आणि संस्मरणीय अनुभव मिळेल. (वृत्तसंस्था)

# मध्य रेल्वे सोलापूरचा आर.एन. स्टार इलेवनवर शानदार विजय

## पृथ्वीराज मिसाळ व परमजीत कदमची शानदार शतके, प्रवीण देशेट्टीचा अष्टपैलू खेळ

### रेल्वेची ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

रेल्वेच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेतील अ गटाच्या सामन्यात पृथ्वीराज मिसाळ व परमजीत कदमची शानदार शतके आणि प्रवीण देशेट्टीचा अष्टपैलू खेळाच्या जोरावर मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटने आर. एन. स्टार इलेवनवर २५0 धावांनी दणदणीत विजय मिळविला.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात बुधवारी झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना रेल्वेने निर्धारित ४0 षटकांत ३ बाद ३९४ धावांचा डोंगर उभा केला. यात सलामीच्या पृथ्वीराज मिसाळ (१५0) व परमजीत कदम (१२७) यांनी शानदार शतके झळकाविली. दोघांनीही पहिल्या विकेटसाठी २२५ धावांची महत्वपूर्ण भागीदारी केली. प्रवीण देशेट्टीनेही नाबाद ८९ धावा करीत अर्धशतकी खेळी केली. ३९५ धावांचे अवघड लक्ष्य आर.एन. स्टार इलेवनला पेलवले नाही.

त्यांचा डाव रेल्वेने १४४ धावांतच गुंडाळला. परमजीत (३ बळी) व प्रवीणने (२ बळी) गोलंदाजीत काम गिरी करीत संघाच्या विजयात अष्टपैलू खेळी केली. परमजीत व पृथ्वीराज यांना सामनावीर पुरस्कार विभागून देण्यात आले. रेल्वेचे लियाकत शेख व अक्षय भोसले यांच्या हस्ते त्यांना हे पुरस्कार देण्यात आले. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून चंदू मंजेली व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.

### संक्षिप्त धावफलक

**मध्ये रेल्वे इन्स्टिट्युट सोलापूर**: ४0 षटकांत ३ बाद ३९४ (पृथ्वीराज मिसाळ १५0, परमजीत कदम १२७, प्रवीण देशेट्टी नाबाद ८९ धावा, शफी शेख व आनंद उदगिकर प्रत्येकी १ बळी) वि. वि. **आर. एन. स्टार इलेवन** : ३१.२ षटकांत सर्व बाद १४४ (आकाश भोसले ४२, आनंद उदगिकर ३५, शाहिद शेख २२ धावा, परमजीत कदम व अनिश मुळे ३ बळी, प्रवीण देशेट्टी २ बळी).



## महत्वाचे...



### स्वामीनाम हेच सर्वश्रेष्ठ धन : आशा भोसले

**अक्कलकोट, दि.२९ एप्रिल-**
जीवनामध्ये नामस्मरणाला अनन्यसाधारण महत्व असून स्वामीनामाची महती मनन व चिंतन केल्याने होत असतो. मला या स्वामींच्या नामचिंतनाने ही महती कळाली असून स्वामीनाम हेच माझ्या जीवनातील सर्वश्रेष्ठ धन असल्याचे मनोगत जेष्ठ गायिका आशा भोसले यांनी व्यक्त केले. श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी गायिका आशा भोसले यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी गायिका आशा भोसले बोलत होत्या. पुढे बोलताना यांनी आशा भोसले यांनी श्री स्वामी समर्थ महाराजानी वटवृक्षाखाली साधना केली, तो वटवृक्ष नामस्मरणरूपी सावली आहे. यात आपल्या ऐश्वर्याचा आनंद सामावलेला आहे. हा आनंद आपणाला वटवृक्षाच्या सावलीने व स्वामींच्या दर्शनातून भेटतो. त्यामुळे या प्रेरणेतून आज येथे स्वामींच्या मंदिरात बसून तारक मंत्र म्हटले आहे. उर्वरित आयुष्यही स्वामींच्या नामस्मरणातच व्यतीत करून जीवन सार्थकी करायचं असल्याचे मनोगतही आशा भोसले यांनी व्यक्त केले. या प्रसंगी प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, यांच्यासह स्वामीभक्त व देवस्थानचे कर्मचारी, सेवेकरी उपस्थित होते.

### शेतकऱ्यावर लोखंडी रॉडने हल्ला

**बार्शी, दि. २९ एप्रिल-**
शेतात जात असताना धनाजी प्रताप नवले (वय ३३, रा. कांदलगाव) यांच्यावर गावातीलच पांडुरंग जगदाळे (करडे) व त्याचा मुलगा नरसिंग जगदाळे (करडे) यांनी रस्ता अडवून लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने जबर मारहाण केली. कांदलगाव येथे २३ एप्रिल रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास ही घटना घडली होती. फिर्यादी धनाजी नवले हे दुचाकीवरून कांदलगाव शिवारातील बप्पा साखरे यांच्या शेताकडे जात असताना कांदलगाव ते सिरसाव रस्त्यावर आरोपींनी किरकोळ कारणावरून वाद निर्माण करून नरसिंग याने लोखंडी रॉडने त्यांच्या डाव्या हातावर तसेच पायावर घाव घातले. पांडुरंग याने लाकडी दांडक्याने मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत धनाजी नवले यांचा डावा हात फॅक्चर झाला असून, एका अनोळखी व्यक्तीने त्यांना घरी आणून सोडले. नंतर त्यांच्या भावाने व इतरांनी त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालय बार्शी येथे उपचारासाठी दाखल केले. तेथून पुढील उपचारासाठी धाराशीव येथील सरकारी रुग्णालयात पाठविण्यात आले. मात्र, त्यांनी बार्शी येथील जगदाळे मामा रूग्णालयात उपचार घेतले. या प्रकरणी धनाजी नवले यांनी पांडुरंग जगदाळे (करडे) व नरसिंग जगदाळे (करडे) यांच्याविरुद्ध बार्शी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास सुरु आहे.



### सिंहगड महाविद्यालयात शिष्यवृत्ती संधींवर व्याख्यान

**पंढरपूर, दि. २९ एप्रिल-**
एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कोर्टी (पंढरपूर) येथे अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती संधी या विषयावर विशेष मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या अनुसूचित जाती-जमाती विकास कक्षाच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून समाजकल्याण विभाग, सोलापूरचे सहाय्यक आयुक्त संदीप धर्मराज मोरे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रविंद्र कदम-पाटील यांची ऑनलाइन उपस्थितीही लाभली होती. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते समाजकल्याण विभाग, सोलापूरचे सहाय्यक आयुक्त संदीप धर्मराज मोरे यांनी विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य शासनामार्फत मिळणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची सखोल माहिती दिली. त्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना, पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना, विद्यापीठीय तसेच परदेशी शिक्षणासाठीच्या योजनांबाबत मार्गदर्शन केले. तसेच पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे याबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही त्यांनी केले. महाविद्यालयातील सर्व शाखांतील सुमारे ७० विद्यार्थी या व्याख्यानात सहभागी झाले होते. सूत्रसंचलन वैष्णवी चव्हाण व पूर्वा वाखरकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. सोमनाथ कोळी यांनी मानले.

# मुलींना कुटुंबात समतेची वागणूक मिळावी

**डॉ. समीरा गुजर-जोशी यांचे प्रतिपादन**

**भगवंत व्याख्यानमालेत गुंफले दुसरे पुष्प**




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ एप्रिल-**
पुराण काळापासून जिजाऊ, सावित्री, अहिल्याबाई, रखमाबाई, आनंदीबाई यांच्यासारख्या तेजस्वी महिलांनी आपल्या कर्तृत्वातून समाज व राष्ट्र घडवले असून अशा महिला निर्माण होण्यासाठी मुलींना बालपणापासूनच कुटुंबात समतेची वागणूक मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अभिनेत्री डॉ. समीरा गुजर-जोशी यांनी केले.

मातृभूमी प्रतिष्ठान व भगवंत मल्टीस्टेट को-ऑपरेट क्रेडीट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने भगवंत जयंतीनिमित्त आयोजित सातव्या व्याख्यानमालेत स्त्री नायिका घरातही आणि बाहेरही या विषयावर त्या बोलत होत्या.

वैद्यकीय अधिकारी डॉ. शीतल बोपलकर अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी भूमी अभिलेख अधिकारी रेश्मा तांबारे, वस्तू व सेवा कर अधिकारी दीप्ती जाधव ,मुख्याध्यापिका कविता धावणे, माधुरी ठोंबरे, मयुरी बरबडे, व्यासपीठावर उपस्थित होत्या. यावेळी डॉ. गुजर म्हणाल्या, दातृत्वामध्ये खरी श्रीमंती आहे ज्यांच्या घरी लक्ष्मी पाणी भरते त्यांनी समाजातील गरजूंना आधार द्यायला हवा. मातृभूमी प्रतिष्ठानची अन्नछत्रालयाचे काम अतिशय कौतुकास्पद आहे. या कामातील स्त्रियांचा सहभाग महत्वाचा आहे. स्त्री ही प्राचीन काळापासून सर्वार्थाने कुटुंब समाज व राज्य सांभाळणारी आहे. स्त्रियांना उपजत शहाणपण असते त्यांच्यामध्ये समाज पुढे नेण्याची वृत्ती असते. त्यामुळे जिजाऊंपासून अहिल्याबाई पर्यंत अनेक स्त्रियांनी आदर्श राज्यकारभार केला आहे.

शिक्षणाच्या पलीकडे जाऊन एखादी स्त्री किती समृद्ध असते याचे दर्शन बहिणाबाई चौधरी यांच्या जीवनात आढळते. शाळेत न गेलेल्या बहिणाबाईंच्या नावाने विद्यापीठ आहे, यातूनच त्यांचे मोठेपण कळते. मात्र स्त्रियांना अनिष्ट रुढी, प्रथा परंपरा यांच्या चौकटीमध्ये शिकता आहे ही मनसिकता नाकारुन स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव दिला पाहिजे. स्त्रियांच्या गुणवत्ता कला कौशल्य क्षमता यांना अनुरुप क्षेत्रात त्यांना काम करु दिले पाहिजे. स्त्रियांवर कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना स्त्री म्हणून असलेल्या सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्यात अशी अपेक्षा केली जाते. त्यामुळे स्त्रियांना मोठे शारीरिक मानसिक ताण-तणाव कष्टांना सामोरे जावे लागते. त्यामुळे स्त्रियांना जोडीदाराने सर्व कामात सहकार्य केले पाहिजे पण पारंपारिक मानसिकता असलेल्या स्त्रियाच स्त्रियांच्या व्यक्ती स्वातंत्र्याच्या आड येतात, त्यामुळे स्त्रियांचे शोषण होते. चित्र बदलले पाहिजे स्त्रियांना कुटुंबामध्ये बालपणापासूनच निसर्गदत्त समतेची वागणूक मिळाली पाहिजे.

कल्पना चावलापासून सुनीता विल्यमपर्यंत स्त्रियांनी घेतलेली गगन भरारी जगाला पुढे नेणारी आहे. अनेक स्त्रियांनी आपल्या जीवनात क्रांतिकारी निर्णय घेतले आणि समाजापुढे आदर्श निर्माण केला. रखमाबाई राऊत यांच्यासारख्या महिलांनी बालविवाहामुळे निर्माण झालेले संकट जुगारले. त्याकाळी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. त्याकाळी आपल्या व्यक्ती स्वातंत्र्याला जपत रखमाबाईंनी शिक्षण घेतले व त्या डॉक्टर झाल्या. अशा स्त्रियाच समाजामध्ये आपले स्थान आणि प्रतिष्ठा जपू शकतात. स्त्री ही घरात आणि बाहेरही नाही का म्हणून काम करु शकते. मात्र तिला कुटुंबाने आणि समाजाने सहकार्य करणारी व्यवस्था उपलब्ध करुन दिली पाहिजे. विविध महान स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेताना डॉ. गुजर यांनी आपल्या व्यक्तिगत जीवनातील संघर्षाचे वेगवेगळे टप्पे उलगडून दाखवले व चित्रपटातील नायिका ते पीएचडी झालेल्या डॉक्टर पर्यंतचा प्रवास सांगितला. प्रास्ताविक राजकमल हेड्डा यांनी केले. पाहुण्यांचा परिचय वर्षा चांगभले यांनी करुन दिला तर आभार स्मिता देशमुख यांनी मानले. यावेळी मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष ठोंबरे, सचिव प्रतापराव जगदाळे, संचालक सर्वश्री मुरलीधर चव्हाण, किरण गाढवे, शहाजी फुरडे-पाटील, विकास भालके, सयाजीराव गायकवाड आदी उपस्थित होते.

## अक्कलकोट येथील बैलगाडी शर्यतीत ११० बैलजोडीचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२९ एप्रिल-**
ठाकरे गटाचे शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली नागणसूर येथे आयोजित केलेल्या बैलगाडी शर्यत व रक्तदान शिबिरास प्रतिसाद मिळाला असून ५५१ शेतकऱ्याने रक्तदान केले. तर बैलगाडी शर्यती ११० बैल जोडी सहभाग झाले.

अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर येथे रक्तदन शिबीर व बैलगाडी शर्यत शेतकरी क्रांती सेना संस्थापक तथा शिवसेना तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांचा नेतृत्वाखाली आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन बसवलिंग महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले. या बैलगाडी शर्यतीमध्ये शेकडो बैलगाडी मालक सहभाग नोंदवून कार्यक्रम अभुतपूर्व प्रतिसाद दिला. यावेळी सर्व शेतकऱ्यांनी पैलगाव हल्ल्यात शहीद झालेल्या देशवासीयांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उद्या भविष्यात देशाच्या जवानाना रक्त कमी पडू नये म्हणून ४५१ शेतकऱ्याने रक्तदान केले. या शर्यती ११० बैल जोडी सहभाग झाले होते. बैलगाडी शर्यतीला दहा हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे, शरण सुरवसे, शांतिवीर कळसगोंडा, मल्लिनाथ कल्याण, बसवराज पुजारी, नितीन मोरे, नागेश आळगी, शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी, शेतकरी क्रांती सेनेचे पदाधिकारी, दोस्ती दरबार ग्रुप मित्र मंडळ नागणसूरसह मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अकलूजमध्ये हिंदुत्ववादी संघटनांचा मोर्चा

**पहलगाम हल्ल्याचा निषेध**




**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २९ एप्रिल-**
पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यांचा निषेधार्थ हिंदू जनजागृती समितीच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर सोमवारी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यामध्ये हिंदू जनजागृती समिती बरोबरच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शिवसेना, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड आदी संघटना सामील झाल्या होत्या.

अकलूज येथील डॉ. आंबेडकर चौकातून मोर्चास सुरूवात करण्यात आली. उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी, मुर्शिदाबाद मधील हिंसाचाराची सीबीआयमार्फत चौकशी करावी, हिंदूवरील अत्याचारात सहभागी पोलिस व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, ज्या हिंदूंचे घर, व्यवसाय, मंदिर याचे नुकसान झाले आहे त्याचे पुनर्वसन करावे अशा विविध मागण्या करण्यात आल्या. माळशिरस तालुका व अकलूज शहर मुस्लिम समाजाच्या वतीने ही विजय चौक येथे मेणबत्ती लावून अतिरेक्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली नंतर काळया फीती लावून मोर्चाने जाऊन प्रांत कार्यालयांमध्ये निवेदन दिले.



## मराठा सेवकांची ग्राहक उद्योग व्यवसाय चिंतन बैठक

**बार्शी, दि. २९ एप्रिल-**
मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी बार्शी तालुक्यामध्ये नेमलेल्या मराठा सेवकांची बैठक प्रत्येक महिन्यामध्ये एका गावात होणार असून या बैठकीमध्ये मराठा समाजातील ग्राहक जागरुक करणे, मराठा समाजातील तरुणांना व्यापारासाठी प्रवृत्त करणे, उद्योग व्यवसाय निर्माण करणे यासाठी गावोगावी मराठा समाजाच्या बैठका बार्शी तालुक्यात चालू आहेत. पुढच्या काळात आरक्षणाच्या लढ्यासोबत समाज आर्थिक मजबूत करणे, त्याचबरोबर शिक्षणामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे, समाज निर्व्यसनी करणे या कामावरती भर दिला जाणार आहे. बार्शी तालुक्याचे मराठा नेते आनंद काशीद, मराठा सेवा संघ वैरागचे अध्यक्ष धनराज गरड, भीमराव गंडुरे, शेंद्री निलेश डोईफोडे, प्रमोद डोईफोडे, सुरडी अभिजीत मोरे, घाणेगाव मधुकर डुरे, इरले पंकज सरकाळे इरलेवाडी, दादासाहेब जाधव तडवळे, कृष्णा कदम उंडेगाव, गंगाराम काकडे सचिन शिरसागर अतुल काकडे विश्वनाथ शिंदे वसुदेव सर्वदे उपस्थित होते.

## तंत्रज्ञान युगात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे : खेडगी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**
सध्याच्या विज्ञान व तंत्रज्ञान युगात विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्राध्यापकांबरोबरच आजी व माजी विद्यार्थ्यांसह पालक वर्गांनी सुद्धा यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांनी केले.

येथील सी. बी. खेडगी महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटना आयोजित वार्षिक माजी विद्यार्थी सुसंवाद स्नेहमेळावा संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून चेअरमन खेडगी बोलत होते.व्यासपीठावर प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट, पर्यवेक्षक संजय कलशेट्टी, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष शिवशरण अचलेर, समन्वयक डॉ. गणपतराव कलशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक समन्वयक डॉ. गणपतराव कलशेट्टी यांनी केले. विद्यार्थ्यांनी मागील जुन्या आठवणीबाबत चर्चा केले त्याचबरोबर जुन्या आठवणी मधील शिक्षकांच्या शिकवायची पद्धत व त्यांचे राहणीमान उच्च विचारसरणी याबाबत ही विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये गप्पा रंगल्या होत्या.

प्राचार्य डॉ. आडवीतोट यांनी शैक्षणिक धोरण २०२० व NC मूल्यांकनात झालेला अपेक्षित बदल याबाबत मार्गदर्शन केले. तसेच माजी विद्यार्थी बांधवांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सतत प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष शरणप्पा अच विचार व्यक्त केले. आपण सर्वांनी सामूहिक रित्या सकारात्मकपणे संघटित होऊन महाविद्यालयाची सन्मान सन्मान उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन दिले. मेळाव्यातून पर्यवेक्षक प्रा. संजय कलशेट्टी, डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, प्रा.एस.एम.परांजपे, प्रा. जयश्री बिराजदार, प्रा. यशोधरा तेलंग, उपमुख्याध्यापिका विजयालक्ष्मी भूसणगी, प्रा. मेघाराणी कलशेट्टी, सविता बाके, शंकर व्हनमाने, प्रा. योगेश कबाडे, प्रा. अरविंद शिंदे, प्रा. प्रकाश सुरवसे, डॉ. एम. एल. गौर, धर्मराज अरबळे व विद्यार्थिनी कुमारी रामपुरे यांनी विचार व्यक्त केले. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी डॉ. आप्पासाहेब देशमुख, प्रा. निलेश भरमशेट्टी, ग्रंथपाल प्रा.आर.आर.कांबळे, प्रा. गेनसिद्ध पुजारी, प्रा. श्रीकांत जिड्डीमनी, डॉ. सी. डी. अणेकर, सुहास होटकर, ज्येष्ठ लिपिक विरुपाक्ष कुंभार, अशोक कोरे, राजू चव्हाण, बाबू बोलदे, अभिषेक आळगी, परमेश्वर कलबुर्गी, सिद्धाराम चअरबळे, राजू हूच्चे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्राध्यापक प्रकाश सुरवसे यांनी केले. तर आभार डॉ. एम. एल. गौर यांनी मानले.

## निधन वृत्त...

### रेवणसिद्धप्पा होसुरे



**अक्कलकोट, दि.२९ एप्रिल**
तालुक्यातील कडबगाव येथील आरपीएफ (जवान) तत्कालीन हेड कॉन्स्टेबल रेवणसिद्धप्पा पावडेप्पा होसुरे यांचे आज सायंकाळी पाचच्या सुमारास वृध्दापकाळाने ९४ वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा बुधवार दि. ३० एप्रिल रोजी दुपारी एक वाजता कडबगाव येथील राहत्या घरातून निघणार आहे. हंजगी आश्रम शाळेतील लॅब असिस्टंट संतोष होसुरे यांचे ते वडील होत.

### लक्ष्मीबाई सारंगी



**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**
शासकीय सहकार क्षेत्रातील माजी लेखा परीक्षक काशिनाथ यल्लप्पा सारंगी यांच्या पत्नी लक्ष्मीबाई सारंगी (वय ६७) यांचे रविवार दि. २७ एप्रिल रोजी निधन झाले. पद्मशाली वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## माळशिरस तालुक्यात ११ टँकर सुरु



**गट विकास अधिकारी पवार यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २९ एप्रिल-**
तालुक्यातील पश्चिम भागातील गावांत पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून गारवाड, मगरवाडी, सुळेवाडी, बचेरी, शिगोर्णी, लोणंद, लोंढे मोहितेवाडी, कोथळे, शिवारवस्ती, निटवेवाडी, पळसमंडळ या ११ गावात व गावालगतच्या वाड्यावस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली. यावेळी पाणीपुरवठा उपअभियंता डी.एन.हुन्नुरे, कारंडे आदी उपस्थित होते.

तालुक्याच्या पश्चिम भागात पाऊस कमी झाल्याने या भागातील नाले, ओढे, वाहिले नाहीत, तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरले नाहीत. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तापमानामुळे पाणी पुरवठा विहिरी कोरड्या पडू लागल्या आहेत.. तालुक्यातील गारवाड (२४ हजार लिटर) मगरवाडी (१२ हजार लिटर), सुळेवाडी (२४ हजार लिटर), बचेरी (२४ हजार लिटर), शिगोर्णी (२४ हजार लिटर) या गावांना यापूर्वी टँकर सुरु झाले आहेत. लोणंद (१० हजार लिटर),लोंढे मोहितेवाडी (१० हजार लिटर), कोथळे (२४ हजार लिटर) या गावांना २६ एप्रिल तर शिवारवस्ती (२४ हजार लिटर),निटवेवाडी (२४ हजार लिटर), पळसमंडळ (२४ हजार लिटर) या गावांना २७ एप्रिल पासून टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.



## विद्यार्थ्यांनी विचारांची उंची वाढवावी : कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि २९ एप्रिल**
महाविद्यालयातून युवकांना शाश्वत ज्ञान मिळत असल्यामुळे वाचन चिंतन करून विद्यार्थ्यांनी प्रगल्भ विचाराची प्राप्ती केली पाहिजे. जीवन जर सुखमय व आनंददायी करावयाचे असेल तर विचारांची उंची वाढवली पाहिजे असे प्रतिपादन शांभवी कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर संचालक मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते. यावेळी मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रा. राजशेखर पवार यांनी केले. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा. डॉ. शितल झिंगाडे -भस्मे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी मानले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड येथील ग्रामपंचायत सरपंचपदी **बेबीताई पाटील** यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल तसेच सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत **उदय पाटील** भरघोस मतांनी विजय झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!



आमचे नेते / नूतन संचालक — मा.सुरेशजी हसापुरे साहेब
नूतन सरपंच — मा.बेबीताई पाटील
नूतन संचालक — मा.उदय पाटील

शुभेच्छुक
महेश पाटील
विलास बनसोडे
सर्व मित्र परिवार, संजवाड



महात्मा बसवेश्वर जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा!



॥ अक्षय तृतीया ॥

अक्षयतृतीया व श्री महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त शुभेच्छा!

शुभेच्छुक
मा. शारदाताई कडते, सरपंच
मा.अमित नरुटे, उपसरपंच
सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व समस्त ग्रामस्थ कंदलगाव, ता.द.सोलापूर

श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकपदी **सौ.अनिता केदार विभूते** यांनी घवघवीत विजय मिळवल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!



विजयाचे शिल्पकार — आ.सचिन कल्याणशेट्टी



खंबीर साथ — मा.केदार विभूते (मामा)



नूतन संचालिका — मा.अनिता केदार विभूते

शुभेच्छुक
ट्रॉय पब्लिक इंग्लिश मिडीयम स्कूल
हत्तूर, ता.दक्षिण सोलापूर
चेअरमन श्रीकांत भरले

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आमचे नेते **मा.सुरेश हसापुरे** यांनी भरघोस मतांनी विजय मिळविल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..!





किंगमेकर — आ.सचिन कल्याणशेट्टी



॥ अक्षय तृतीया ॥

अक्षयतृतीया व श्री महात्मा बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा!



आमचे नेते / नूतन संचालक — मा.सुरेशजी हसापुरे साहेब

शुभेच्छुक
तपस्वी कन्स्ट्रक्शन, सोलापूर
विक्रम कन्स्ट्रक्शन, सोलापूर
विक्रम झाडबुके, मो.नं.९१६८५९६९६९



॥ अक्षय तृतीया ॥

अक्षयतृतीया व श्री महात्मा बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा!

शुभेच्छुक
श्री विश्वकर्मा ट्रेडर्स, भंडारकवठे
सर्व प्रकारचे बांधकाम साहित्य मिळतील.
भगवान सुतार । मो.९४२१७८१४२५
सागर सुतार । मो.९०२८३६४०२५



॥ अक्षय तृतीया ॥

अक्षयतृतीया व श्री महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त शुभेच्छा!

शुभेच्छुक
मा.उमा बिराजदार
अध्यक्ष : आदर्श कामधेनू संशोधन संस्था संचलित,
श्री. कट्टेव्वादेवी गोशाळा,
वडकबाळ, ता.दक्षिण सोलापूर
सर्व आजार व व्याधींवर गोमय उत्पादनाने उपचार केले जातात.
श्री. रुद्रप्पा बिराजदार । मो.७५८८७९६१४७



॥ अक्षय तृतीया ॥

अक्षयतृतीया व श्री महात्मा बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा!
सोलापूर येथील श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीवर **आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार दिलीप माने** व **सुरेश हसापुरे** यांच्या पॅनलने दणदणीत विजय मिळविल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..!



आ.सचिन कल्याणशेट्टी
खा.प्रणितीताई शिंदे
नूतन संचालक — मा.दिलीप माने (मालक)
नूतन संचालक — मा.सुरेशजी हसापुरे
नूतन संचालक — मा.रामप्पा चिवडशेट्टी
नूतन संचालक — मा.अतुल गायकवाड



खंबीर साथ — मा.श्रीकांत मेलगे-पाटील
तालुका कार्याध्यक्ष — मा.सचिन (भाऊ) व्हनमाने

शुभेच्छुक
सचिन व्हनमाने,
तालुका कार्याध्यक्ष, दक्षिण सोलापूर
एस.व्ही.डेव्हलपर्स,
डी.एम.ग्रुप, होटगी



॥ अक्षय तृतीया ॥

अक्षयतृतीया व श्री महात्मा बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा!



शुभेच्छुक
विश्वकर्मा ज्वेलर्स
शिवबसव चौक, मेनरोड, बाजारपेठ, मंद्रुप
श्री. बसवराज रामचंद्र सुतार
मो.नं. ९८२२४८४९२२ । ८२०८७०६०६५



॥ अक्षय तृतीया ॥

अक्षयतृतीया व श्री महात्मा बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा!

शुभेच्छुक
विश्वकर्मा ट्रेडर्स
भंडारकवठे रोड, मु.पो.मंद्रुप,ता.दक्षिण सोलापूर
सर्व प्रकारचे बांधकाम साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण...
लक्ष्मण सुतार । मो.८८०६४७४७२२
धनंजय धर्माधिकारी । ८७८८८७८१२६


हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर • दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूरचा सुंद्रीवादक मयुरेश जाधवला पंडित चौरसिया शिष्यवृत्ती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

ठाण्याच्या गुरुकूल प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारी मानाची पाच लाखांची पंडित हरिप्रसाद चौरसिया शिष्यवृत्ती सोलापूरचा नवोदित सुंद्रीवादक मयुरेश जाधव यास मिळाली आहे.

ठाण्यातील टाऊन हॉल ॲम्फि थिएटरमध्ये झालेल्या स्वरप्रभात कार्यक्रमात पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया आणि पंडित विवेक सोनार यांच्या हस्ते ही शिष्यवृत्ती मयुरेशला देण्यात आली. यावेळी ज्येष्ठ गायक पंडित सुरेश बापट, गोरखनाथ जाधव उपस्थित होते.

मयुरेश गुरुवर्य पंडित भिमण्णा जाधव यांच्याकडून सुंद्रीवादनाचे प्रशिक्षण घेत आहे. मयुरेश हा सुंद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचा पणतू तर पंडित चिदानंद जाधव यांचा नातू आहे. जाधव घराण्याची पाचवी पिढी सुंद्री वादनाचे जतन व संवर्धन करत आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### तरुणाने प्राशन केले झुरळ मारण्याचे औषध

**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**



अज्ञात कारणातून तरुणाने झुरळ मारण्याचे औषध प्राशन केले. हा प्रकार रविवार पेठेत २७ मे रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास घडला. शिवराम अशोक डुर्लेकर ( वय ३१, रविवार पेठ सोलापूर) असे औषध प्राशन केलेलं तरुणाचे नाव आहे. २७ मे रोजी दुपारी शिवराम हा त्याच्या रविवार पेटीतील घरात होता. त्यावेळी त्याने अज्ञात कारणातून झुरळ मारण्याचे औषध केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने मित्र दत्तात्रय याने त्यास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकीचा कट लागल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

जुना कारंबा नाका रस्त्यावरून येताना मेंगाण वस्ती समोर समोरून आलेल्या अज्ञात दुचाकीचा कट लागल्याने तरुण जखमी झाला. हा अपघात सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास घडला. बालाजी कैलास नवगिरे (वय २५ रा न्यू बुधवार पेठ सोलापूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास बालाजी दुचाकीवर पाठीमागे बसून जुना कारंबा नाका परिसरातून जात होता. मेंगाने वस्ती समोरील रस्त्यावर समोरून आलेल्या दुचाकी धारकाने बालाजी जात असलेल्या दुचाकीला कट मारला. यामध्ये खाली पडल्याने बालाजीच्या पायाला मार लागला. रात्री नऊ वाजता मित्र प्रतीक याने उपचाराकरिता शासकीय गुन्हा दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### अज्ञात दुचाकीच्या धडकेत दोघेजण जखमी

**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**



मार्केट यार्ड ते शेळगी पुल या दरम्यान अज्ञात दुचाकीच्या धडकेत दोघेजण जखमी झाले. हा अपघात सोमवारी रात्री ७:४५ च्या सुमारास घडला. वकिल रजाकसाब मिरदे ( वय ५५) व रफिक शाबोद्दीन मिरदे ( वय ५० रा. मित्र नगर, शेळगी) अशी जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. सोमवारी रात्री शकील व रफिक असे दोघे दुचाकी वर बसून मार्केट यार्ड पासून शेडगेच्या दिशेने जात होते. शेळगी येथील ज्वारी संशोधन केंद्र समोरील रस्त्यावर त्यांना अज्ञात दुचाकी धारकाने धडक दिली. यामध्ये खाली पडून दोघे जखमी झाले. दोघांना अरबाज याने शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



# शहरात भगवान परशुराम जन्मोत्सवाचा उत्साह

## युवक-युवतींचा लेझीम ताफा : हजारो समाज बांधव सहभागी : प्रतिष्ठापनेनंतर चार हुतात्मा चौकात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

देशभरात आज भगवान परशुराम जयंती साजरी केली जाते. सोलापुरात यानिमित्त ब्राह्मण समाजातर्फे भव्य मिरवणूक काढण्यात आली. संध्याकाळी चार हुतात्मा पुतळा परिसरात मंत्रोच्चारात भगवान परशुराम जयंती साजरी केली.
**- मोहन दाते,** दाते पंचांगकर्ते, सोलापूर.

यंदा परशुराम जयंती निमित्त सोलापूर शहरात राज्यामध्ये सर्वाधिक मोठा अडीचशे समाज बांधवांचे लेझीम पथक सादर करण्यात आले.
**- संतोष पंतोजी,** पदाधिकारी, भगवान परशुराम जन्मोत्सव समिती.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

भगवान परशुराम जयंती निमित्त सोलापूर शहरात मंगळवारी भगवान परशुराम जन्मोत्सव समितीतर्फे भव्य मिरवणूक काढण्यात आली.

दुपारी चार वाजता दत्त चौकातून मिरवणुकीला प्रारंभ झाला. नवी पेठ,चौपाड, मेकॅनिकी चौक, प्रभात थिएटर वरून चार हुतात्मा पुतळा येथे मिरवणूकीचा समारोप करण्यात आला. पारंपारिक वाद्यांच्या सहाय्याने काढण्यात आलेली मिरवणूक व २५० समाज बांधवांचे लेझीम पथक लक्षवेधी ठरले.

मिरवणुकीत तरुण-तरुणींचे लेझीम पथक अतिशय उत्कृष्ट पद्धतीने आपली सेवा अर्पण करत होते. मिरवणुकीस सोलापूर शहरातील ब्राह्मण समाजातील नेते, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह बहूसंख्येने ब्राह्मण समाज बांधव उपस्थित होते.

**जुळे सोलापूरात पारंपरिक वेशभूषा परिधान करत काढली शोभायात्रा**

भगवान परशुराम जन्मोत्सव समिती जुळे सोलापूरच्या वतीने केएलई स्कूलच्या मैदानावर भगवान परशुराम महाराजांच्या मूर्तीची पूजा करण्यात आली. यावेळी सवाद्य मिरवणूक काढत भगवान परशुरामांची प्रतिष्ठापना स्थापना करण्यात आली. यावेळी मूर्तीचे पूजन ब्राम्हण समाजाचे नेते प्रा. काकासाहेब कुलकर्णी, अमोल जोशी, स्वागताध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, अध्यक्ष सुधीर कुलकर्णी महिला अध्यक्षा सायली जोशी, भाजपच्या ज्येष्ठ नेत्या अनुजा ताई कुलकर्णी, युवा नेते संकेत किल्लेदार यांच्या हस्ते करत मिरवणूकिस प्रारंभ झाला. जय परशुराम या जयघोषचा निनाद करत बाल, महिला, आबलवृद्ध हाजारोच्या संख्येने सहभागी झाले होते. सदर मिरवणूक के एल ई स्कूल, गोविंदश्री मंगल कार्यालय, डी मार्ट व पुन्हा के एल ई स्कूल अशा मार्गवर मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ३०० महिलांचे लेझीम पथक हे विशेष आकर्षण होते. याच बरोबर ५० लोकांनी रक्तदान करत आपला सहभाग नोंदवला. यांनतर पंकज कुलकर्णी यांच्या पौरोहित्या खाली परशुराम महाराजाची स्थापना करण्यात आली. यावेळी डाळ पन्हे यांचा प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी ॲड. शर्वरी रानडे, अरुण कुलकर्णी, विक्रम डोनसाळे, दैदिप्य वढापूरकर, कपिल कुलकर्णी, योगेंद्र पूजारी, रवींद्र नाशिककर, अनिता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### डॉ. वळसंगकरांनंतर सोलापुरात

# डॉ. आदित्यने स्वत:चा गळा कापून केली आत्महत्या

## मंगळवारी उघडकीस आली घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल-**

महाराष्ट्रातील प्रख्यात न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांनी अलीकडेच आपल्या राहत्या घरात गोळी झाडून आत्महत्या केली. एका बड्या डॉक्टरने अशाप्रकारे जीवन संपवल्याने वैद्यकीय क्षेत्र हादरून गेलं. ही घटना ताजी असताना आता सोलापुरात आणखी एका डॉक्टरने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.



सोलापूरात एका नवख्या डॉक्टरने आपल्या गळा कापून आयुष्याचा शेवट केला आहे. राहत्या घरात त्यांनी आत्महत्या केली आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर सोलापुरातील वैद्यकीय क्षेत्र पुन्हा एकदा हादरलं आहे. आदित्य नमबियार असे आत्महत्या केलेल्या शिकाऊ डॉक्टरचं नाव आहे. आदित्य याने अलीकडेच एमबीबीएसचं शिक्षण पूर्ण केलं होतं.

पूर्ण झाल्यानंतर अलीकडेच आदित्यनं शिकाऊ डॉक्टर म्हणून आपल्या कार्याला सुरुवात केली होती. तो सोलापूरात भाड्यानं घर घेऊन राहत होता. दरम्यान, त्याने आपल्या राहत्या घरात गळा कापून घेत आत्महत्या केली आहे. एकीकडे सोलापूरात डॉ. शिरीष वळसंगकर यांचं आत्महत्या प्रकरण गाजत असताना आता शिकाऊ डॉक्टरने अशाप्रकारे आयुष्याचा शेवट केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. आदित्य याने आत्महत्या नेमकी कशामुळे केली? याची कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आली नाही. पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# अक्षय्यतृतीया हा सोन्यासह मौल्यवान वस्तू खरेदीचा दिवस

## पंचांगकर्ते मोहन दाते : साडेतीन मुहुर्तापैकी एक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल -**



अक्षय्य तृतीया बुधवार (दि.३०) एप्रिल रोजी आहे. वैशाख शुक्ल तृतीयेला अक्षय्य तृतीया म्हणतात. हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असून या दिवशी नवीन वाहन, वास्तू, सोन्यासह मौल्यवान वस्तू खरेदी तसेच नवीन व्यवहार करण्यास हा दिवस शुभ आहे. या दिवशी पितरांचे श्राद्ध करतात. अक्षय्य तृतीयेस जप, दान, होम केल्याने ते अक्षय्य (म्हणजे कधीही न संपणारे) पुण्यकारक ठरते, अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली.

दरम्यान, वैशाख शुक्ल तृतीयेला कृत युगाचा आरंभ झाल्यामुळे याला युगादि तिथी असे ही म्हणतात. अक्षय्य तृतीयेला मातीचे दोन घट पाण्याने भरून एकात तांदूळ व दुसऱ्यात तीळ घालून त्यांना दोरा गुंडाळावा व ते घट धान्यावर ठेवावेत. ब्रह्मा, विष्णू व शिवस्वरूपात त्यांची पूजा करून दान करावे. त्यामुळे पितर तृप्त होतात आणि मनोरथ पूर्ण होतात असे सांगितले जाते.

या दिवशी पितरांचे श्राद्ध करणे न जमल्यास निदान तिलतर्पण तरी करावे असे आहे. छत्री, चप्पल, पंखा, जलकुंभ (डेरा) इत्यादी उन्हापासून रक्षण करणाऱ्या वस्तूंचे दान करावयाचे असते. स्त्रीयांसाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा असतो. चैत्रात बसवलेल्या गौरीची तिसरी तीज साजरी करावयाची असते. त्या निमित्ताने स्त्रीया हळदीकुंकू करतात. या तिथीस केलेले दान, हवन, आणि पितरांना उद्देशून जे कर्म केले जाते. ते सर्व अक्षय्य म्हणजे अविनाशी आहे. असे श्रीकृष्णांनी युधिष्ठिराला सांगितल्याचा उल्लेख 'मदनरत्न' या ग्रंथात आहे. म्हणून या तिथीला अक्षय्यतृतीया हे नाव प्राप्त झाले आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी हा दिवस सामान्य आणि शुभकामांसाठी चांगला मानला जातो. त्यामुळे या दिवशी नवीन व्यवसाय, उपक्रमांचे उद्घाटन असे उपक्रमही केले जातात.

# बाजार समितीची 'हाय टेन्शन' निवडणूक ठरली 'टेन्शन फ्री'

## निवडणूक निर्णय अधिकारी गायकवाड यांनी प्रक्रिया हाताळली 'कुल'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल -**

राज्यातील विक्रमी आर्थिक उलाढालीसाठी सुप्रसिद्ध असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक चांगलीच आठवणीत राहणारी ठरली आहे. केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या दोन आमदारांमध्ये लढत झाली. त्यामुळे हे इलेक्शन अतिशय हॉट होते. परंतु याच निवडणुकीत सोलापूर जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी निवडणूक निर्णय अधिकारी पद भूषवत सदरची निवडणूक प्रक्रिया अतिशय कुलपणे पार पाडली. त्यामुळे या निवडणुकीत त्यांनीच मार्केट मारल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

दरम्यान, राज्याचे माजी सहकार मंत्री राहिलेले आमदार गुरू सुभाष देशमुख आणि त्यांच्याच विरोधात त्यांचेच शिष्य म्हणून ओळख असलेले आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यात निवडणूक झाली. सोलापूरच्या राजकारणात सुभाष देशमुख आणि सचिन कल्याणशेट्टी हे एकमेकांच्या विरोधात उभे राहतील. असे कोणाला वाटले नव्हते पण या निवडणुकीत जे-जे घडायचे नव्हते ते ते सारे घडले. जे देवेंद्र फडणवीस यांना जमले नाही ते कल्याणशेट्टी यांनी करून दाखवले. दोन आमदार देशमुखांचे मनोमिलन याच निवडणुकीत पाहायला मिळाले. भारतीय जनता पार्टीच्या पॅनलला विरोधातील काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने थेट मदत सुद्धा केली.

दोन्ही सत्तेतील आमदार, दोन्ही वजनदार नेते. त्यामुळे निश्चितच जिल्ह्यातील आमदार, राज्यातील मोठे नेते, मंत्री यांचा दबाव येणे साहजिक होते. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांच्यावर निश्चितच बर्डन होते. "साहेब कागदावरच बोलतात" ही ओळख संपूर्ण राज्यामध्ये निर्माण केलेले गायकवाड यांनी अतिशय स्ट्रिक्ट आणि पद्धतशीरपणे व मैत्रीपूर्ण वातावरणात निवडणूक हाताळली. साधातल्या साध्या कार्यकर्त्याला तसेच नेते मंडळाला देखील त्यांनी आपल्या शब्दातून नाराज केले नाही. तोंडात साखर डोक्यावर बर्फ ठेवून गायकवाड यांनी निवडणूक आनंदमय वातावरणात हाताळली.

### चेअरमन निवड ३० दिवसांच्या कालावधीत करणे बंधनकारक



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे पंचवार्षिक संचालक मंडळ यांची निवडणूक संपन्न झाली. निवडून आलेल्या संचालक मंडळांमधून सभापती व उपसभापती यांची निवड तीस दिवसांच्या कालावधीत करणे बंधनकारक राहणार आहे. सर्व संचालकांच्या एकमताने सदरची निवड ही बिनविरोध झाल्यास, त्याचा अहवाल जिल्हा उपविबंधक कार्यालयाकडे सादर करावा लागणार आहे. मात्र संचालक मंडळांमध्ये एकमत झाले नाही. तर मात्र संचालक मंडळामध्ये पुन्हा एकदा सभापती व उपसभापती यांच्यासाठी निवडणूक घ्यावी लागणार आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे एक महिन्यांचा काळ नूतन संचालकांकडे असणार आहे. या कार्यकाळात पॅनलमधील सर्व संचालकांनी सर्वानुमते निर्णय घेऊन सभापती व उपसभापती यांची निवड केली जाईल. एकमत न झाल्यास अन्यथा संचालक मंडळांच्या निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे.
**-किरण गायकवाड,** निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सोलापूर.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवशी आणि उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या दिवशी बरोबर तीन वाजता डीडीआर कार्यालयाचे गेट बंद केले. एकूणच निवडणुकीचे तयार झालेले वातावरण पाहता, कुठेही बोगस मतदान होऊ नये, यासाठी मतदानाच्या दिवशी सर्व मतदान केंद्रावर सीसीटीव्ही बसवले. दिवसभर त्या सीसीटीव्ही मधून मतदानावर वॉच ठेवला. स्वतः अनेक मतदान केंद्रांना भेटी देत कुठेही गोंधळ होऊ नये, याची काळजी घेतली. शहरातील सर्वाधिक मतदान असलेल्या श्री सिद्धेश्वर मतदान केंद्रावर काही काळ तळ ठोकून होते. येथे हमाल तोलार व व्यापारी मतदारसंघाचे जवळपास दोन हजारहून अधिक मतदान होते.

मतमोजणीसुद्धा शहराच्या बाहेर घेऊन कोणताही गोंधळ होणार नाही. याची दक्षता घेतली. ही निवडणूक नियोजनबद्धरीत्या पार पाडल्याने मतमोजणी दिवशी सुद्धा कोणताही गोंधळ झाला नाही. त्यामुळे जिल्हा उपनिबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड शिस्तीच्या कार्यपद्धतीचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.

# अपात्र उमेदवारासंबंधी याचिका दाखल करणार

## उच्च न्यायालयाचे निर्देश : याचिकाकर्ते मुळे, बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल-**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवार तसेच सोसायटी मतदार संघातील दिलीप माने, सुरेश हसापुरे, इंदुमती अलगोंडा, श्रीशैल नरोळे, तसेच हमाल तोलार मतदार संघातील अपात्र ठरलेले उमेदवार राहुल रमेश बनसोडे यांनी पणन संचालक यांच्याकडे निवडणूक २०१७ मधील नियम २७ (१) खाली अपिल दाखल केले होते. त्यांनी अपिल फेटाळल्यानंतर मिलिंद मुळे व राहुल बनसोडे यांनी मुंबई उच्च न्यायालयात बार असोसिएशनचे अध्यक्ष विजय पंडीत शिंदे यांचे मार्फत उच्च न्यायालयात ॲड. रेखा मुसळे, ॲड. बालाजी शिंदे, ॲड. अशोक ताजणे, यांचे मार्फत पूर्नयाचिका ५५१४/२०२५, ५५१६/२०२५, ५५१७/२०२५, ५५१८/२०२५ असे एकूण १५ याचिका दाखल केलेले होते.

त्याची सुनावणी (दि. २४) एप्रिल रोजी सुनवाणी न्यायमुर्ती अमित बोरकर, यांच्या समोर झाली. दरम्यान, सुनावणीवेळी त्यांनी भारतीय संविधानाचे कलम २२६ अन्वये न्यायालयास मर्यादा असून त्या संदर्भात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचें निकालाचा हवाला देऊन त्यांनी याचिकाकर्त्यांना सर्व मुद्दयावर निवडणुका याचिका दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये प्रतिवादी तर्फे ॲड. सारंग आराध्ये ॲड. शंतनु गुरव, ॲड. अभिजित कुलकर्णी, ॲड. चिन्मय पाटील, ॲड. प्रसाद बडे, सरकार तर्फे ॲड. तांडुरकर, ॲड. एम.एस. श्रीवास्तव, यांनी ॲड. एच डी मुल्ला, यांनी काम पाहिले.

सदरच्या निवडुन आलेल्या उमेदवारा विरुध्द कृषी उत्पन्न बाजार समिती विनिमयन १९६६चे नियम ७२ अ प्रमाणे जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीकडे १० दिवसाच्या आत निवडणूक याचिका दाखल करणार असल्याची माहिती मिलिंद मुळे, राहुल बनसोडे व तसेच सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विजय पंडीत शिंदे यांनी दिली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०२

**भाविकांनी दुर्जनाचें ।**
**मानूं नये कांहीं साचें ।।**

भाव हे मानवी मनांना जोडण्याचे अत्यंत महत्वाचे माध्यम आहे. ज्याच्याकडे एखाद्याबद्दल कसलीच भावना नाही, त्यांच्यात चांगले संबंध प्रस्थापित होणे कठीण असते. भाव असेल तेथे मैत्री, प्रेम, आवड, स्नेह, ओढ, निर्माण होऊ शकते. मानवी मनाला समजून घेण्यासाठी जशी भावनेची गरज आहे, तशीच भगवंताला समजून घेण्यासाठीही भावनेची गरज भासते. जो ईश्वराबद्दल भावना जोपासतो, तो भाविक होय. अशी साध्या सरळ शब्दात भाविकांची व्याख्या केली जाते. भाविकांचा ईश्वर हा सर्व जीवमात्रात भरून उरलेला असतो. पण कांही लोक सर्व जीवमात्रात ईश्वराला दाखविण्याऐवजी केवळ त्यांच्यातच किंवा ते म्हणतील त्याच्यातच ईश्वर असल्याचे लोकांना सांगतात. त्यांच्याकडे ईश्वरी ताकद आहे, असे सांगून दोरे, गंडे, माळा, नाम, वस्तू, त्यांची छायाचित्रे आदी देतात. आपण सांगतो तेच खरे आहे, असे सांगून भाविकांना दिशाहिन करतात. अशा व्यावहारिक व स्वार्थी भोंदू लोकांना दुर्जन समजावे व यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नये हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**भाविकांनी दुर्जनाचे। मानू नये कांही सांचें।।**

उघडपणे वागणाऱ्या दुर्जनांना ओळखणे सोपे असते. पण सांप्रदायाच्या वेषात राहून भोळ्या भाबड्यांना लुटणाऱ्यांना ओळखणे अवघड जाते. अशांना सहजासहजी शिक्षाही देता येत नाही. महादेवाच्या पिंडीवरील विंचवाप्रमाणे यांनी समाजात स्थान ग्रहण केलेले असते. अशा व्यावहारिक लोकांची भोंदूगिरी वाढण्याला आपल्यातीलच कांही लोक कारणीभूत असतात. दु:खात अडकलेल्या जीवाच्या भावनेशी हे लोक खेळतात. दु:खात असलेल्या जीवाला यांचा सहारा वाटतो. नेमका या गोष्टीचा हे लोक गैरफायदा घेतात. माझ्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याने मला व अनेकांना एका भोंदूबद्दल फार पोटतिडकीने सांगीतले होते. साहेब तो फार मोठा महात्मा आहे. तो आपल्यापासून खूप दूर राहात असला तरी दूरध्वनीवरून तो आपणाला कांही न विचारता सर्व कांही सांगतो. आपण कोठे बसलो आहोत? आपल्या बाजूला कोणकोणत्या वस्तू आहेत? आपणाला दु:खाला सामोरे का जावे लागत आहे? आपले भविष्यात काय होईल? वगैरे वगैरे. मला हे सर्व खोटे वाटले. तरीपण यांच्या मनातील ही अंधश्रध्दा दूर व्हावी म्हणून मी त्यांना दूरध्वनी केला. माझ्याकडे जे वास्तव आहे, त्यापैकी त्यांना काहीच सांगता आले नाही. अत्यंत मोघमपणाचे त्यांचे बोल होते. आपण मनाने निर्मळ आहात,आपण लोकांचे भले करू इच्छिता, पण लोक तुमचे भले इच्छित नाहीत. तुम्हाला जवळच्यापासून धोका आहे, थोडे कांही झाले की तुम्ही लगेच ताण घेता वगैरे वगैरे, जे सर्वांना सहज लागू पडते, तेच ते बोलत होते. अर्थात, केवळ भोंदुगिरी होती.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ३० एप्रिल २०२५ | महात्मा बसवेश्वर जयंती, |
| विक्रम संवत् २०८१ | अक्षय्य तृतीया |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. तृतीया (१४.१२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - रोहिणी (१६.१८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शोभन (१२.०१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२४.४४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दाम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**वृषभ :** व्यावहारिक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मनस्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढेल.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार-व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले काम पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नोकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

# पूर्व प्राथमिक शाळांना नोंदणी बंधनकारक

### शिक्षणाधिकारी कादर शेख यांची माहिती

### नोंदणीसाठी सात दिवसांची मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

वय वर्ष ३ ते ६ या वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी बंधनकारक केली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली. तसे त्यांनी सर्व शाळांना कळविले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०नुसार आकृतीबंधातील पहिली ५ वर्षे म्हणजे पूर्व प्राथमिक शाळेची ३ वर्षे व इयत्ता १ ली आणि इयत्ता २ री यांचा समावेश आहे. या ५ वर्षाच्या टप्याला पायाभूतस्तर असे संबोधण्यात आले आहे. केंद्र शासनाने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पायाभूतस्तर तयार केला असून त्यावर आधारित राज्य सरकारने राज्य अभ्यासक्रम पायाभूतस्तर



आराखडा तयार केला आहे. ३ ते ८ वयोगटातील प्रत्येक बालकाला लवकरात लवकर मोफत सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि वैकल्पिकदृष्ट्या सुयोग्य वातावरण मिळवून देणारे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सहज उपलब्ध करुन देणे. वय वर्ष ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाड्या, बालवाड्या, शाळेला जोडून पूर्व प्राथमिक वर्ग व खाजगी पूर्व प्राथमिक वर्ग यामधून शिक्षण दिले जाते. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बालवाड्या व अंगणवाड्या यांची नोंदणी व माहिती महिला व बाल विकास विभाग यांचेकडे उपलब्ध आहे.

तथापि खाजगी पूर्व प्राथमिक वर्गाची अधिकृत माहिती सद्य:स्थितीमध्ये शासनाकडे उपलब्ध नाही. वयोगट शून्य ते ६ साठी पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खाजगी केंद्रांची माहिती एकत्रित स्वरुपात राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर तसेच पालकांनाही उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी वयोगट ३ ते ६ यांना शिक्षण देणारे केंद्र पूर्व प्राथमिक वर्ग अशा कोणत्याही नावाने सुरु असलेल्या, वयोगट ३ ते ६ मधील विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी करण्यासाठी पोर्टल शासनाकडून सुरु करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची सर्वसाधारण माहिती, व्यवस्थापनाची माहिती, विद्यार्थी संख्या, भौतिक सुविधा, कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी माहिती यांची नोंद पोर्टलवर करावयाची आहे.

पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांनी पुढील सात दिवसांच्या आत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात येत आहे. सात दिवसांचे आत सर्व पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांनी नोंदणी पुर्ण करुन घ्यावी,असे आवाहन शिक्षणाधिकारी शेख यांनी केले आहे.



## आस्था संस्थेस राज्यस्तरीय अन्नदाता समाजसेवा पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

आस्था सामाजिक संस्थेस महाराष्ट्र फाऊंडेशनचा राज्यस्तरीय अन्नदाता समाजसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोलापूर महाराष्ट्र फाऊंडेशन सामाजिक व शैक्षणिक संस्था माळीनगर यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र फाउंडेशनचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा हिराचंद नेमचंद वाचनालय लोकमान्य टिळक सभागृहात झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्त पोलीस उपायुक्त दिपक अर्वे, महाराष्ट्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रणजित लोहार यांच्या हस्ते आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी यांनी सन्मानपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी आस्था सामाजिक संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, संचालक योगेश कुंदुर, सिद्धू बेऊर उपस्थित होते. त्यांचे संस्थेचे सचिव शिवानंद सावळगी, चंद्रकांत शहा, सल्लागार हर्षल कोठारी, देविदास चेळेकर, डॉ. महावीर शास्त्री, संचालक अनिल जमगे, संचालक महेश नळे यांनी अभिनंदन केले.



## फूड फेस्टिवल, चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नई जिंदगी परिसरातील शोभादेवी नगर येथे मिशन युवा क्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त फूड फेस्टिवल व चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण अल्पसंख्याक आयोग राज्य सदस्य वसिम बुऱ्हाण, पत्रकार कृती समितीचे संस्थापक मुन्नापठाण, समाजसेवक रज्जाक मुजावर व आसिफ टंगसाल यांचे हस्ते करण्यात आले.

स्पर्धेत नामांकन पटकाविलेल्या स्पर्धकांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे संस्थापक इरफान मैंदर्गी व अध्यक्ष अनवर शेख यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

## कामगार दिनानिमित्त उद्या गुणवंत कामगार पुरस्कार

### १९ कामगारांचा गौरव करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

१ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील व कामगार चळवळीतील अग्रणी नेते साहित्यरत्न कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने विविध क्षेत्रातील १० गुणवंत कामगार पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

क्रांतीवीर लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आल्याचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी सांगितले. मागील १७ वर्षापासून या दिनाचे औचित्य साधून गुणवंत कामगार पुरस्कार संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना संघटनेच्या वतीने दिला जात आहे.

याचे आयोजन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथील साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात होणार आहे. या कार्यक्रमास सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, कॉ. रवींद्र मोकाशी, श्रीकांत बोराडे आदीच्या प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह, फेटा आणि सन्मानपत्र असे राहणार आहे.



## मुक्या प्राण्यांची सेवा महत् कार्य : शरणार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

उन्हाळयाच्या तीव्रतेमुळे वीरशैव व्हिजनतर्फे मुक्या प्राण्यांसाठी पाण्याच्या जबाबदारीसह जलकुंभांचे वाटप करणे हे महत् कार्य आहे, असे प्रतिपादन उद्योगपती संजय शरणार्थी यांनी केले.

मुक्या प्राण्यांसाठी जलकुंभांचे वाटप कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी बिल्डर मल्लिकार्जुन खेड, सराफ व्यापारी संतोष शेटे, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार उपस्थित होते. बसव जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनतर्फे १० जलकुंभांचे पाण्याच्या जबाबदारीसह वाटप करण्यात आले.

अडत व्यापारी संगमेश्वर बिराजदार यांनी हे जलकुंभ उपलब्ध करून दिले. यावेळी अशोक मुलीमनी, दर्बी क्लॉथ सेंटर, श्रीशैल कलशेट्टी, श्री सिद्धेश्वर वुमेन्स वसतिगृह, लोहार दहिटणे यांना देण्यात आले. यावेळी विश्वस्त सोमेश्वर याबाजी, सचिव नागेश बडदाळ, सहकार्याध्यक्ष राजेश नीला, सोमनाथ चौधरी, सिद्धेश्वर कोरे, अशोक मुलीमनी, प्रवीण कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# गौरव मंगल कलश रथयात्रेचे शहरात स्वागत

### राष्ट्रवादीतर्फे महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

मुंबईत ६५व्या महाराष्ट्र दिनानिमित्त १ ते ४ मे दरम्यान गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यातून काढण्यात येणाऱ्या मंगल कलश रथयात्रेचे स्वागत शहरात करण्यात आले.

पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे नातेपुतेतून जिल्ह्यात प्रवेश झाला. शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, जिह्यातील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त यांनी स्वागत केले. त्यानंतर शहरात याचे आगमन झाले. याचे स्वागत शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने ढोल ताशे गजरात दांडपट्टा



तलवारबाजी लाठी-काठी या मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक सादरीकरण करत सामाजिक सलोख्याच्या वातावरणात केले. यावेळी पश्चिम महाराष्ट्र रथ यात्रेचे प्रमुख लतीफ तांबोळी यांचा सत्कार करण्यात आला.

वळसंग विहिरीतील जल तसेच सोलापूरचे शहीद चार हुतात्मे यांच्या बलिदानातून पावन झालेल्या भुमितील माती कलश भरून आणले होते. त्यांची पुजा करण्यात आली. ते सर्व जल कलश आणि पावन माती कलश महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथामधील मोठ्या दोन कलशात समर्पित केले.

याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, श्रीनिवास कोंडी, अनिल उकरंडे, हेमंत चौधरी, महेश निकंबे, चंद्रकांत दायमा, आनंद मुस्तारे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर, महिला कार्याध्यक्ष चित्रा कदम, प्रदेश सचिव इरफान शेख, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का उपस्थित होते.

## संघर्ष सेनेच्या मोहोळ शहर अध्यक्षपदी लहू ठोकळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**



संघर्ष सेनेच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये संघर्ष सेनेच्या मोहोळ शहर अध्यक्षपदी लहू ठोकळे यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक शेखर बंगाळे होते. यावेळी मनोज तम्मेवार, चंद्रशेखर पाटील, संदीप कांबळे, गौरव पवार, राहुल सावंत, रणजित मळगे, लक्ष्मीकांत शिवणगी, निखिल घोडके, विलास पाटील उपस्थित होते.

## आदर्श अर्थकारणातून सर्वांगीण समाजोन्नतीचा जनता सहकारी बँकेचा निरंतर ध्यास

**उत्तुंग राष्ट्रीय विचार, समाजातील तळागाळातील आणि सर्व सामान्यांच्या आर्थिक उन्नतीची प्रामाणिक तळमळ अन् बँक व्यवसायाकडे सेवाभावाने पाहण्याचा चालत आलेला समृद्ध वारसा यांचा तिहेरी संगम म्हणून सोलापूर जनता सहकारी बँकेकडे पाहिले पाहिजे. आज सोलापूर जनता सहकारी बँक तब्बल ६० व्या वर्षात पदार्पण करीत असताना वरील तीन मूल्यांचा निरंतर ध्यास घेऊन आजही बँकेची वाटचाल पूर्वासुरींनी घालून दिलेल्या त्याच पथावर सुरू आहे याचे विशेष समाधान आहे.**

पूर्वीच्या आशा टॉकीज समोरील परदेशी फोटो दुकाना शेजारी एका भाड्याने घेण्यात आलेल्या खोलीत अवघे ५ हजार रुपये भाग भांडवल आणि समाजातून देणगी स्वरूपात मिळालेली खुर्ची, टेबल इतक्या तुटपुंज्या संसाधनांवर सुरू झालेली सोलापूर जनता सहकारी बँक आज सोलापूरसह पुणे, मुंबई, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, नाशिक, बीड, कोल्हापूर, विजयपूर अशा तब्बल १० जिल्ह्यांमध्ये ४१ शाखांच्या माध्यमातून प्रचंड मोठी आर्थिक घोडदौड करीत आहे. याचे नि:संशय श्रेय सहकारातून समृद्धीची दिशा दाखवणारे बँकेचे संस्थापक संचालक मंडळ, आजवरचे सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बँकेचे ग्राहक, ठेवीदार आणि भागधारकांना जाते. समाजातील सर्व घटकरुपी मोत्यांना समृद्ध अर्थकारणाच्या हारात गुंफता यावे याकरिता स्वयंसेवकांनी एकत्र येऊन बँक सुरू करावी, अशी कल्पना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक सुरेशराव केतकर यांनी मांडली. मग काय, सब समाज को लिये साथमे आगे है बढते जाना या गीतपंक्तीला आदर्श म्हणूनच जीवन व्यतीत करणाऱ्या स्व. धुंडीराजशास्त्री दाते, स्व. गोवर्धनदास भुतडा, स्व. भैय्यासाहेब तथा डॉ. प. गो. वळसंगकर, स्व. बाबुराव बसवंती, स्व. दगडोबा भागवत, दत्तात्रय अभ्यंकर अशा सोलापुरातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ समाजहितैशी मान्यवरांनी एकत्र येत १९६६ साली अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर सोलापूर जनता सहकारी बँकेची स्थापना केली. लक्ष्मी आणि सरस्वतीचा निवास प्रत्येकाच्या घरात आणि मनात अक्षय रहावा अशी मनीषा ऊराशी बाळगून सुरू झालेल्या सोलापूर जनता सहकारी बँकेने पुन्हा मागे वळून कधी पाहिलेच नाही.

सोलापूर जनता सहकारी बँक लि.
SJSB
Multi-State Scheduled Co-op. Bank

१९६६ साली सोलापुरात सहकारी क्षेत्रात अवघ्या ३ बँका होत्या. समाजाचा सहकारावरती फारसा विश्वास नसणारा तो काळ होता. त्यामुळे समाजाची आर्थिक घडी नीट बसविण्यात योगदान देणे, समाजातून चांगले व्यापारी, उद्योजक घडणे आणि सहकाराची मूल्ये समाजात रुजवणे अशा तीन आघाड्यांवर काम करण्याची जबाबदारी साहजिकच संस्थापक संचालकांवर होती. ध्येय मंदिर के पथिक को कंटकोंकाही सहारा, संकटोंपर मात कर यह राष्ट्र विजयी हो हमारा ही जाणीव मनात ठेवत संस्थापकांपासून आजवरच्या सर्व संचालकांनी एक एक ग्राहक, ठेवीदार जोडत बँकेच्या पर्यायाने समाजाच्या आर्थिक समृद्धीचा प्रवास सुकर केला आहे. या हिरक महोत्सवी प्रवासात मोलाचे योगदान देणाऱ्या आजवरच्या सर्व सलग तीन पिढ्यापासूनही असलेले ग्राहक, ठेवीदार, बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी वर्गा विषयीची कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

अवघ्या ५ हजार रुपयांवर सुरू झालेल्या बँकेचे भाग भांडवल उद्घाटना दिवशी अक्षय तृतीया २४ एप्रिल १९६६ रोजी ४९ हजार रुपये झाले. १० वर्षात ते वाढून ८ लाख ७ हजार ४५० रुपये तर स्थापनेपासून २५ व्या वर्षात ते ८४ लाख ४१ हजार ६०० रुपये झाले. बँकेच्या २०१५ झालेल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात बँकेचे एकूण भाग भांडवल ४७ कोटी ७१ लाख रुपये होते. यंदा २०२५ साली हीरक महोत्सवाचा प्रारंभ करताना सोलापूर जनता सहकारी बँकेचे एकूण भाग भांडवल ७२ कोटी १२ लाख रुपये आहे. आणि मिश्र व्यवसाय २९७८ कोटी रुपये आहे हे सांगताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. 'बँकिंग हा आमचा व्यवसाय सेवा ही आमची संस्कृती' असे म्हणणाऱ्या सोलापूर जनता सहकारी बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाने गणेशोत्सवानिमित्त बौद्धिक व्याख्यानमालेची मेजवानी गेल्या ४८ वर्षांपासून अखंडपणे चालवली आहे. या व्याख्यानमालेत व्याख्यान दिलेल्या माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, इंद्रेश कुमारजी, ग्राहक चळवळीचे प्रणेते बिंदूमाधव जोशी, साहित्यिक पू. भा. भावे, प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रमोद महाजन, मार्क टूली, जगदीश खेबुडकर, गोपीनाथ मुंडे, अशोक मोडक, माजी संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस, सुरेश प्रभू, अजित डोवाल, राम माधव, नितीन गडकरी, उज्वल निकम, माजी संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर, विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशा प्रतिभावान वक्त्यांची मांदियाळी पाहता या बौद्धिक व्याख्यानमालेचा उत्तुंग दर्जा स्पष्ट होतो. बँकिंग व्यवसाय करताना समाजसेवेचाही वारसा बँकेने जपला आहे. भूकंप, कारगिल युद्ध, त्सुनामी अशा संकटांप्रसंगी बँकेने एकावर्षीचा लाभांश देत आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. याशिवाय रक्तदान शिबिरे, आरोग्य निदान शिबिरे, ग्रंथालय अशा माध्यमातून समाजोपयोगी कार्याचा खारीचा वाटाही उचलला आहे.

सोलापूर जनता सहकारी बँकेची ग्राहकाभिमुख सेवा, शाखांचा विस्तार, व्यवसायासह नफ्यात वाढ, प्रगत तंत्रज्ञानाची कास, कमीत कमी थकबाकीसाठी जास्तीत जास्त प्रयत्न, तंत्रकुशल मनुष्यबळ आणि काळानुरूप विकसित होण्याची सातत्यता यामुळे बँक आर्थिक प्रगती करत आहे. बँकेने २००२ साली शेड्युल दर्जा मिळवला. तसेच २०१४ साली मल्टिस्टेट दर्जा प्राप्त केला. ग्राहक, सभासद, ठेवीदारांच्या विश्वास आणि पाठिंब्याच्या जोरावर २००७ साली सोलापूर जनता सहकारी बँकेने १००० कोटी रुपयांच्या व्यवसायाचा टप्पा ओलांडला. तर २०१२ साली २००० कोटी रुपयांच्या व्यवसायाचे उद्दिष्ट पूर्ण झाले. अवघ्या काही वर्षातच यात आणखी वाढ होऊन बँकेने यंदा २९७८ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. कोरोनानंतर बँकिंग क्षेत्रासमोर असलेल्या प्रचंड मोठ्या संकटाशी झुंज देऊन सोलापूर जनता बँकेने ४ वर्षांमध्ये मिळवलेला १०० कोटी रुपयांचा निव्वळ नफा ही समाजाच्या बँकेवर आजवर असलेल्या विश्वासाची पावती तर आहेच, त्याचबरोबर ७५ व्या वर्षाकडे वाटचाल करताना बँकेला मिळालेली कौतुकाची थाप आणि आणखी उत्तुंग यश मिळवण्याच्या जबाबदारीची जाणीव देखील आहे. सोलापूर जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या प्रारंभानिमित्त सर्व ग्राहक, ठेवीदार, अधिकारी, कर्मचारी आणि हितचिंतकांना लक्ष लक्ष शुभेच्छा !



**- सुनील पेंडसे,** अध्यक्ष,
सोलापूर जनता सहकारी बँक

## महत्वाचे...



### मंगल कलश रथयात्रा सोहळ्याचे पंढरपुरात स्वागत

**पंढरपूर, दि. २९ एप्रिल-**

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजितपवार गट) वतीने गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवा निमित्त काढण्यात आलेली मंगलकलश रथयात्रा सोमवारी पंढरपुरात दाखल झाली. या रथयात्रेचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह समस्त पंढरपूरकर नागरिकांनी देखील मोठ्या उत्साहात स्वागत केले. महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड किल्ले व पवित्र नद्यांचे जल घेऊन ही रथयात्रा निघालेली आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना आणि महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास तरुणपिढीला या यात्रेच्या निमित्ताने माहिती होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही रथयात्रा सुरू असून पंढरपूर येथे महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे सेक्रेटरी लतीफ भाई तांबोळी, सांगलीचे माजी महापौर दिग्विजय सूर्यवंशी, राष्ट्रवादीचे प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे, महिला जिल्हाध्यक्ष वर्षा शिंदे, तालुकाध्यक्ष अनिल नागटिळक, शहराध्यक्ष दिगंबर सुडके, राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र युवक सरचिटणीस श्रीकांत शिंदे, युवक शहराध्यक्ष अमोल परबतराव, समाधान काळे यांच्यासह राष्ट्रवादीचे असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### घरकुल योजनेतील वंचितासाठी ग्रामपंचायत स्तरावर सर्व्हे

**पिलीव, दि. २९ एप्रिल-**

केंद्रातील भाजपा प्रणीत सरकार व महाराष्ट्रातील महायुती सरकारने महाराष्ट्रातील सर्व सामान्य नागरिकांना पक्के घर देण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला आहे. यानुसार महाराष्ट्राला पहील्या टप्प्यात वीस लाख घरे मंजूर केली आहेत. याची कामे सुरु आहेत. तर यातुन वंचीत असणाऱ्या कुटुंबांना पक्के घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार महाराष्ट्राला पुन्हा दहा लाख घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर सर्व्हे करुन घरकुल देणयात येणार आहे. यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडुन देऊन वंचित लाभार्थी यांना घरकुल देण्यात येणार आहे. तरी यासाठी वंचित लाभार्थी यांनी यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. शासनाने वाढत्या महागाईचा विचार करता घरकुलासाठी पन्नास हजार रुपयाची वाढ केली आहे. तसेच प्रत्येक घरावर सौर ऊर्जा सिस्टम बसविण्यात येणार आहे.


### सहा.पोलीस फौजदार सुभाष शेंडगे यांना महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर

**करकंब, दि.२९ एप्रिल-**

सध्या करकंब पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस फौजदार सुभाष शंकर शेंडगे यांनी पोलीस दलात आत्तापर्यंत केलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल १ मे महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र जाहीर झाले आहे. महाराष्ट्र दिनादिवशी पोलिस दलाच्या समारंभात श्री. शेंडगे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. श्री. शेंडगे हे दिनांक १० सप्टेंबर १९९४ रोजी पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर येथे पोलीस शिपाई या पदावर भरती झाले. दि.०३ जून १९९९ रोजी सोलापूर ग्रामीण पोलीस दलात रुजू झाले. सध्या ते करकंब पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत आहेत. श्री. शेंडगे यांनी अज्ञात आरोपीस माहिती काढून कुसेश्वर (जि.मुज्जफपुर, बिहार) येथून अटक करण्यात मोलाची कामगिरी बजावली. वैराग प्रकरणातील गुन्ह्यात १८ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली. टेंभुर्णी गुन्हयातील पाच वर्षापासून फरार आरोपींना अटक करण्यात यश मिळवले. मोहोळ गुन्हयातील १३ आरोपींनी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष, मनोहर डोंगरे यांचेवर खुनी हल्ला केला होता.सदर आरोपी फरार होते यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला होता सदर गुन्हयांतील आरोपीची माहिती काढुन त्यांना पुणे जिल्हयातुन पकडण्यात मोलाची कामगीरी बजावली.

### हर्षल बागल यांना संभाजी महाराज युवारत्न पुरस्कार जाहीर

**कुर्डुवाडी, दि.२९ एप्रिल-**



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा २०२५ चा छत्रपती संभाजी महाराज युवा रत्न पुरस्कार शिवव्याख्याते पत्रकार हर्षल बागल भोसरेकर यांना जाहीर झाला आहे. अ.भा. मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी लेखी पत्र देत या पुरस्काराची घोषणा केली. कऱ्हाड येथे ९ व १० मे रोजी होणाऱ्या ३१ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन यामध्ये हर्षल बागल यांना सदर पुरस्कार माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष तथा जेष्ठ विचारवंत साहित्यिक अभ्यासक प्रविण गायकवाड यांच्या हस्ते पुरस्कार प्रधान करण्यात येणार आहे. या संमेलनला देशभरातील अनेक नामवंत कवी, साहित्यिक, वक्ते देखील उपस्थित राहणार आहेत. हर्षल बागल यांना छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावे युवारत्न पुरस्कार जाहीर झाल्याने भोसरे कुर्डुवाडी पंचक्रोशी मधून अनेक साहित्यिक, विविध संस्थाचे पदाधिकारी यांनी बागल यांचे अभिनंदन केले.

### बठाण-उचेठाण वाळू उपशाला विरोध; १ मे पासून आंदोलनाचा इशारा

**मंगळवेढा, दि.२९ एप्रिल-**

बठाण व उचेठाण येथील नदीपात्रातून होत असलेल्या वाळू उपशाबाबत तक्रारी करुनही दुर्लक्ष केले जात आहे. येथील वाळू उपशामुळे पाणी गढूळ होवून तेच अशुध्द पाणी नागरिकांना प्यावे लागत असल्याने भविष्यात अरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. जीवाचे बरे वाईट झाल्यास याला जबाबदार कोण ? अशी लेखी तक्रार मंगळवेढा साठेनगर येथील नागरिक प्रकाश खंदारे यांनी राज्यपाल सी पी. राधाकृष्णन यांच्याकडे केली आहे. येथील वाळू उपशाचा ठेका रद्द करावा अन्यथा दि. १ मे रोजी प्रांत कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री, सोलापूर जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय प्रांत अधिकारी आदींना देण्यात आली आहे.

# मेडशिंगीत राबवला जातोय 'पंचशतावरी जलसंवर्धन' उपक्रम

## ग्रामस्थ व माणगंगा संस्थेचा अभिनव प्रयोग

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २९ एप्रिल-**

सांगोला येथील माणगंगा भ्रमणसेवा बहुद्देशीय संस्थेच्या माध्यमातून व मेडशिंगी ग्रामस्थांच्या सहकार्याने तसेच काही संस्था व व्यक्ती यांच्या मार्गदर्शनातून जलसंवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून पाणी संवर्धनासाठी एक अभिनव पंचशतावरी जलसंवर्धन उपक्रम राबवण्यात आला असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे यांनी दिली. या अभियानाचा शुभारंभ वैजिनाथ घोंगडे, मेडशिंगी येथील प्रतापसिंह इंगोले, जालिंदर माने, बसवेश्वर झाडबुके, डॉ. मच्छिंद्र सोनलकर, राजाभाऊ वाघमारे, प्रा.एस.के.पाटील, गणेश पाटील, तानाजी आळतेकर, दत्तात्रय इंगोले, मिलिंद वेदपाठक, प्रशांत पाटील, प्रभाकर कसबे, दगडू कांबळे, प्रभाकर कांबळे, गुंडोपंत साळुंखे, ज्ञानेश्वर तंडे यांच्यासह सत्यसाई ट्रस्टचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मशीनचे पूजन करून श्रीफळ वाढवून करण्यात आला.

या उपक्रमास तालुका कृषि अधिकारी दीपाली जाधव यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच या कामासाठी पंढरपूरचे डॉ. भिंगे व शैलेश साळुंखे यांनी १० हजारांचे अर्थसहाय्य केले आहे, अशी माहिती वैजिनाथ घोंगडे यांनी दिली.

> मेडशिंगी येथील नदीवर पूर्वाश्रमीचे सिमेंट बंधाऱ्यात ६.५ इंच व्यासाचे १०० फुटाचे ५ बोअरिंग घेऊन त्याच्याभोवती पुनर्भरण योजना राबवून बोअरिंगवर २० फूट उंचीच्या छिद्र पाडलेल्या क्रिसिन पाईप लावून त्या पाईपच्या वरील बाजूस जाळी लावण्यात येणार आहे. सिमेंट बंधाऱ्याच्या भिंतीशी समांतर अंतरावर ७० मीटरवर एका ओळीत पहिले तीन बोअर घेतले. त्याच्याच पुढे ५० फुटावर पहिल्या तीन बोअरच्या क्रॉस वर २ बोअर घेतले आहेत. या उपक्रमास 'पंचशतावरी जलसंवर्धन' असे नामकरण करण्यात आले असून सदर अभियानाचे फलित पुढील वर्षी लक्षात येईल.
>
> **- वैजिनाथ घोंगडे,** अध्यक्ष, माणगंगा भ्रमणसेवा संस्था



# 'तो' शिक्षक अद्यापही मोकाटच

## गुन्हा दाखल करण्यास पोलिसांची टाळाटाळ, विविध संघटनांतर्फे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२९ एप्रिल-**

ग्रामीण भागातील एका अल्पवयीन मुलीला अश्लिल मेसेस पाठविल्याप्रकरणात बोराळे येथील एका शिक्षकाचे नाव गुन्हा दाखल करताना पोलिसांनी वगळल्याप्रकरणी याचा निषेध म्हणून सोमवारी मंगळवेढा पोलिस ठाण्यासमोर महर्षि वाल्मिकी संघ, मनसे पक्ष, वंचित बहूजन आघाडी आदीं पक्षांच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

एक अल्पवयीन मुलगी बोराळे येथे माध्यमिक शिक्षण घेत असताना तेथील एका शिक्षकाने तीच्या मोबाईलवर अश्लिल मेसेस पाठविले. याबाबत तिच्या वडीलांनी फिर्यादी जबाबात त्या शिक्षकाचे नावही घातले होते. मात्र बोराळे बीटच्या पोलिस अधिकाऱ्यांनी मनमानी पध्दतीने व हातमिळवणी करून त्या शिक्षकाचे नाव वगळल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांचा होता. सदर शिक्षकाला तत्काळ अटक करावी अशी आंदोलकांची मागणी होती. पोस्को कायद्यांतर्गत मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल असून अन्य बोराळेच्या चार आरोपींच्या नावाचा त्या गुन्हयात समावेश आहे. गुन्हा दाखल करताना सदर शिक्षकाचे नाव वगळल्यामुळे महर्षि वाल्मिकी संघ आक्रमक झाला असून पोलिस स्टेशनचे उंबरठे झिजवूनही त्यांना आजतागायत न्याय मिळत नसल्याने अखेर सोमवारी आंदोलनाचे हत्यार उपसले. सदर शिक्षकाने मुलीच्या वडिलांचा अज्ञानपणाचा फायदा घेत मोबाईल ताब्यामध्ये घेवून त्यातील सर्व मेसेस डिलीट केल्याचे मुलीच्या वडीलांनी दिलेल्या जबाबात म्हटले आहे. दरम्यान शिक्षकाचे नाव पोस्को गुन्हयातून वगळणाऱ्या त्या पोलिस अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणीही आंदोलनकर्त्यांची आहे. दि.२८ रोजी झालेल्या आंदोलनात मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे, वंचित बहुजन आघाडीचे राजाभाऊ शिंदे, दुर्गाताई माने, बबलू बोराळकर, राहुल पांढरे, माऊली कोळी, अजय गाडे, दादा करकंबकर, खानापुरे, अदटराव आदीं या आंदोलनात सहभागी झाले होते. दरम्यान, सदर आरोपीस अटक न झाल्यास राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा समस्त आदीवासी कोळी बांधवांनी दिला आहे.



# पुण्यतिथी उत्सवात दिला चोख बंदोबस्त

**पोलिस निरक्षक राजेद्र टाकणे यांचे सुयोग्य नियोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २९ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवात पोलीस यंत्रणेच्या सुयोग्य नियोजनामुळे यात्राकाळात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. यात्रा सुरळीत पार पडल्याने पोलिस यंत्रणेचे कौतुक होत आहे.



अक्कलकोट येथे भाविकांची संख्या दिवसोदिवस वाढत आहे. स्वामी पुण्यतिथी उत्सव हाजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाले. पोलीस निरिक्षक राजेद्र टाकणे यांनी विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपलब्ध अत्यल्प पोलीस कर्मचारी यांच्या सहकार्याने पुण्यतिथी उत्सवात चोख बंदोबस्त ठेवत सुयोग्य हताळणी केली. यामुळे पुरण्यातिथी उत्सव पालखी मिरवणुक चोख बंदोबस्त असल्याने निर्विघ्नपणे पार पडली. भाविकांची दर्शन बारी हाताळणी सुयोग्य रितीने पार पाडली. भाविकाना पोलीसाकडून चांगले सहकार्य लाभल्याने पोलीसाच्या कार्याचे कौतुक होत आहे. यापूर्वी येथे गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी स्वामींचा प्रकटदिन उत्सव पार पडला. डिजीटल यंत्राद्वारा १ लाख ७० हजार पर्यत भाविकांची संख्या गणली गेली. यामुळे यंदा पुण्यतिथी उत्सवाच्या नियोजनाकरिता आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणद्वारा नियोजनाबाबत १८ पेक्षा अधिक विभागाचे विभाग प्रमुख व विविध मंदिराचे व्यवस्थापक यांची बैठक घेऊन नियोजन करण्यात आले. पोलीस निरिक्षक टाकणे यांनी उपलब्ध पोलीसाद्वारे यात्रेचे सुयोग्य नियोजन केले.

# खंडित वीज पुरवठ्यामुळे द्राक्ष बागायतदारांतून नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब,दि.२९ एप्रिल-**



पंढरपूर तालुक्यातील करकंब, जाधववाडी, बार्डी व इतर गावांमध्ये द्राक्षांचे मोठ्या प्रमाणात क्षेत्र आहे. सध्या द्राक्षबागांची छाटणी सुरू असून बाग फुटण्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे. उजनीचे पाणी कॅनॉलने सुरू आहे. उन्हाची तीव्रता वाढत असताना अनेकदा विजेचा घोटाळा होत असल्याने जाधववाडी, करकंब व या परिसरातील शेतकरी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

सुधाकर शेळके व इतर शेतकऱ्यांनी महावितरणबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. द्राक्षांचे माहेरघर म्हणून जाधववाडीला ओळखले जाते. या परिसरातील प्रत्येक शेतकऱ्यांकडे द्राक्ष बागा आहेत.

जाधववाडी गावात सुमारे पाचशे एकरहून अधिक द्राक्षबाग क्षेत्र आहे. या महिन्यात वीज नेहमी खंडित होवून डीपीचा घोटाळा होत आहे.वीज पुरवठा सुरळीत होऊन शेतकरीवर्गास दिलासा मिळावा अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे. महावितरण व महाराष्ट्र शासनातर्फे अखंड वीजपुरवठा करण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे. ग्रामीण भागात मात्र विजेचा लपंडाव कायम सुरू आहे. आम सभेत विजेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात गाजला. मात्र विजेची सेवा ढिसाळ असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वीज पुरवठा अखंडपणे व सुरळीत चालू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संबंधित शेतकऱ्यांकडून देण्यात आला आहे.

# किणीच्या यात्रेची रथोत्सवासह कुस्ती स्पर्धेने सांगता

## मल्लिकार्जुन मंदिरात रूद्राभिषेक व महाआरती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

किणी (ता.अक्कलकोट) येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुनाच्या यात्रेची नंदीध्वज मिरवणूक, शोभेचे दारूकाम, रथात्सवासह कुस्ती स्पर्धेने उत्साहात सांगता झाली.

येथे दररोज रात्री ८ ते १० या वेळेत हेमरेड्डी मल्लम्मा महात्म्य महापुराण पुराणीक १०८ राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी काशी मठ, हुबळी यांच्या अमृत वाणीने पुराण कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात व आनंदात पार पडला. हेमरेड्डी मलम्मा देवीच्या लग्नसमरंभात यात्रा कमिटीच्या वतीने गावातील एका गरीब जोडप्याचे लग्न मोफत करून देण्यात आले.

यात्राकाळात 'श्री' स रुद्राभिषेक व महाआरती करण्यात आली. रथास कळसारोहण करण्यांत आले. मानाच्या नंदीध्वजाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भव्य व दिव्य, नयनरम्य शोभेचे दारूकाम करण्यात आले. यावेळी मंदिर व रथास फुलांची सजावट श्री. अमोल नागरसे यांच्यातर्फे करण्यात आली होती. हाडमारकी हाडगारकी (डफा वरील गाणी) श्री हरदेशी गीगी मेळ संघ कलबुर्गी व नागेशी पद्य मेळ संघ मंद्रप यांनी सादर केले. भव्य कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. विशेष म्हणजे या स्पर्धेत महिला पहिलवानांनी देखील सहभाग नोंदवत विजय संपादन केला. यात्रा कमिटीच्या वतीने खास महिलांकरीता होम मिनिस्टर नितीन गवळी भाऊजी प्रस्तुत खेळ पैठणींचा हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात किणी व आजुबाजुच्या परिसरातील बहुसंख्य महिलांनी सहभाग नोंदिवला.



सदर कार्यक्रमाचे उदघाटन भाजपा युवा नेते सागर कल्याणशेट्टी व सुलतानपुरचे सरपंच मल्लिकार्जुन स्वामी तसेच दर्शनहळ्ळीचे महेश बिराजदार व तसेच किणीचे उपसरपंच अमोल हिप्परगी व सरपंच विनायक जाधव व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पैठणीच्या खेळामध्ये प्रथम क्रमांक द्वितीय क्रमांक, व तृतीय क्रमांक यांना पैठणी साडी व इतर आकर्षक बक्षिसे देण्यात आले. यात्राकाळात कमिटीच्या वतीने महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. यात्रा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अविनाश पाटील, दत्तात्रय बिराजदार, भिमाशंकर तुळजापुरे, वैजनाथ अल्लिमोरे, बसवराज निंबाणे, सोमनाथ साखरे, विजयकुमार खुणे, सुरेश कलशेट्टी, राजकुमार टाके, दयानंद घीवारे, रजनीकांत गुडर, पोलीस पाटील विजयकुमार घीवारे, कुमार सुतार, धानप्पा, अल्लीमोरे, राहुल बिराजदार व अनेक युवकांनी परिश्रम घेतले.

# कुर्डुवाडी फन गेमचा तपास आता आर्थिक गुन्हे शाखेकडे

**तभा वृत्तसेवा**
**कुर्डुवाडी, दि.२९ एप्रिल-**

फन (चक्री) ऑनलाईन गेममध्ये लऊळ (ता.माढा) येथील पीडित शेतकरी बालाजी विष्णू खारे यांची मोठी आर्थिक फसवणूक झाली असून या फन (चक्री) गेम मध्ये फसवणूक झालेल्या रकमेची व्याप्ती मोठी आहे. कुर्डुवाडी पोलिसांत हा गुन्हा दाखल असून त्याच्या तपासाला गती मिळत नसल्याकारणाने सोलापुर पोलिस अधिक्षक यांनी सदर तपास कुर्डुवाडी पोलिस ठाण्याचे सपोनि सचिन शिंदे यांच्याकडून काढून घेत आर्थिक गुन्हे शाखा सोलापुर ग्रामीण यांच्याकडे वर्ग केला आहे.

कुर्डुवाडी, लऊळसह परिसरात सुरु असलेल्या फन (चक्री) गेम मध्ये या भागातील अनेक तरुणांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणुक झाली आहे. कुर्डुवाडी पोलिसांत नितीन महादु पाटमस, रणजित महादेव सुतार, वैभव बाबू सुतार (सर्व रा. कुर्डुवाडी) व इतर यांनी मागील दोन वर्षापासुन कट कारस्थान रचुन मोबाईल मधील फन (चक्री) गेममध्ये जास्त रक्कम गुंतविल्यास आम्ही तुम्हाला जास्त पॉईंट्स देऊ व त्यातुन तुम्हाला जास्त नफा मिळेल असे आश्वासन दिले होते. आरोपीतांच्या अमिषाला बळी पडुन जास्त नफा होईल या हेतूने फिर्यादी बालाजी विष्णु खारे (रा. लऊळ ता. माढा) यांनी आरोपीतांच्या वेगवेगळया बँक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने व रोखीने दिलेल्या रक्कमा घेवुन फिर्यादीची ७८ लाख ६०० रु. चा अपहार करुन फसवणुक केलेली आहे. याबाबत गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास कुर्डुवाडी पोलिस ठाण्याचे सपोनि सचिन शिंदे यांच्याकडून आर्थिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणकडे वर्ग करण्यात आला आहे.

> **ज्या लोकांनी गुन्हयातील आरोपी व इतरांच्या अमिषाला बळी पडुन त्यांचेकडे फन (चक्री) गेममध्ये रक्कमा गुंतविलेल्या आहेत अशा लोकांनी त्यासंदर्भात असलेल्या कागदोपत्री पुराव्यासह आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण येथे संपर्क साधावा असे आवाहन पोलिस निरीक्षक संजय जगताप यांनी केले आहे.**



# पाच वर्षांत मंगळवेढ्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवू

## खा. प्रणिती शिंदे यांचा मंगळवेढा तालुक्यातील खोमनाळ, भाळवणी गावभेट दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल**

मंगळवेढा तालुक्यात शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न गंभीर असून तो प्रश्न शासनदरबारी मांडला आहे त्याचप्रमाणे सामाजिक संस्थेच्या सहकार्याने काम ही सुरू केले आहे. या पाच वर्षात मंगळवेढा तालुक्याचा पाण्याच्या प्रश्न संपविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मंगळवेढा तालुक्यातील खोमनाळ, आणि भाळवणी गावाला भेट देऊन येथील ग्रामस्थांची संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

ग्रामस्थांच्या विविध समस्या व अडचणी लवकरच सोडविणार असल्याचे आश्वासन शिंदे यांनी दिले. त्याचप्रमाणे काही गावांमध्ये गायरान जमिनीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे घरकुलांना अडचण येते तोही प्रश्न जिल्हाधिकारी यांच्याशी बोलून शासन स्तरावर पाठपुरावा करून गावकऱ्यांना घरकुलासाठी जागा मिळावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

यावेळी मंगळवेढा काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, युवक अध्यक्ष रविकिरण कोळेकर, शहराध्यक्ष राहुल घुले, खोमनाळचे सरपंच सौ मदने, उपसरपंच डॉक्टर देशमुख, राजाभाऊ इंगवले, कांबळे काका, भाळवणीचे सरपंच श्री लक्ष्मण गायकवाड, नामदेव चौगुले, हुकूम मुलानी, नाताजी आयवळे, इसाक शेख, फिरोज मुलानी, अवघडे, उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पंढरपुरात डायग्नोस्टिक व्हॅनद्वारे कर्करोग तपासणी

### उपजिल्हा रुग्णालयात नागरिकांनी लाभ घ्यावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ एप्रिल-**

कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेता कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनव्दारे तपासणी करण्यात येणार आहे. याकरीता जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही व्हॅन दि. ३० एप्रिल रोजी बुधवारी उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे येणार आहे. तरी या सेवेचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेशकुमार सुडके यांनी केले.



असंसर्गजन्य व्याधींमध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेता दि. ४ फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनचे उदघाटन केले आहे. या व्हॅनमध्ये प्रामुख्याने मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग या तीन प्रकारच्या कर्करोगांची तपासणी केली जाणार आहे. दि. २१ एप्रिल ते २० मे या कालावधीमध्ये कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन सोलापूर जिल्ह्यामध्ये दौरा करणार आहे. ही व्हॅन कर्करोगाची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांनी सुसज्ज आहे.

## महत्वाचे...



### बार्शीत १५० रूग्णांची नेत्रतपासणी

**बार्शी, दि.२९ एप्रिल-**

बार्शी येथे श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय तसेच अहिल्यानगरच्या आनंदऋषीजी नेत्रालयातर्फे घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबीरात १५० रूग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी नेत्र तपासणीसह अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर गेण्यात आले. शिबिरात १५० रुग्णांची नेत्र तपासणी केली. १३ रुग्णांना शस्त्रक्रीयेसाठी अ.नगरला दि. २८ एप्रिल रोजी सकाळी रुग्णवाहिकोतून रवाना करण्यात आले. हे शिबीर दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सकाळी वाचनालयातर्फे घेण्यात येत आहे व रुग्णांना अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रीया व चष्म्याचे वाटप करण्यात येते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव व क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.



### गोवा क्रिकेट संघाचे माजी अध्यक्ष चेतन देसाई यांचा अन्नछत्र मंडळात सत्कार

**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीने गोवा क्रिकेट असोसिएशनचे माजी अध्यक्ष व श्री मल्लिकार्जुन महाविद्यालय गोवाचे अध्यक्ष चेतन देसाई यांचा न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. देसाई यांनी अन्नछत्र मंडळ संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली उत्तम सेवा कार्य करत असल्याचे मनोगत व्यक्त केले. यावेळी शंभा देसाई, प्रयाण ढामस्कर, प्रयेश फडते, वीरेश देसाई, प्रेमानंद भगत, न्यासाचे सचिव शामराव मोरे, बाळासाहेब कुलकर्णी-देसाई-बबलादकर, सरफराज शेख, मैनुद्दीन कोरबू, बालाजी कटारे, गोटू माने, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, अनिल गवळी, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण उपस्थित होते.

### राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या माढा शहराध्यक्षपदी अर्चना राऊत

**माढा,दि.२९ एप्रिल-**



राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या माढा शहराध्यक्षपदी अर्चना राऊत यांची नुकतीच निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. खासदार सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या उपस्थितीत पुणे येथील नवले लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमात सोलापूर जिल्हाध्यक्षा वर्षाराणी शिंदे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. याप्रसंगी माढ्याच्या नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, नगरसेविका सुनीता राऊत, गीतांजली देशमुख, अमृता ननवरे, रुपाली चेंडके, तुलसी तांदळे, मनीषा मस्के, रेहान शेख, प्रियांका गवळी आदी उपस्थित होत्या. या निवडीबद्दल तालुक्याचे माजी आमदार ॲड. धनाजीराव साठे, श्री संत कूर्मदास साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, नगरसेवक आजिनाथ माळी यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### विवाहितेला बदनाम करण्याची धमकी देत मागितली पाच लाखांची खंडणी

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

पती बरोबर असलेले मतभेद मिटवून घेण्यासाठी तिघांनी दबाव टाकून बदनाम करण्याची धमकी देऊन पाच लाखाची खंडणी मागितली. याप्रकरणी विवाहितेने दिलेल्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत अनिसा जहूर बोरामणीकर (वय ४५, रा. सिध्देश्वर नगर ४, रा. मजरेवाडी) यांच्या फिर्यादीवरून मुनीर शेख (रा. नवीन विडी घरकुल), यास्मीन मुजाहिद शेख, जहूर अब्दुलगनी बोरामणीकर यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. अनिसा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी पतीसोबतचे भांडण मिटवून घे, नाहीतर तुझी बदनामी करण्याची व नोकरी घालण्याची धमकी देत होते. तसेच मुनीर हा फिर्यादीला वारंवार फोन करत होता. त्याने फोनवर तुझी बातमी देऊन बदनामी करेन, त्या बदल्यात तु मला ५ लाख रुपये दे अशी मागणी करून फिर्यादीला वारंवार मानसिक त्रास दिला. शिवाय इतर आरोपींनी ही फिर्यादीला फोन करून तुझे पतीसोबतचे भांडण मिटवून घे, नाहीतर तुझी बदनामी करण्याची व नोकरी घालण्याची धमकी देत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेचा तपास पोसई वाघमारे हे करत आहेत.

# भीमा नदी प्रदूषणमुक्त करणार

## गुरसाळे येथील मिसळणारे सांडपाणी रोखण्यासाठी दीड लाख लिटर पाणी शेतीला



### योजनेसाठी १ कोटी ८२ लाख खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ एप्रिल -**

नमामी चंद्रभागा योजनेअंतर्गत भीमा नदी उगमापासून ते राज्यातील नदीच्या शेवटपर्यंत प्रदूषण मुक्त करण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाकडून नमामी चंद्रभागा योजना दहा वर्षांपूर्वी जाहीर करण्यात आली होती. मात्र, याचे काम होत नसल्याने ही योजना केवळ कागदाऊ असल्याची टीका करण्यात येत होती. मात्र, या योजनेकडे राज्य शासनाने आता लक्ष केंद्रित केले असून भीमा नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी भीमा नदीमध्ये येणारे शहर व ग्रामीण भागातील सांडपाणी रोखण्यासाठी पाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीला देण्याची योजना तयार करण्यात आली आहे.



दरम्यान पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील भीमा नदीत मिसळणारे सांडपाणी रोखण्यासाठी खास योजना तयार करण्यात आली असून एक लाख ५० हजार लिटर सांड पाण्यावर प्रक्रिया करून हे पाणी शेतीला देण्यात येणार आहे. या योजनेसाठी सुमारे एक कोटी ८० लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. येथे आलेले भाविक चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करतात व तीर्थ म्हणून चंद्रभागेचे जल प्राशन देखील करतात. मात्र, नदीतील पाणी दूषित असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. यामुळे चंद्रभागा नदी प्रदूषण मुक्त करण्यात यावी, अशी मागणी वारकरी, भाविकातून होत होती.

### नमामी चंद्रभागा योजनेला मुहूर्त

नदीत येणारे सांडपाणी रोखण्यासाठी नदीकाठावरील विविध शहर व ग्रामीण भागातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर व गुरसाळे येथे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते नदीमध्ये किंवा शेतीला देण्यास सुरू करण्यात आले आहे. या योजनेमुळे आता या गावातून नदीत मिसळणारे सांडपाणी बंद झाले आहे. याच पद्धतीने ही योजना इतर शहर व ग्रामीण भागात देखील राबविण्यात येणार आहे. त्यामुळे एकंदरीतच नमामी चंद्रभागा योजनेला शासनाकडून मुहूर्त लागला असून तिची सुरुवात गुरसाळे आणि गोपाळपूर गावातून झाली असल्याचे दिसून येत आहे.

## अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यशाळा

### अकलूजमध्ये २ मे रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २९ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती निमित्त, एकदिवसीय नवउद्योजक मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. दि. २ मे रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृतीभवनात पार पडणार आहे. अशी माहिती. शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिली.



हा उपक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, रोटरी क्लब सराटी डिलाईट, राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे.

शिवरत्न शिक्षण संस्था व शिवपार्वती विकास व सेवा ट्रस्ट यांच्यावतीने आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित होते असलेल्या या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी थायलंड सरकारच्या अर्थमंत्रालयाचे वाणिज्य सल्लागार चेतन नरके, 'टू ब्रदर्स कंपनी' चे सत्यजित हांगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कलगुरू डॉ. दामा, कौशल्य विकास व पी एम उषा योजनेचे संचालक डॉ प्रभाकर कोळेकर, एमएसएमईचे खुजनारे, मिलींद बारापत्रे, श्री रितेश रंगारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेत बचतगट आणि ग्रामीण उद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे तरुणांना नव्या संधी मिळून उद्योजकतेसाठी योग्य दिशा मिळेल, असा विश्वास शिवामृत दूध संघाचे चेअरमन व शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त करीत इच्छुक उद्योजकांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## महाराष्ट्र गौरव कलश यात्रेचे मोडनिंब येथे स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२९ एप्रिल-**

महाराष्ट्राची निर्मिती कशी झाली हे नव्या पिढीला समजावे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र गौरव कलश यात्रा राज्याच्या सहा विभागातून काढल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्राचे सरचिटणीस लतीफ तांबोळी यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने यंदाच्या ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यभरात महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रा काढण्यात येत असून ती रथयात्रा आज मोडनिंब (ता.माढा) येथे आल्यानंतर रथयात्रेचे स्वागत छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलानजीक राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने जल्लोषात करण्यात आले. यंदाच्या ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे संपूर्ण राज्यभरात ही विशेष मंगल कलश रथयात्रा काढण्यात आली आहे. ही रथयात्रा आज मोडनिंब (ता. माढा) येथे पोहोचली असता छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलाजवळ राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उदय माने आणि पदाधिकाऱ्यांकडून रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. रथयात्रा मोडनिंब येथे दाखल झाल्यानंतर एक कार्यक्रम झाला. याप्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उद्योजक उदय माने यांच्या हस्ते उजनी धरणाचे पवित्र जल रथयात्रेतील कलशात आणले. जल आणि मृद कलशाचे पूजन करण्यात आले. यावेळी कैलास तोडकरी, दादासाहेब साठे, चंद्रकांत गिड्डे, रोहिदास पाटील, दत्तात्रय सुर्वे, किरण खडके, संतोष पाटील उपस्थित होते. ही रथयात्रा तीर्थक्षेत्र अरणला पोहोचल्यानंतर श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या समाधी स्थळाचे दर्शन यात्रेतील सर्व पदाधिकारी दर्शन घेतले. कोल्हापूर, सांगली, सोलापूर, इंदापूर मार्गे ही यात्रा पुण्याकडे रवाना झाली.

## बागवान फाउंडेशनला आयकॉन पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ एप्रिल-**

येथील युगदर्शक प्रतिष्ठानतर्फे समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था व व्यक्तींना दिला जाणारा यंदाचा युगदर्शक आयकॉन पुरस्कार बागवान सोशल फाउंडेशनला देण्यात आला.

गेल्या बारा वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे. यंदाच्या पुरस्काराचे वितरण येथील यशवंतराव चव्हाण हॉल मध्ये आमदार दिलीपराव सोपल, डॉ. शिवरत्न शेटे यांच्या हस्ते झाले. बागवान सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जुबेरभाई बागवान यांनी पुरस्कार स्विकारला. यावेळी प्रीती बांगर, पप्पा कसबे, युगदर्शक संस्थेचे अध्यक्ष नितीन भोसले, गटनेते नागेश अक्कलकोटे, डॉ. प्रकाश बुरगुटे, संतोष सूर्यवंशी, संजय बारबोले, बार्शी शहर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, नाना वाणी, अण्णा पेठकर, सुरज मुल्ला, गोणेकर व बागवान फाउंडेशनचे उपाध्यक्ष अन्वर बागवान, कदीर बागवान, अकबर बागवान, मुक्ती मोहीत काश्मी, मुक्तार बागवान, फरीदभाई बागवान, माढेकर, बिलाल बागवान, नजीरभाई इनामदार, वैरागचे रईस बागवान, इरफान बागवान, करमाळा येथून शफिक बागवान, रशीद तांबोळी, हाजी सलीम बागवान मंगळवेढा, बाबुल मुजावर, पुण्याहून रफिक बागवान, संभाजीनगर बाकी बागवान, जळगाव डॉ. शरीफ बागवान, सातारा नासिर बागवान, परभणी हबीब बागवान, बीडहून रशीद बागवान, सुनंदाताई चव्हाण, प्रमिला झोंबाडे, मनगिरे ताई , राजश्री गवळी, इब्राहिम काजी, बादशाह बागवान, आजम बागवान, संगीता पवार, सोलापूरचे अकबर बागवान, युसुफ जमादार, फिल्म कलाकार दीपक ओहाळ व जुबेरभाई बागवान यांचे कुटुब उपस्थित होते. अपर्णा दळवी यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे अध्यक्ष नितीन भोसले यांनी आभार मानले.

## माढ्याचे तहसीलदार विनोद रणवरे निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२९ एप्रिल-**

कामकाजावर नियंत्रण न ठेवणे, कार्यालयीन तपासणी बाबतीत संधी देऊनही सुधारणा न करणे, अवैध वाळू व मुरूम प्रकरणात योग्य प्रकारे कारवाई न करणे तसेच कामकाजाकडे दुर्लक्ष करून आपल्या कर्तव्यामध्ये अनियमितता ठेवल्याचा ठपका ठेवत माढ्याचे तहसीलदार विनोद रणवरे यांना निलंबीत करण्यात आले आहे. चुकीच्या कार्यपद्धती तसेच सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांच्या कामासाठी होत असलेल्या दिरंगाईमुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ मधील नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी राज्य सरकारकडून ही कारवाई करण्यात आली आहे. आमदार अभिजीत पाटील यांनी दोन महिन्यांपूर्वी घेतलेल्या आमसभेत नागरिकांनी तसेच एका महिलेने रस्त्याच्या संदर्भात योग्य कार्यवाही केली नसल्याने कोंडीत पकडत तहसीलदार रणवरे यांना भर सभेत धारेवर धरत आमदारांसमोर चांगलाच जाब विचारला होता. या आमसभेत घडलेल्या घटना व नागरिकांच्या तक्रारीवरून आमदार पाटील यांनी तहसीलदार विनोद रणवरे यांची चांगली झाडाझडती घेतली होती. तेव्हापासून त्यांचे नाव चर्चेत होते. सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांचे वेळेत कामे करा अथवा शासनाकडे तुमच्या निलंबनाची शिफारस करणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले होते. आमदार अभिजीत पाटील यांच्या आमसभेनंतर चांगलचे चर्चेत आलेले तहसीलदार रणवरे हे आजाराचे कारण देत दोन महिन्यापासून रजेवर होते.



## उपळाईत आता मुलीच्या जन्मानिमित्त लावले जाणार झाड

### संयुक्त सचिव भाजीभाकरे यांच्या निर्णयाची अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २९ एप्रिल-**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या संयुक्त सचिव उपळाई बु. (ता. माढा) येथील सुकन्या रोहिणी भाजीभाकरे यांनी सुरु केलेल्या मुलींच्या जन्मानिमित्त पाच झाडे लावण्याच्या आदेशाची अंमलबजावणी त्यांच्याच गावात महिलांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली.



केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत पर्यावरणाचे संतुलन राहावे तसेच मुलगा, मुलगी, लिंग गुणोत्तरातील तफावत कमी व्हावी, या हेतूने मुलींच्या जन्मानिमित्त पाच झाडे लावण्याचा उपक्रम सुरु केला आहे. याबाबतचा आदेश ग्रामीण विकास मंत्रालयाच्या संयुक्त सचिव तथा उपळाई (बु) येथील कन्या रोहिणी भाजीभाकरे यांच्या स्वाक्षरीने निघालेला आहे. त्याची अमंलबजावणी उपळाई (बु.) या गावात गाडेकर कुटुंबात जन्मलेल्या कन्या रत्नाच्या निमित्ताने वृक्षारोपणाने झाली.येथील मूकबधिर विशाखा गाडेकर दांपत्याला कन्यारत्न झाले. कन्यारत्नाचे आजोबा प्राथमिक शिक्षक विठोबा गाडेकर यांनी गावामध्ये महाराणी लक्ष्मीबाई माध्यमिक कन्या प्रशालेत वड, पिंपळ, चिंच यासारख्या वृक्षांचे रोपण केले. यावेळी संयुक्त सचिव रोहिणी यांच्या मातोश्री सुवर्णलता भाजीभाकरे, सरपंच सुमन माळी, मुख्याध्यापिका मंदाकिनी मिसाळ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना नकाते, तलाठी श्रीमती भास्करे, रामदास भाजीभाकरे, आय. आर.एस. स्वप्नील पाटील यांचे वडील शरद पाटील, केंद्रप्रमुख दिगंबर काळे, राजू नकाते, अरविंद नकाते, दत्तात्रय गोरे, प्रफुल्ल शेटे प्राथमिक व माध्यमिक शिक्षक औदुंबर माळी उपस्थित होते. यावेळी श्रीकांत काशीद, विठोबा गाडेकर, रामदास भाजीभाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचा वृक्षांची रोपे देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक पांडुरंग शिंदे यांनी तर आभार अनिल काळे यांनी मानले.